कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
१९३७-२०२६ ९० वर्ष
रायगड रविवार । दि. ४ ऑक्टोबर २०२६ । अंक ११८ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## सरकारकडून खोटे गुन्हे : सपकाळ

**मुंबई** : भाजप सरकार आणि निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात तरुणाईमध्ये प्रचंड असंतोष असून, शिवाजी पार्कवरील आंदोलनातून त्याला वाचा फुटली आहे. हा आवाज दडपण्यासाठी सरकारकडून खोटे गुन्हे दाखल केले जात असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. टिळक भवन येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी तरुणाई रस्त्यावर उतरली आहे. भाजपने कितीही गुन्हे दाखल केले तरी तरुणाई मागे हटणार नाही.

## मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू

**मुंबई** : राज्यात यंदा अपेक्षित पाऊस न झाल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असतानाच मान्सूनने परतीचा प्रवास सुरू केला आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, ३ ऑक्टोबर रोजी मुंबईतून मान्सूनने माघार घेतली असून, पुढील दोन-तीन दिवसांत संपूर्ण राज्यातून मान्सून माघारी फिरण्यास अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे. यंदा जून ते सप्टेंबरदरम्यान देशात सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस झाला. राज्यातील अनेक भागांत पाणीटंचाई, चारा संकट आणि आटणाऱ्या विहिरींमुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. मान्सूनच्या माघारीमुळे उर्वरित पावसाच्या आशाही आता मावळल्या आहेत.

# आज मुंबईत धडकणार शेकापचं लाल वादळ



● (छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मतदार याद्यांमध्ये घोळ घालून लोकशाहीच्या मुळावर घाव घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करीत शेतकरी कामगार पक्षाने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीसह एसआयआर अर्थात विशेष सखोल पुनरीक्षण मतदार याद्यांच्या प्रक्रियेविरोधात रणशिंग फुंकले आहे. ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली रविवारी (दि.४) मुंबईत होणाऱ्या संयुक्त मोर्चात शेकापचे तीन हजारांहून अधिक कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी दिली.

शेकाप नेते जयंत पाटील यांनी शनिवारी (दि.३) अलिबागमध्ये पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, माजी तालुका चिटणीस अनिल पाटील, शेतकरी संघटनेचे अनिल गोमा पाटील, निलेश खोत, सुरेश पाटील, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, रायगड बाजारचे उपाध्यक्ष प्रमोद घासे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी जयंत पाटील म्हणाले की, देशामध्ये मतदार याद्यांमध्ये मोठा घोटाळा होत आहे. मतदारांची नावे कमी पान २ वर

### आपला आवाज बुलंद करा : जयंत पाटील

आयोगाच्या कार्यपद्धतीसह एसआयआर प्रक्रियेविरोधात होणाऱ्या आंदोलनात रायगड जिल्ह्यातील पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण आणि लोकशाही व्यवस्था अधिक सक्षम ठेवण्यासाठी हा लढा महत्त्वाचा असून, आंदोलनात सहभागी होऊन आपला आवाज बुलंद करावा, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.

### ठाकरेंचा 'गर्जना' मोर्चा

आयोगाविरोधात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली 'गर्जना' मोर्चा काढण्यात येणार आहे. रविवारी सकाळी १० वाजता मोर्चास सुरुवात होणार आहे.

प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरण

## कर्नाळातून दोन मारेकरी अटकेत

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मानपाडा परिसरातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे विभागप्रमुख प्रदीप ऊर्फ बाळू पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणात ठाणे गुन्हे शाखेला महत्त्वाचे यश मिळाले आहे. फरार झालेल्या दोन मुख्य आरोपींना मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा येथून ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी अटक केली. निखिल यादव आणि नितेश पवार ऊर्फ भावड्या अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून, त्यांना न्यायालयासमोर पान २ वर



## विहिरीत उडी घेत मायलेकाची आत्महत्या

■ सुतारवाडीत फार्म हाऊसवर धक्कादायक घटना

■ आजारपणाच्या नैराश्यातून टोकाचे पाऊल

**। रोहा । प्रतिनिधी ।**

आजारपणाच्या त्रासाला कंटाळून फार्म हाऊसवर काम करणाऱ्या मायलेकांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना रोहा तालुक्यातील सुतारवाडी भागातील खिलारे फार्म हाऊस येथे शनिवारी (दि. ३) घडली. विहिरीत मायलेकांचे मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

श्रीमती मनिषा काशिकर (८०) आणि मंदार काशिकर (४३) अशी मृत मायलेकांची नावे असून, दोघेही मूळचे पुणे येथील रहिवासी आहेत. शनिवारी सकाळी खिलारे फार्म हाऊसमधील विहिरीत दोघांचे मृतदेह तरंगत असल्याची माहिती मिळताच कोलाड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

मृतदेह बाहेर काढण्यासाठी पोलिसांनी महेश सानप यांच्या सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या रेस्क्यू पथकाची मदत घेतली. पथक घटनास्थळी दाखल झाल्यानंतर विहिरीच्या पाण्यावर महिलेचा मृतदेह तरंगताना दिसून आला. तसेच विहिरीच्या शेजारी महिला व पुरुषांच्या चपला आढळून आल्याने महिलेच्या मुलाचाही विहिरीत शोध घेण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यानुसार रेस्क्यू पथकाने विहिरीत शोधमोहीम सुरू केली. अथक प्रयत्नांनंतर मंदार काशिकर यांचाही मृतदेह शोधण्यात पथकाला यश आले. दोन्ही मृतदेह विहिरीबाहेर काढल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात आली.

मायलेकांना काही आजार जडले होते. सतत आजारी पडत असल्याने आलेल्या नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे.

## श्रीवर्धनच्या खेळाडूंचे भविष्य झुडपात




**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील उदयोन्मुख खेळाडूंना जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने बोर्ली पंचतन येथे उभारण्यात आलेल्या श्रीवर्धन तालुका क्रीडा संकुलाची अवस्था आज अत्यंत दयनीय झाली आहे. संपूर्ण मैदानावर ३ ते ४ फूट उंचीची झुडपे आणि गवत वाढल्याने क्रीडा संकुलाचे रूपांतर रानात झाले आहे. मैदानावर सराव करायचा कुठे आणि आम्ही घडायचे कुठे, असा प्रश्न उदयोन्मुख खेळाडूंकडून केला जातोय.

एकीकडे ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठ्या स्पर्धांमध्ये संधी मिळवून देण्याच्या घोषणा केल्या जातात , मात्र दुसरीकडे सरावासाठी असलेल्या मैदानाची साधी स्वच्छताही केली जात नसल्याचे चित्र आहे. पिण्याच्या पाण्याची पुरेशी पान २ वर

## स्व. मीनाक्षीताई अभ्यासू नेत्या : जयंत पाटील



### वक्तृत्व स्पर्धेला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

स्व. मीनाक्षी पाटील या एक अभ्यासू लोकप्रतिनिधी होत्या. चांगल्या वक्त्या होत्या. त्यांच्या स्मृतीनिमित्त अलिबागमध्ये वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे. एक चांगला उपक्रम असून, बांधिलकीचे वक्ते घडविण्याचे ऐतिहासिक काम केले जात आहे. नव्या वक्त्यांना हक्काचे व्यासपीठ या माध्यमातून देण्याचे काम केले आहे. अलिबागसह रायगड जिल्ह्यातून उत्तम वक्ते निर्माण झाले पाहिजेत. या उपक्रमाचा विस्तार अधिक वेगळ्या पद्धतीने केला पाहिजे, असे शेकाप सरचिटणीस जयंत पाटील म्हणाले.

स्व. मीनाक्षी पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त शेकाप, पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना, सांस्कृतिक आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धा शेतकरी भवन येथे शनिवारी (दि.३) आयोजित करण्यात आली. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. पान ३ वर






# उरणच्या रस्त्यावर प्रदूषणाची 'धुळवड'!

## ।। धुळीने नागरिकांचा श्वास कोंडला ।। कॅन्सर, फुफ्फुसाच्या विकाराने नागरिक त्रस्त

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत असून हवेतील प्रदूषणातही दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यात गव्हाण फाटा ते चिरनेर व दास्तान फाटा ते दिघोडे या नागरिकांच्या महत्त्वाच्या रहदारीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुळीचे कण हवेत उडताना दिसत आहेत.



त्यामुळे नागरिकांचा श्वास कोंडला जात आहे. धूळ आरोग्यासाठी धोकादायक ठरत असून, कॅन्सर, फुफ्फुसाच्या विकाराने अनेकांना ग्रासले आहे. हवेतील प्रदूषणात सर्वाधिक वाटा या धुळीचाच असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. मात्र, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी या समस्येकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत.

राज्यातील प्रशासकीय अधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हे लोकांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे अनेक महानगरांमध्ये हवेतील प्रदूषण झपाट्याने वाढत आहे. त्यात मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या उरण तालुक्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत असून मोठ्या प्रमाणात माती उत्खनन, झाडांची छाटणी होत आहे. त्यामुळे हवेतील प्रदूषणातही दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यात गव्हाण फाटा ते चिरनेर व दास्तान फाटा ते दिघोडे या महत्त्वाच्या रहदारीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुळीचे कण हवेत उडताना दिसत असून समोरून येणारे वाहन, रस्त्यावर पार्किंग केलेली वाहने दिसत नसल्याने अपघाताचा धोकाही बळावला आहे. हवेत उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांचा श्वास कोंडला जात आहे. धूळ आरोग्यासाठी धोकादायक ठरत असून कॅन्सर, फुफ्फुसाच्या विकाराने अनेकांना ग्रासले आहे. हवेतील प्रदूषणात सर्वाधिक वाटा या धुळीचाच असल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी या समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत.

'खेड्यांकडे चला', असा संदेश महात्मा गांधींनी सुमारे ८० वर्षांपूर्वी दिला होता. खेड्यांचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल, असे त्यांचे ठाम मत होते. पण स्वातंत्र्यानंतर नेमके उलटे झाले असून, शासकीय प्रशासनाच्या नियोजनशून्य व भ्रष्ट कारभारामुळे मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या उरण तालुक्यातील खेड्यांतील गावांना बकालपणा प्राप्त होत आहे. तरी संबंधित प्रशासनाने व प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी उरण तालुक्यातील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# शेलू रेल्वे फाटक नऊ दिवस बंद

## पर्यायी मार्गांचा वापर करण्याची वेळ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेच्या मुंबई-पुणे मेन लाईनवरील शेलू रेल्वे स्थानकाबाहेर वांगणीकडे जाणाऱ्या रेल्वे फाटकाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे १ ते ९ ऑक्टोबरदरम्यान हे फाटक वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले असून, वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागत आहे. परिणामी स्थानिकांची मोठी गैरसोय होत आहे.



वांगणी आणि शेलू स्थानकादरम्यान असलेले गेट क्रमांक १९ दुरुस्तीच्या कामासाठी बंद करण्यात आले आहे. रेल्वे रुळांखालील जुनी खडी काढून नवीन खडी टाकण्यासह अन्य अभियांत्रिकी कामे या ठिकाणी सुरू आहेत. सध्या रुळांखालील खडी काढण्यात आल्याने या मार्गावरून पायी जाणेही कठीण झाले आहे. अभियांत्रिकीची बहुतांश कामे रात्रीच्या वेळी केली जात असल्याने स्थानिकांमध्ये नाराजी आहे.

फाटक बंद असल्याने शेलू गावातून नेरळ तसेच कल्याणकडे जाणाऱ्या वाहनचालकांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागत आहे. उल्हास नदीवरील पुलावरून अवसरे मार्गे कळंब-नेरळ रस्त्याचा वापर केला जात आहे. तातडीच्या कामासाठी काही वाहनचालक शेतातील रस्त्यांचा आधार घेत आहेत. मात्र, या मार्गावरील डोणे रेल्वे फाटकाकडे जाताना चिखलामुळे एका वाहनाचे चाक रुतल्याची घटनाही घडली आहे. त्यामुळे शेलू रेल्वे फाटक बंद असल्याने निर्माण झालेली गैरसोय ९ ऑक्टोबरपर्यंत कायम राहणार आहे.

# 'सागर कवच' सरावात किनारी सुरक्षेचा आढावा

## महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याकडून पाहणी

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

भारतीय तटरक्षक दलाने ३० सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत महाराष्ट्र आणि गोव्याच्या किनारपट्टीवर 'सागर कवच-०२/२६' या संयुक्त किनारी सुरक्षा सरावाचे आयोजन केले. दोन दिवसांच्या या सरावातून किनारी सुरक्षा व्यवस्थेची चाचणी घेण्यासह सागरी आपत्कालीन परिस्थितींमध्ये विविध सुरक्षा यंत्रणांच्या सज्जतेचे मूल्यांकन करण्यात आले. या सरावात ४,८०० हून अधिक सहभागी संस्थांनी सहभाग घेतला.



१ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी वरिष्ठ राज्य अधिकाऱ्यांसह मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे सरावाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी राष्ट्रीय सुरक्षा रक्षक (एनएसजी) आणि तटरक्षक दलाच्या 'रॅपिड रिॲक्शन टीम'चे संयुक्त प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

संभाव्य धोक्यांपासून महत्त्वपूर्ण किनारी प्रतिष्ठानांचे संरक्षण आणि जलद प्रतिसाद क्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी विशेष हवाई मोहीमही राबवण्यात आली.

किनारी सुरक्षा व्यवस्थेची प्रभावीता तपासण्यासाठी मुरुड जंजिरा, रेवदंडा, पालघर, अलिबाग, गोवा तसेच विविध लँडिंग पॉईंट्सवर समन्वित हल्ले आणि घुसखोरीचे कृत्रिम प्रसंग निर्माण करण्यात आले. माझगाव डॉकयार्ड लिमिटेड येथे एनएसजीच्या सामरिक पथकाने आणि तटरक्षक दलाच्या आरआरटीने केलेली संयुक्त सामरिक सराव मोहीम हे या सरावाचे प्रमुख आकर्षण ठरले.

या सरावासाठी सागरी आणि हवाई साधनांची सर्वसमावेशक तैनाती करण्यात आली. त्यामध्ये तटरक्षक दल आणि भारतीय नौदलाची जहाजे, डॉर्नियर विमाने, हेलिकॉप्टर तसेच एअर कुशन वाहने (होव्हरक्राफ्ट) यांचा समावेश होता.

सरावात भारतीय नौदल, राज्य पोलीस, एनएसजी, गुप्तचर यंत्रणा, सीमाशुल्क, सीआयएसएफ, एनसीसी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, महसूल गुप्तचर संचालनालय, मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक, एनसीबी आणि एसआयबी यांसह विविध यंत्रणांनी सहभाग घेतला.

## ६८ लाख ९७ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** खात्यावर ६८ लाख ९७ हजार ६०० रुपये भरल्याचे खोटे सांगून रक्कम न देता फसवणूक केल्याप्रकरणी २९ सप्टेंबर रोजी नवनाथ नारायण गोले, लता नवनाथ गोले (राहणार सेक्टर १० खारघर) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात २९ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील फिर्यादी आनंद परसूवाणी (राहणार वाशी सेक्टर ८) यांना त्यांच्या पॅराडाईज ग्रुप कंपनीच्या ओम साई कन्स्ट्रक्शनमार्फत सेक्टर ३४, खारघर या ठिकाणी बांधण्यात आलेल्या साई मन्नत इमारतीमधील फ्लॅट खरेदीमध्ये स्वतःच्या खात्यावरील बोगस आणि बनावट खाते उतारा दाखवून त्या आधारे ओम साई कन्स्ट्रक्शन कंपनीच्या खात्यावर २०१६ रोजी ६८ लाख ९७ हजार ६०० रुपये भरल्याचे नवनाथ गोले आणि त्याची पत्नी लता गोले यांनी भासवले. आणि सदरची रक्कम अद्यापपर्यंत त्यांना न देता त्यांची फसवणूक केली.

# रसायनीत अल्पवयीन मुलगी बेपत्ता

## अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

चांभार्ली परिसरातून १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून रसायनी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलगी १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता चांभार्ली परिसरातील राहत्या घरातून बेपत्ता झाली. कुटुंबियांनी नातेवाईक, आजूबाजूचा परिसर तसेच परिचितांकडे शोध घेतला; मात्र तिचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे कुटुंबियांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीनुसार, अज्ञात व्यक्तीने अल्पवयीन मुलीला फूस लावून किंवा अन्य कारणाने तिच्या कायदेशीर पालकांच्या ताब्यातून घेऊन गेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस अंमलदार पो सई बाचकर करीत असून, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बेपत्ता मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध ठिकाणी तपास करण्यात येत आहे. प्राथमिक माहितीनुसार, मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिचा शोध घेण्यासाठी नातेवाईक व परिसरात चौकशी करण्यात आली होती.

# बायपासने भादावचा रस्ता अडवला

## ● जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडण्याची वेळ

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहराबाहेरून जाणाऱ्या बायपास मार्गामुळे भादाव, भादाव आदिवासीवाडी आणि कुंभे पुनर्वसन या तीन गावांतील नागरिकांसमोर नव्या समस्येने डोके वर काढले आहे. गावांचा दैनंदिन संपर्क आणि ये-जा करणारा मार्गच बायपासमुळे अडवला गेल्याने नागरिक आणि विद्यार्थ्यांना भरधाव वाहतुकीतून जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे. सुरक्षित मार्गाची ठोस व्यवस्था नसल्याने अपघाताचा धोका कायम आहे.

शाळा, बाजारपेठ, रुग्णालय तसेच इतर कामांसाठी नागरिकांना माणगावकडे यावे लागते. विशेषतः विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठ्या धोक्याचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात काळ नदीला पूर आल्यास गावांचा माणगावशी संपर्क तुटतो. त्यामुळे बायपास हा महत्त्वाचा पर्याय ठरत असला तरी भरधाव वाहतुकीमुळे धोका वाढला आहे.

सध्या एकेरी वाहतूक सुरू असून, पुढील काही महिन्यांत चौपदरी महामार्गाची वाहतूक सुरू झाल्यानंतर वाहनांची संख्या आणि वेग वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे अपघात घडून जीवितहानी होण्यापूर्वी बायपासखाली कायमस्वरूपी बोगदा अथवा सुरक्षित भुयारी मार्ग उभारावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## म्हसळ्यात भरवस्तीत शिरली मगर

**म्हसळा :** तालुक्यातील घोणसे (वडाची वाडी) परिसरातील मानवी वस्तीत मगर आल्याची घटना शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी घडली. भ्रमणध्वनीवरून मिळालेल्या माहितीनंतर वनविभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत मगर सुरक्षितपणे पकडून तिची नैसर्गिक अधिवासात सुटका केली. या कारवाईत वनविभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांनी सहकार्य केले.

# ८३ लाखांची फसवणूक

नवीन पनवेल : जास्त फायद्याचे आमिष दाखवले आणि ५२ वर्षीय इसमाची ८३ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरोधात सायबर पोलीस ठाण्यात २९ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सेक्टर ३६, रोहिंजण येथे राहणारे धर्मेश मेहनोत घरी असताना ऑगस्ट-सप्टेंबर दरम्यान त्यांना शिखा शर्मा यांनी आणि इतरांनी व्हॉट्सअप ग्रुपमध्ये ॲड केले आणि त्यांना लिंक पाठवून जास्त फायदा मिळण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्याकडून ८३ लाख रुपये घेतले. दरम्यान, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# बनावट नंबर प्लेटचा वापर करून विनयभंग करणाऱ्या थारचालकाला घेतले ताब्यात

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

बनावट नंबर प्लेटचा वापर करून तरुणीचा विनयभंग आणि अपघात करणाऱ्या थार चालकाला अवघ्या दहा तासांच्या आत गुन्हे शाखा कक्ष तीन, पनवेलच्या पोलिसांनी ताब्यात घेतले. अली उर्फ तालीब हसन नखवी (वय ३० रा. देवकी अपार्टमेंट, सेक्टर ५० सीवूड) असे आरोपीचे नाव आहे.

खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत महिलेचा विनयभंग करून पळून जाणाऱ्या आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष तीन, पनवेल करत होते. वपोनि औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला.

यावेळी तपासादरम्यान लाल रंगाच्या थार गाडीचा सीसीटीव्ही फुटेजमध्ये वाहनाचा क्रमांक दिसून आला. त्या क्रमांकाची पडताळणी केली असता तो क्रमांक अन्य गाडीचा असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर उपलब्ध फुटेज आणि वेगवेगळ्या कॅमेऱ्यांचा पाठपुरावा आणि आरटीओ नोंदीनुसार लाल रंगाच्या ६२ नोंदणीकृत थार गाडीच्या माहितीची छाननी करण्यात आली. त्यानंतर आरोपीचा शोध घेतला असता तो बोनकोडे गाव, कोपरखैरणे येथे सापडून आला. गुन्ह्यात वापरलेल्या गाडीचा क्रमांक एम एच २० एफ यु ३७५१ असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपीवर यापूर्वी नेरूळ पोलीस ठाण्यात विनयभंग आणि इतर कलमांखाली गुन्हा दाखल आहे. आरोपीच्या अटकेमुळे खारघरमधील दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

# मारहाण केल्याप्रकरणी दहा जणांविरोधात गुन्हा दाखल

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

सोळा वर्षीय मुलाला मारहाण केल्या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात जवळपास दहा जणांविरोधात २९ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

रियान इंटरनॅशनल स्कूल खारघर सेक्टर ११ येथे झालेल्या बाचाबाचीचा राग मनात धरून २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास खारघर लेक या ठिकाणी आरोपी वेदांत आर्या, मणी, अलीचे दोन भाऊ, ईशान सिंग, आणखी अनोळखी तीन ते चार इसम यांनी सोळा वर्षीय मुलगा आणि अन्य एकाला मारहाण केली. याविरोधात खारघर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पान १ वरुन

## आज मुंबईत धडकणार शेकापचं लाल वादळ

करण्याचा घाट घातला जात असून, विरोधकांचे मतदार कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. याला निवडणूक आयोग सामील असल्याचा आरोप त्यांनी केला.

निवडणूक आयोग दादागिरी करून एकतर्फी राजकीय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीसह एसआयआर प्रक्रियेतील गैरकारभाराविरोधात रविवारी (दि. ४) मुंबईत सकाळी मोर्चा काढला जाणार आहे. ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली हा लढा सुरू करण्यात आला आहे. वेगवेगळ्या पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी होणार आहेत. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षानेही या मोर्चात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

सकाळी साडेअकरा वाजता सुरू होणाऱ्या या आंदोलनात रायगड जिल्ह्यातून जास्तीत जास्त कार्यकर्ते सहभागी व्हावेत, याचे नियोजन करण्यात आले आहे. वेगवेगळ्या पक्षांतील कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिकही आंदोलनात सहभागी होणार आहेत. १९७५ नंतर झालेले आणीबाणीचे वातावरण सध्या राज्यासह देशात सुरू असल्याचे दिसून येत आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीसह मतदार याद्यांमधील घोळांविरोधातील आंदोलनाची ठिणगी आज घराघरात पोहोचली आहे. सरकारच्या भूमिकेविरोधात सर्वसामान्य जनता रस्त्यावर येऊ लागली आहे. रविवारी होणाऱ्या मोर्चात रायगड जिल्ह्यातून सुमारे तीन हजारांहून अधिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

**मतदारांच्या हक्कावरच घाला : चित्रलेखा पाटील**

मतांचा अधिकार काढला जात आहे. विरोधकांचे मतदार निवडून बाहेर काढले जात आहेत. विशिष्ट धर्म, जातीची मते कमी करण्याचा घाट सुरू आहे. सर्वसामान्य मागास घटकाला मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. हरकती व दाव्यांसाठी ज्या मतदारांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत, त्यांचा दावे-हरकतीचा कालावधी अत्यल्प आहे. सरकारी यंत्रणेकडून सुरू असलेली ही मोहीम अत्यंत वाईट आहे. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, तसेच त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी, असा संताप शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

## कर्नाळातून दोन मारेकरी अटकेत

हजर केले असता न्यायालयाने आठ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रदीप पूर्णेकर हे आपल्या कार्यालयाबाहेर असताना तोंडाला मास्क लावलेल्या दोन हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यानंतर कोयत्याने हत्या केली.२९ सप्टेंबरला ही हत्या करण्यात आली होती. या हत्येनंतर ठाण्यामध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला होता. दबावमुक्त व व निष्पक्ष तपासाची मागणी शिवसेना नेत्यांकडून करण्यात आली होती. या घटनेचे गांभीर्य ओळखून तपासाची सूत्रे गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आली. पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव यांच्या नेतृत्वाखाली २३ जणांचे विशेष पथक तयार करण्यात आले. वेगवेगळ्या माध्यमातून हल्लेखोरांचा शोध सुरु करण्यात आला. अखेर मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा परिसरात त्यांचा वावर असल्याची माहिती उपायुक्त अमरसिंह जाधव यांना मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने कर्नाळा परिसरात छापा टाकून टाकून निखिल यादव आणि नितेश पवार यांना ताब्यात घेतले. या दोघांना अटक करून न्यायालयात हजर केले.

## श्रीवर्धनच्या खेळाडूंचे भविष्य झुडपात

सुविधा नसल्याने खेळाडूंची गैरसोय अधिकच वाढली आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे उदयोन्मुख खेळाडूंच्या मेहनतीवर पाणी फिरण्याची भीती व्यक्त होत आहे.

**मैदान नाही, तर सराव नाही; सराव नाही, तर प्रगती कशी?**

खेळाडूंच्या आयुष्यातील महत्त्वाची वर्षे ही कौशल्य विकसित करण्याची आणि स्वतःला सिद्ध करण्याची असतात. मात्र, सरावासाठी मैदानच उपलब्ध नसेल, तर त्यांच्या मेहनतीला दिशा मिळणार कशी? नियमित सराव खंडित झाल्यास स्पर्धात्मक तयारीवर परिणाम होऊ शकतो. इतर ठिकाणच्या खेळाडूंशी स्पर्धा करताना श्रीवर्धनच्या गुणवंत खेळाडूंना मागे पडण्याची वेळ येऊ शकते.काही खेळाडूंची क्रीडा क्षेत्रातील वाटचालच खंडित होण्याची भीती नाकारता येत नाही.

**प्रशासनाची जबाबदारी नेमकी कुठे आहे?**

क्रीडा संकुलाची देखभाल, मैदानाची नियमित स्वच्छता आणि खेळाडूंना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही संबंधित प्रशासनाची जबाबदारी आहे.मैदानाची अशी अवस्था होईपर्यंत देखभाल का झाली नाही? नियमित पाहणी होते का? पाण्याची व्यवस्था करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

श्रीवर्धन तालुका क्रीडा संकुलातील झुडपे तातडीने हटवून मैदान खेळण्यायोग्य करावे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आणि आवश्यक क्रीडा साहित्य व नियमित देखभाल उपलब्ध करून द्यावी.अन्यथा खेळाडूंच्या हक्काच्या सुविधांसाठी युवासेना आक्रमक भूमिका घेईल.

- निकेत मंगेश कोसबे,
युवासेना तालुका अधिकारी (उद्धव बाळासाहेब ठाकरे) श्रीवर्धन

## शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**नवीन पनवेल :** नेरेपाडा येथील शाळेतील विद्यार्थ्यांना विनायक गांधी यांच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले. नेरेपाडा येथील पंकज तांबडे यांच्या घरी गणेशोत्सवानिमित्त सामाजिक कार्यकर्ते विनायक गांधी यांनी वह्या, पेन्सिल, रंगीत खडू अर्पण केले होते. हे सर्व शालेय साहित्य नेरेपाडा येथील अंगणवाडी आणि जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी अंगणवाडी शिक्षिका, शाळेतील शिक्षक उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# महिलेचा हात पकडून ठार मारण्याची धमकी

**नवीन पनवेल :** महिलेचा हात पकडून तिला ठार मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी आरोपी राजा उर्फ राजेश राजाराम कैकाडी (वय ४५ राहणार करंजाडे) यांच्या विरोधात २८ सप्टेंबर रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील पीडित महिला आणि त्यांचा मुलगा या त्यांच्या बहिणीच्या घरी करंजाडे येथे पायी चालत जात होत्या. यावेळी आरोपी राजेश कैकाडी याने पीडित महिलेचा हात पकडला आणि अश्लील वक्तव्य केले. त्यावेळी माझ्याविरुद्ध तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला जा तुला आणि तुझ्यासोबत जाणाऱ्या लोकांना ठार मारेन अशी धमकी दिली. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

## नटराज बार अँड रेस्टॉरंटवर पोलिसांची कारवाई

**नवीन पनवेल :** कोन गाव येथील हॉटेल नटराज बार अँड रेस्टॉरंटवर पोलिसांनी कारवाई करत नऊ जणांविरोधात ३० सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल केला.

नटराज बार अँड रेस्टॉरंट मध्ये महिला तोकडे कपडे घालून बीभातस वर्तन आणि अश्लील हावभाव करताना पोलिसांना सापडून आले. यावेळी बार मधील मॅनेजर जयराम अप्पू शेट्टी आणि पुरुष वेटर रमेश दुमन्ना शेट्टी, मनीष कुमार साकेत हे आर्थिक फायद्यासाठी त्यांना उत्तेजन आणि प्रोत्साहन देत होते. याप्रकरणी पोलिसांनी मॅनेजर वेटर आणि महिला सिंगर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

## एक लाख ९० हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** क्रेडिट कार्डमधून एक लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात ३० सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. केशवलाल यादव हे कामोठे सेक्टर १८ येथे राहात असून, आरोपीने त्यांना विश्वासात फसवणूक केली.

# फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

गृहकर्ज मंजूर करून स्वतःच्या खात्यात स्वीकारले आणि बनावट कागदपत्रे तयार करून सदनिका क्रेडिट सोसायटीकडे गहाण ठेवून गृह कर्ज स्वतःच्या बँक खात्यात घेतल्याप्रकरणी आरोपी विनोद खंडू डुंबरे (रा. सीता विष्णू सोसायटी, सेक्टर १९, कोपरखैरणे) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २८ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

बळीराम दत्तात्रय पाटील हे विचुंबे येथे राहत असून आरोपी विनोद खंडू डुंबरे यांनी तो सदनिका विक्री एजंट असल्याचे त्यांना सांगितले आणि ओमकार रेसिडेन्सी नेरेपाडा येथील उभारण्यात आलेल्या प्रोजेक्टमधील सदनिका विक्रीसाठी खरेदीदार शोधून देतो आणि बँकेकडून गृह कर्ज मंजूर करून घेतो असे सांगितले. आणि मंजूर झालेली गृह कर्जाची रक्कम स्वतःकडे पाठवण्यास सांगून बारा सदनिकेचे प्रति सदनिका सव्वा लाख रुपये प्रति महिना असे एकूण २० महिने देतो असे सांगून त्यांच्यासोबत समझोता करारनामा केला. आरोपी सोबत केलेल्या कराराप्रमाणे गृह कर्जाची रक्कम ही सांगली वैभव को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये बळीराम पाटील यांच्या आठ सदनीकेचे गृहकर्ज मंजूर करून गृह कर्जाची एकूण रक्कम एक कोटी ९७ लाख रुपये आरोपीने स्वतःच्या सानपाडा येथील बँक खात्यात स्वीकारले तसेच बळीराम पाटील यांच्या ओमकार एंटरप्रायजेसच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार केली आणि तोच ओमकार एंटरप्राईजेस बिल्डर अँड डेव्हलपर्स प्रोप्रायटर असल्याचे भासवून सांगली वैभव सोसायटीकडे सदनिका गहाण ठेवल्या.

# निवडक



## प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीची सभा

**पेण :** पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण संस्थेची १०२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रोहा येथील डॉ. सी. डी. देशमुख शहर सभागृहात उत्साहपूर्ण पार पडली. या सभेत संचालक मंडळाने शिफारस केलेल्या १० टक्के लाभांशास सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली. दरम्यान, विषयपत्रिकेतील विषयांनुसार सभेचे कामकाज सुरू करण्यात आले. सभेत सुभाष भोपी, राजेंद्र मोकल, प्रकाश काथारा, विजय पवार,सचिन खोपडे, मनोज मढवी, निर्भय म्हात्रे, बबन पाटील, अजय कापसे व प्रमोद पाटील यांनी विविध प्रश्न व सूचना मांडल्या.सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना संस्थेचे चेअरमन विज्ञान पाटील, सोपन चांदे, मानद सचिव मोहन भोईर व विनोद जोशी यांनी समर्पक उत्तरे दिली. या सभेतील प्रमुख निर्णयांपैकी संचालक मंडळाने शिफारस केलेल्या १० टक्के लाभांशास सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली. त्यामुळे सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. या वार्षिक सभेस संस्थेचे एकूण २००३ सभासद उपस्थित होते. सभेचे संपूर्ण कामकाज अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.



## ऐतिहासिक जंजिरा किल्ला बंद

**मुरुड :** मुरुड-राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी देशभरातील पर्यटक येत असतात. यावेळी सलग तीन सुट्ट्या आल्याने मोठ्या प्रमाणात पर्यटक मुरूडमध्ये दाखल झाले होते. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दिघी, खोरा व राजपुरी जेट्टीवर पर्यटकांनी गर्दी केली होती. परंतु, जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला नसल्याने शेकडो पर्यटकांचा हिरमोड झाला आहे. किल्ल्याची अंतर्गत स्वच्छता झाली नसल्याने किल्ला बंद ठेवण्यात आल्याचे परातत्त्व खात्याचे बजरंग येळीकर यांनी सांगितले. तसेच, गेल्या महिनाभर किल्लातील स्वछता सुरु असुन, पुढील ४ दिवसांत किल्ला पर्यटकांसाठी खुला करू, असे देखील त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. मुरुड-जंजिरा येथील आर्थिक विकास पूर्णतः पर्यटनावर अवलंबून आहे. त्यामुळे ऐन सुट्ट्यांच्या हंगामात किल्ला बंद ठेवल्याने पर्यटकांसह त्यावर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांचा देखील हिरमोड झाला आहे.



## घटस्थापनेसाठी टोपल्यांची खरेदी सुरू

**खांदेश्वर :** नवरात्रोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने पनवेल परिसरात नवरात्रीची चाहूल लागली आहे. घराघरांत घटस्थापनेची तयारी सुरू झाली असून, महिला वर्गाची खरेदीसाठी लगबग वाढली आहे. काही महिला घरातील देव्हाऱ्यात पारंपरिक पद्धतीने घटस्थापना करतात, तर काही ठिकाणी टोपलीमध्ये घट बसवून त्याभोवती फुलांच्या माळांनी आकर्षक सजावट केली जाते. त्यामुळे नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर टोपल्या, सजावटीचे साहित्य आणि फुलांच्या माळांना मागणी वाढू लागली आहे. नवरात्र सुरू होण्यापूर्वीच महिला वर्गाकडून घटस्थापनेसाठी लागणाऱ्या टोपल्यांची खरेदी केली जात आहे. बाजारपेठेत विविध आकारांच्या आणि आकर्षक प्रकारच्या टोपल्या उपलब्ध झाल्या असून, आपल्या घरातील सजावटीला अनुरूप टोपली निवडण्याकडे महिलांचा कल आहे. काही महिला टोपलीमध्ये धान्य पेरून त्यावर घटस्थापना करण्याची तयारी करत आहेत. तर काही जणी फुले, हार आणि अन्य सजावटीच्या साहित्याने घटाची आकर्षक मांडणी करण्याचे नियोजन करीत आहेत.

## आमदांची बांधावर जाऊन पाहणी

**माणगाव :** रायगड जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाच्या लहरीपणाचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला असून, अनेक भागांत दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. त्यामुळे केवळ श्रीवर्धन तालुक्यापुरती दुष्काळाची व्याप्ती मर्यादित न ठेवता रायगड जिल्ह्यातील अन्य तालुक्यांतील प्रत्यक्ष परिस्थितीचीही पाहणी करून दुष्काळ स्थितीचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी केली. शुक्रवारी (दि.२) आ. शशिकांत शिंदे यांनी माणगाव तालुक्यातील सुरव-जाधव या गावातील शेतांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

# स्व. मीनाक्षीताई अभ्यासू नेत्या : जयंत पाटील

### स्व. मीनाक्षीताईंच्या स्मृतिदिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा; रायगड जिल्ह्यातील विविध भागांतील वक्त्यांचा सहभाग

(पान १ वरून)

यावेळी शेकाप ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, तालुका माजी चिटणीस अनिल शांताराम पाटील, शेतकरी संघटनेचे अनिल पाटील, नागेश कुलकर्णी, अलिबाग पंचायत समिती सदस्य अंजली ठाकूर, तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, मोहन धुमाळ, विक्रांत वार्डे, निलेश खोत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातील असंख्य स्पर्धक, श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.






यावेळी मार्गदर्शन करताना शेकाप सरचिटणीस जयंत पाटील म्हणाले की, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील व महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्या पुढाकारातून वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून एक चांगला उपक्रम गेल्या दोन वर्षांपासून सुरू करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील, माजी विरोधी पक्षनेते स्व. ॲड. दत्ता पाटील यांचे वक्तृत्वावर एक वेगळे प्रभुत्व होते. त्याच विचारांचा वारसा माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण वक्तृत्वाने जपला. मीनाक्षी पाटील एक चांगल्या वैचारिक वक्त्या होत्या. आपल्या वक्तृत्वाने वेगळ्या पद्धतीने बोलण्याची एक वेगळी हातोटी त्यांच्याकडे होती. तळागाळातील प्रश्न अभ्यासू वृत्तीने सातत्याने मांडण्याचे काम स्व. मीनाक्षी पाटील यांनी केले आहे. आपल्या वक्तृत्वाची एक वेगळी छाप त्यांची राहिली आहे. वक्तृत्व स्पर्धेतून अनेकांना घडण्याची संधी मिळते, असे सांगत जयंत पाटील यांनी त्यांच्या शालेय जीवनातील भाषणाच्या आठवणींना उजाळा दिला. दरम्यान, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, तालुका चिटणीस सुरेश घरत यांनीदेखील आपले मत व्यक्त केले.

स्व. मीनाक्षीताई पाटील स्मृती रायगड जिल्हास्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. 'आजचा विद्यार्थी आणि उद्याचा भारत', 'रायगडचा विकास आणि जनतेची अपेक्षा', 'सत्तेच्या सिंहासनावर नव्हे, जनतेच्या हृदयात घर करणारी ताई- मीनाक्षीताई', 'कलम जब जागती है तब सत्ता कांपती है', 'मजबुती का नाम महात्मा गांधी', 'जखमी लोकशाहीच्या कपाळावर आशेचे कुंकू लावतीय मी' अशा वेगवेगळ्या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत ५० स्पर्धकांनी सहभाग घेतला. वेगवेगळ्या स्पर्धकांनी वेगवेगळ्या विषयांवर आपल्या शैलीतून वक्तृत्व करून श्रोत्यांची मने जिंकली.

परीक्षक म्हणून राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य भगवान लोखंडे, साहित्यिक लेखक अनंत कोळगांवकर, एमए विषयातील सुवर्णपदकाचे मानकरी आणि मराठी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या सुरभी वाणी यांनी काम पाहिले. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विजेत्याला १५ हजार १ रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला ११ हजार १ रुपये व चषक, तृतीय क्रमांकाला ७ हजार १ रुपये व चषक, चतुर्थ क्रमांकाला ५ हजार १ आणि चषक, पाचव्या क्रमांकाला ३ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच, उत्तेजनार्थ म्हणून पाच बक्षिसे दिली जाणार आहेत. त्यामध्ये प्रत्येकी २ हजार १ व चषक देऊन सन्मानित केले जाणार आहे.

### मीनाक्षी पाटील यांना हीच खरी श्रद्धांजली : चित्रलेखा पाटील

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या स्व. मीनाक्षी पाटील यांच्या नावाने अलिबागमध्ये जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेतली आहे. ही खरी मीनाक्षी पाटील यांना श्रद्धांजली आहे. आपल्या वक्तृत्वाने अनेकांना मंत्रमुग्ध करण्याचे काम मीनाक्षी पाटील यांनी केले आहे. ताईंच्या नावाने सुरू केलेली ही स्पर्धा आगामी काळात भव्यदिव्य करण्याचा मानस आहे. शंभरहून अधिक स्पर्धकांना यातून संधी देण्याचा प्रयत्न राहणार आहे. दोन दिवस ही स्पर्धा झाली पाहिजे अशा पद्धतीने नियोजन राहणार आहे, असे मत शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले.

# नागरिकांना छत्रीचा आधार



**। खांदेश्वर । प्रतिनिधी ।**

सप्टेंबर महिन्यापासून उष्णतेचे वेध लागले असतानाच ऑक्टोबरच्या पहिल्याच दिवसापासून उन्हाचा तडाखा जाणवू लागला आहे. दुपारच्या वेळी वाढणाऱ्या उकाड्यामुळे नागरिकांची चांगलीच गैरसोय होत आहे. पावसाळ्यात पावसापासून संरक्षण करण्यासाठी वापरलेल्या छत्र्या आता उन्हापासून बचावासाठी बाहेर पडताना नागरिकांच्या हातात दिसू लागल्या आहेत. रस्त्यावरून चालताना अनेक नागरिक छत्रीचा आधार घेत उन्हाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. तर, काही नागरिकांनी डोक्यावर रुमाल बांधण्यास सुरुवात केली आहे. महिला आणि तरुणींकडून चेहऱ्याचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी स्कार्फचा वापर केला जात आहे. दुचाकीस्वारांकडूनही उन्हापासून बचावासाठी चेहरा झाकण्याला प्राधान्य दिले जात आहे.

## २९ वर्षीय महिला बेपत्ता

**पनवेल :** नवीन पनवेल सेक्टर ८ येथून २९ वर्षीय प्रेमकला पदम लोहार ही महिला बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे.



याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रेमकला लोहार हिचे वय २९ वर्षे असून रंग गोरा, उंची सुमारे ५ फूट ५ इंच, केस काळे व लांब, डोळे काळे आणि बांधा मध्यम आहे. ती बेपत्ता झाली त्यावेळी हिरव्या रंगाचा वनपीस व पांढऱ्या रंगाचे शूज परिधान केले होते. ती नेपाळी व हिंदी भाषा बोलते. तिच्याकडे व्हिवो कंपनीचा मोबाईल आहे.

# कर्जत शहरात धूर फवारणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषदेकडून शहरात धूर फवारणी करण्यास सुरुवात झाली आहे. पावसाळ्यानंतर मोठ्या प्रमाणात गवत आणि झाडे झुडपे वाढली असून, डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांनी धूर फवारणीची मागणी केल्यानंतर पालिकेने आरोग्य विभागाला निर्देश देत शहरातील सर्व भागात धूर फवारणी सुरू करण्यास सुरुवात झाली आहे.



पावसाळ्यानंतर सर्वत्र गवत वाढते आणि त्यानंतर डासांची उत्पत्ती होण्यास मदत होते. त्याचवेळी उन्हाळ्यात छाटण्यात आलेली झाडे यांना नव्याने पालवी येत असते. तसेच, नवीन झाडे उगवत असतात. त्यामुळे देखील डासांची उत्पत्ती होत असते आणि त्यामुळे डासांचा वाढलेला प्रभाव यामुळे शहरातील नागरिक त्रस्त झाले होते. नागरिकांनी पालिकेत जाऊन आपली समस्या आरोग्य सभापती तथा उपनगराध्यक्ष संतोष पाटील यांच्याकडे मांडली. त्यांनी नगराध्यक्ष पुष्पा दगडे आणि मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांच्यासमोर शहरातील डासांचा प्रभाव कमी करण्यासाठी धूर फवारणी सुरू करायला हवी, अशी भूमिका घेतली. त्यानंतर मुख्याधिकारी यांनी निर्देश देताना आरोग्य विभागाने शहरातील सर्व भागात धूर फवारणी करावी असे निर्देश स्वच्छता निरीक्षक यांना दिले. गुंडगे, भिसेगाव नंतर कर्जत शहर आणि तिसऱ्या टप्प्यात दहिवली आकुर्ले असा भाग निश्चित करून जादा कामगार या कामासाठी लावून धूर फवारणी केली जावी, असे निर्देश दिले आहेत.

# दोन महिने उलटूनही आरोपी फरार

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेणमधील मयूर वनगे मारहाण प्रकरणाला तब्बल दोन महिने पूर्ण झाले; मात्र, या प्रकरणातील आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. त्यामुळे तपासाच्या गतीवर आणि आरोपींच्या अटकेबाबत आता गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणातील आरोपी म्हणून भाजपचे उपाध्यक्ष मंगेश दळवी, रुपेश दळवी आणि हरेश दळवी यांची नावे समोर आली आहेत. मात्र, हे तिघे पोलिसांना सापडलेले नसल्याने आरोपी नेमके कुठे आहेत आणि त्यांना अटक का होत नाही? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.



दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा आमदार शशिकांत शिंदे यांनी पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्याशी थेट चर्चा केली. मयूर वनगे प्रकरणातील तपासाची दिशा, आतापर्यंत झालेली पोलीस कारवाई आणि आरोपींविरोधात करण्यात आलेल्या कायदेशीर कार्यवाहीची त्यांनी माहिती घेतली. मारहाणीच्या घटनेला दोन महिने उलटूनही आरोपी अटकेपासून दूर असल्याने आता तपास यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी आतापर्यंत कोणती पावले उचलली? आरोपींचा ठावठिकाणा पोलिसांना का मिळत नाही? आणि दोन महिन्यांनंतरही अटकेबाबत ठोस कारवाई का झालेली नाही? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, आरोपींना फरार घोषित करण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू झाली आहे का? हा प्रश्नही आता ऐरणीवर आला आहे. मात्र, आरोपींना 'फरार' घोषित करण्याबाबतची नेमकी कायदेशीर स्थिती आणि पोलिसांनी केलेली कारवाई याबाबत अधिकृत माहिती समोर येणे आवश्यक आहे. दरम्यान, आमदार शशिकांत शिंदे यांनी थेट पोलीस प्रशासनाकडून या प्रकरणाची माहिती घेतल्याने प्रकरणाला आता नवे राजकीय वळण मिळाले आहे.



# पर्यटकांकडून सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

दिवेआगर येथील समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांकडून सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र समोर येत आहे. या दुर्घटनेला चोवीस तासही पूर्ण झाले नसताना श्रीवर्धनच्या समुद्रात पर्यटक बिनधास्तपणे पोहण्याचा आनंद घेत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. प्रशासनाकडून समुद्रातील संभाव्य धोका लक्षात घेऊन येथील किनाऱ्यांवर लाल बावटा लावण्यात आला आहे. तसेच, समुद्रात काही अंतरावर धोकादायक क्षेत्र दर्शविणारे बोयेही लावण्यात आले आहेत. मात्र, या इशाऱ्यांकडे पर्यटकांकडून सर्रास दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे. किनाऱ्यावरील स्थानिक नागरिक आणि विक्रेते पर्यटकांना समुद्रात पोहण्यासाठी जाऊ नका, अशा सूचना देत आहेत. समुद्राच्या पाण्याचा अंदाज येत नसल्याने तसेच लाटांच्या प्रवाहामुळे जीवितहानी होण्याची शक्यता असल्याचेही त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे.

## तातडीने भरती

**पुरुष / महिला उमेदवार पाहिजेत.**

**पात्रता :**

**शैक्षणिक पात्रता:** डिप्लोमा किंवा ग्रॅज्युएट फ्रेशर्स तसेच अनुभवी उमेदवार अर्ज करू शकतात.

**कामाचे ठिकाण:** मांदांड / बोरघर, तळा रोड -रायगड

**संपर्क: सौ. ज्योती - 8452959362**

**आजच अर्ज करा - तात्काळ रुजू होण्याची संधी!**

प्रशांत नाईक यांनी केली सुरक्षा पाहणी | अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर लाईफगार्डची नियुक्ती

# दुर्घटना टाळण्यासाठी 'प्रिव्हेन्शन'वर भर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन-दिवेआगर येथील विद्यार्थ्यांच्या समुद्रातील दुर्घटनेने पर्यटनस्थळांवरील सुरक्षा व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज अधोरेखित केली आहे. दुर्घटना घडल्यानंतर बचावकार्य करण्यापेक्षा दुर्घटना घडण्याची शक्यता आधीच ओळखून ती टाळण्यावर भर देण्याची भूमिका घेत अलिबाग नगरपरिषदेचे सभापती प्रशांत नाईक यांनी अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील सुरक्षा व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली.

पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता सर्व लाईफगार्डना अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. सध्या अलिबाग समुद्रकिनारी चार पुरुष व एका महिला लाईफगार्डची नियुक्ती



असून, बचावासाठी एक स्पीडबोट, स्ट्रेचर, लाईफ जॅकेट्स तसेच भरती-ओहोटीच्या सूचनांसाठी सायरनची व्यवस्था उपलब्ध आहे. समुद्रकिनाऱ्यावरील जीवरक्षकांची तैनाती, बचाव बोटी, सुरक्षा साधने, पर्यटकांची वर्दळ असलेली ठिकाणे आणि आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद देण्याची यंत्रणा यांचा प्रशांत नाईक, मुख्याधिकारी सागर साळुंखे, अभियंता मुंडे यांनी आढावा घेतला. केवळ जीवरक्षक आणि बचाव बोटी उपलब्ध असणे पुरेसे नसून, कोणत्या ठिकाणी, कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या वेळी अधिक धोका निर्माण होऊ शकतो, याचे पूर्वनियोजन आवश्यक आहे, यावर त्यांनी भर दिला.

"पर्यटक समुद्राचा आनंद घेण्यासाठी येतात; त्यांना समुद्राची भीती वाटावी अशी परिस्थिती निर्माण व्हायला नको. त्यामुळे सुरक्षेच्या उपाययोजना या दुर्घटनेनंतरच्या प्रतिसादापुरत्या मर्यादित न राहता, दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने असायला हव्यात," असे प्रशांत नाईक यांनी स्पष्ट केले. तसेच, पर्यटकांची सुरक्षितता ही सर्वोच्च प्राथमिकता असून, समुद्रकिनाऱ्यावरील सुरक्षा व्यवस्थेचा नियमित आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# महाविरणचा मनमानी कारभार?

। रसायनी । प्रतिनिधी ।

**महावितरणकडून घरगुती वीज ग्राहकांना प्रत्यक्ष मीटर रीडिंग न घेता सरासरी बिल आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढत असून, ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही महिन्यांपासून काही ग्राहकांना अपेक्षेपेक्षा जास्त रकमेची बिले मिळत असून, बिलाबाबत विचारणा केल्यानंतर स्मार्ट मीटर बसविण्याचा आग्रह केला जात असल्याचा आरोप महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. विजय खारकर यांनी केला आहे.**




- **मीटर रीडिंग न घेताच सरासरी बिल**
- **स्मार्ट मीटरच्या सक्तीवर ग्राहक संघटनेचा आक्षेप**

वीज बिलिंग, मीटर रीडिंग आणि ग्राहकांच्या तक्रारींबाबत महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नियम व प्रक्रिया निश्चित केल्या आहेत. सध्या आयोगाकडे २०२१ मधील इलेक्ट्रिक सप्लाय कोड आणि स्टँडर्ड ऑफ परफॉर्मन्स रेग्युलेशन तसेच त्यातील २०२४ मधील सुधारणा लागू असल्याचे आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर नमूद आहे. त्यामुळे ग्राहकांनी जुन्या २००५ च्या नियमांचा संदर्भ देताना त्यांची सद्यस्थिती तपासणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष

> **ग्राहकांनी घाबरून न जाता आपल्या बिलाची आणि मीटर रीडिंगची नोंद ठेवावी. चुकीचे बिल आकारले जात असल्यास त्याविरोधात लेखी तक्रार करून कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा. स्मार्ट मीटर किंवा बिलिंगच्या प्रक्रियेत ग्राहकांवर कोणत्याही प्रकारचा अनुचित दबाव आणला जाऊ नये.**
> **– ॲड. विजय खारकर, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना**

मीटर रीडिंग उपलब्ध नसताना सरासरी वापराच्या आधारे बिल आकारण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास, ग्राहकांनी बिलातील मागील आणि सध्याचे मीटर रीडिंग, वापराचे युनिट, बिलिंग कालावधी आणि मागील बिलांची नोंद तपासावी. प्रत्यक्ष वापर आणि बिलातील वापर यामध्ये मोठी तफावत असल्यास महावितरणकडे लेखी तक्रार करून त्याची पोचपावती घेणे महत्त्वाचे आहे. तसेच, स्मार्ट मीटरच्या वापराबाबत ग्राहकांना योग्य माहिती देणे आणि अधिकृत प्रक्रियेचे पालन करणे आवश्यक असल्याची भूमिका ग्राहक संघटनेने मांडली आहे. केवळ बिलाबाबत ग्राहकाने आक्षेप घेतला किंवा तक्रार केली म्हणून त्याच्यावर दबाव आणणे अथवा वीजपुरवठा खंडित करण्याची धमकी देणे योग्य नसल्याचे ॲड. खारकर यांनी म्हटले आहे.

### ‘महाविरतणने तक्रारींची दखल घ्यावी’

ग्राहकांनी चुकीचे किंवा संशयास्पद बिल आल्यास मीटरचे सध्याचे रीडिंग आणि तारीख स्पष्ट दिसेल असा फोटो जतन करावा. मागील बिलांच्या तुलनेत युनिट वापराची पडताळणी करावी. महावितरणकडे लेखी तक्रार करून पोचपावती घ्यावी. संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचे नाव, पद आणि तक्रारीचा क्रमांक नोंदवून ठेवावा. बिलात प्रत्यक्ष वापरापेक्षा जास्त युनिट दाखविल्याचे आढळल्यास त्याबाबत लेखी हरकत नोंदवावी. तक्रारीचे निराकरण न झाल्यास उपलब्ध ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेकडे दाद मागावी. महावितरणने या तक्रारींची दखल घेऊन प्रत्यक्ष मीटर रीडिंग, बिलिंगमधील तफावत आणि स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया याबाबत ग्राहकांना स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी ग्राहक संघटनांनी केली आहे.



## महाविद्यालयात गांधी जयंती साजरी

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगावातील द.ग. तटकरे महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती शुक्रवारी (दि.२) साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात सिमरन वाडेकर, रीम गजगे, यश कोठारी या विद्यार्थ्यांनी तसेच उपप्राचार्य प्रा.डॉ. राजेंद्र आचार्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयशंकर पांडेय यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री या महापुरुषांचे महान विचार आणि कार्य, त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात, देशाच्या उभारणीत व विकासासाठी दिलेल्या योगदान यावर विचार मांडले.

## जनार्दन निळेकर यांचे निधन

। कोलाड । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील पाटबंधारे खात्यातील सेवा निवृत्त कर्मचारी जनार्दन नारायण निळेकर यांचे गुरुवारी (दि.१) रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने निळेकर कुटुंबीय, नातेवाईक व परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी तसेच उत्तरकार्य विधी शनिवारी (दि.१०) आंबेवाडी येथील राहत्या घरी होणार असल्याचे निळेकर कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.



## धोकादायक डीपींना सुरक्षाकवच; माणगाव महावितरणचा पुढाकार

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव शहरातील खांदाड गावात असलेल्या वीज डीपीभोवती अखेर लोखंडी सुरक्षा कठडे उभारण्याचे काम महावितरणने हाती घेतले आहे. या कामाला दि.२८ सप्टेंबरपासून सुरूवात झाल्यामुळे रहिवासी, पादचारी आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



माणगाव शहरातील खांदाड गावात सार्वजनिक शौचालयाजवळ असलेल्या वीज डीपीच्या अगदी लगत घरे, निवासी चाळी आणि नागरिकांची वर्दळ आहे. या परिसरात लहान मुले खेळत असल्याने बालसुरक्षेचा कनिष्ठ अभियंत्यांनी सांगितले की, नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तालुक्यातील विविध ठिकाणी डीपीभोवती सुरक्षा कठडे उभारण्यात येत आहेत. निवासी परिसर, पादचारी व वाहनांची वर्दळ असलेली ठिकाणे तसेच संभाव्य धोकादायक डीपींना प्राधान्य दिले जात असून, गरजेनुसार दुर्गम भागातील डीपींनाही सुरक्षाकवच देण्यात येईल. वीज यंत्रणेजवळ दुर्घटना घडण्याची वाट न पाहता आधीच सुरक्षेची उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

त्यामुळे दुर्घटना टाळण्यासाठी केलेली ही उपाययोजना नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत आहे. तसेच, सुरक्षा कठड्यांमुळे नागरिकांना विद्युत यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राहण्याबरोबरच डीपीमधील कॉईल, तेल किंवा अन्य विद्युत साहित्याच्या संभाव्य चोरीलाही आळा बसण्याची अपेक्षा आहे.

## म्हसळा तालुक्यात विशेष ग्रामसभा

। म्हसळा । प्रतिनिधी ।



महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शासनाच्या आदेशानुसार शुक्रवारी (दि.२) म्हसळा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले. या विशेष ग्रामसभांच्या निमित्ताने ग्रामपंचायत स्तरावर विविध लोककल्याणकारी व विकासाभिमुख उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये सेवा संकल्प अभियान, ‘स्वच्छता ही सेवा’ उपक्रम, रिटर्न उत्सव, मुख्यमंत्री समृद्धी पंचायत राज अभियान, तसेच महिला शेतकरी प्रमाणपत्रांचे वाटप इत्यादी उपक्रमांचा समावेश होता. तसेच, ग्रामपंचायत हद्दीतील विविध गावांमध्ये नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून मोठ्या प्रमाणावर महाश्रमदान व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी गावातील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, परिसर तसेच विविध शासकीय व सामाजिक स्थळांची स्वच्छता करण्यात आली. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी होत श्रमदानातून स्वच्छता व लोकसहभागाचा संदेश दिला. तसेच, शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे, पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देणे आणि ग्रामविकासाच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी गटविकास अधिकारी मंगेश साळी, विस्तार अधिकारी दामोदर दिघीकर, कक्ष अधिकारी हेमंत माळी आदी अधिकारी उपस्थित होते.

## ज्येष्ठ नागरिक संस्थेचा वर्धापनदिन

। कोलाड । प्रतिनिधी ।

ज्येष्ठ नागरिक संस्था कामार्ले विभाग वाघोलीचा वर्धापनदिन सुधाकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कामार्ले ग्रामपंचायत सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात संस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार पाटील यांनी प्रास्ताविक भाषणात संस्थेची माहिती सांगितली. यावेळी ज्येष्ठ सल्लागार बळवंत वालेकर, माजी सरपंच संदीप वाघपंजे, अर्जुन गावंड, नारायण गायकवाड तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधाकर पाटील यांची भाषणे झाली.

## रहदारीच्या रस्त्यावर अनेक खड्डे



। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

भिरा फाटा ते विळा भागाड या १८ किलोमीटर अंतरावर गेल्या अनेक महिन्यांपासून खड्ड्यांचे साम्राज्य पसरलेल्या आहे. गणेशोत्सवापूर्वी हे खड्डे बुजविले जातील, अशी आशा अनेक गणेश भक्तांना होती. मात्र, सार्वजनिक गणपती विसर्जन झाले तरीसुद्धा खड्ड्यांच्या वेदना अनेकांना जाणवत आहेत. गणेशोत्सवानंतर हेटवणे तसेच काही ठिकाणच्या रस्त्याच्या कडेला बारीक खडीचे ढीग करून ठेवलेले होते. मात्र, हे ढीग वाहनांच्या वर्दळीमुळे रस्त्यावर पसरले आहेत. त्यामुळे अनेक वाहनांना मुश्किलेने मार्ग काढावा लागत आहे. रात्रीच्या वेळी या परिसरामध्ये पथदिव्यांची व्यवस्था नसल्यामुळे दुचाकी वाहनांना रस्त्यावरील खडी न दिसल्यामुळे अनेक वेळा दुचाकी वाहन घसरण्याचे प्रकार घडलेले आहेत.

## आयुष हॉस्पिटलमध्ये जयंती साजरी




। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरूड तालुक्यातील नांदगाव आयुष मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल व नूतन स्कूल ऑफ नर्सिंग आणि रायगड इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. यावेळी दोन्ही नर्सिंग महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी तसेच आयुष मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमने उत्स्फूर्त सहभाग घेतला. या कार्यक्रमादरम्यान सत्य, अहिंसा, साधेपणा, स्वच्छता, शिस्त आणि समाजसेवा या महात्मा गांधी यांच्या विचारांवर विशेष प्रकाश टाकण्यात आला. शिक्षण, आरोग्यसेवा आणि सामाजिक जबाबदारीच्या क्षेत्रात गांधीजींच्या विचारांची आजही असलेली उपयुक्तता यावेळी अधोरेखित करण्यात आली.

## ॲड. गांधी यांना एलएलएम पदवी

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव येथील प्रतिथयश प्रसिद्ध वकील ॲड. केदार गांधी यांनी एलएलएम पदवी नुकतीच संपादन केली आहे. त्यामुळे त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून विशेष अभिनंदन होत आहे. ॲड.केदार गांधी यांनी सन २००५ मध्ये सिम्बॉसिस कॉलेज पुणे येथून एलएलबी हि वकिली पदवी संपादन केली. तेव्हापासून आजपर्यंत २१ वर्ष केदार गांधी हे माणगाव दिवाणी व फौजदारी न्यायालयात वकिली करीत आहेत. क्रिमिनल लॉजी (गुन्हेगारी शास्त्र) यामध्ये केदार गांधी हे निष्णांत आहेत.

## ‘सीएफआय गरजू विद्यार्थ्यांच्या पाठीशी’

। पेण । प्रतिनिधी ।

गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला आर्थिक पाठबळ देत त्यांच्या उज्वल भवितव्याचा मार्ग सुकर करणाऱ्या सीएफआय संस्थेचे कार्य कौतुकास्पद आणि समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांनी काढले.



विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने सीएफआयच्यावतीने पेण येथे शिष्यवृत्ती धनादेश वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना नगराध्यक्षा प्रीतम पाटील म्हणाल्या की, रक्ताची नाती ही सर्वांत जवळची नाती मानली जातात. मात्र, गरजेच्या वेळी अनेकदा हीच नाती मदतीचा हात पुढे करत नाहीत. अशा परिस्थितीत सीएफआयसारखी संस्था कोणताही भेदभाव न करता गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करते, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च त्यांच्या कुटुंबीयांना परवडत नसताना विविध अभ्यासक्रमांच्या शुल्कासाठी आर्थिक मदत केली जाते. या मदतीमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येत नाही, तर त्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात पुढील शिक्षण घेण्याची संधी मिळते. सीएफआयची ही मदत विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मोलाचा टप्पा ठरत असून त्यांच्या भवितव्याला नवी दिशा देणारी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

**२० पोती कचरा संकलित | कॉलेजमधील ६१ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

## वन्यजीव सप्ताहाची उत्साहात सुरुवात

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

‘‘अधिवास जोडूया, वन्यजीवांचे संवर्धन करूया’’ या संकल्पनेतून दि.२ ते ८ ऑक्टोबरदरम्यान साजरा होणाऱ्या वन्यजीव सप्ताहाची उत्साहात सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम स्वर्णसृष्टी हॅबिटॅट रिस्टोरर फाउंडेशन, स्नेक अवेअरनेस असोसिएशन, वन विभाग पनवेल आणि खारघर-तळोजा कॉलनीज वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.



महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून ओवे हिल्स, हायडपार्कसमोर स्वच्छता मोहीम घेण्यात आली. या मोहिमेत कॉलेजच्या तब्बल ६१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी पनवेल वन विभागाचे सहायक वनरक्षक सागर माळी आणि वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन पानपाट्टे यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीव, त्यांचे नैसर्गिक अधिवास आणि जैवविविधतेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. तसेच, अधिवासाचे तुकडीकरण आणि जैवविविधतेचा ऱ्हास यामुळे वन्यजीवांवर होणाऱ्या परिणामांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्याचबरोबर मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गात प्लास्टिक, काच, कचरा आणि इतर घातक वस्तू मोठ्या प्रमाणात फेकल्या जातात. या वस्तूंमुळे वन्यजीवांना दुखापत होण्याबरोबरच अनेकदा त्यांचा जीवही धोक्यात येतो. त्यामुळे निसर्ग स्वच्छ ठेवणे ही केवळ पर्यावरणाची नव्हे, तर वन्यजीव संरक्षणाचीही महत्त्वाची जबाबदारी असल्याचे देखील सांगण्यात आले.

दरम्यान, ‘चला, निसर्ग जपूया, वन्यजीव वाचवूया आणि भावी पिढीसाठी समृद्ध जैवविविधता सुरक्षित ठेवूया’, असा संदेश देत वन्यजीव सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. यावेळी स्वर्णसृष्टी हॅबिटॅट रिस्टोरर फाऊंडेशनच्या ज्योती नाडकर्णी, रायगडचे मानद वन्यजीव रक्षक रघुनाथ जाधव तसेच वन विभागाच्या टीमच्या मार्गदर्शनाखाली सहभागी स्वयंसेवक पाच वेगवेगळ्या दिशांनी डोंगर परिसरात पसरले. त्यांनी परिसराची पाहणी करून मोठ्या प्रमाणावर कचरा संकलित केला. या स्वच्छता मोहिमेत तब्बल २० पोती कचरा गोळा करण्यात आला. डोंगर परिसरात प्लास्टिक आणि अन्य कचरा टाकणाऱ्यांमुळे वन्यजीवांच्या अधिवासाला निर्माण होणारा धोका यामुळे पुन्हा अधोरेखित झाला.

# निवडक



## सेवा सप्ताहाचा उत्साहात शुभारंभ

**नागोठणे :** लायन्स क्लबच्यावतीने सेवा सप्ताह अभियानाचा शुभारंभ गुरुवारी (दि.१) नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सपोनि रविंद्र पारखे यांच्या हस्ते करण्यात आला. या सप्ताहात दि.१ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत विविध समाजोपयोगी व जनसेवेचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये घरातील अनावश्यक इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे संकलन करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे, पर्यावरण स्वच्छता मोहीम, चाईल्ड कॅन्सर अवेअरनेस, मधुमेह तपासणी, सायबर क्राईमविषयी मार्गदर्शन, नागोठणे शहर जनजागृती रॅली, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच अन्नदान इत्यादी विविध लोकहितकारी उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांची माहिती लायन्स क्लबचे सचिव लायन डॉ. अनिल गिते यांनी उपस्थितांना दिली. लायन्स क्लबच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक करताना सपोनि रविंद्र पारखे यांनी क्लबच्या विविध सेवाकार्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

## मुरूडमधील शाळेला पंखा भेट

**आगरदांडा :** मुरूड येथील सर एस.ए. हायस्कूल मधील इयत्ता दहावीची पालक-शिक्षक-विद्यार्थी सहविचार सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेदरम्यान शाळेचे माजी विद्यार्थी व समाजसेवक अरविंद गायकर यांनी शाळेसाठी पंखा देण्याचे आश्वासन दिले होते. आपल्या शाळेबद्दलची आस्था आणि सामाजिक बांधिलकी जपत अरविंद गायकर यांनी पंखा शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे यांच्याकडे सुपूर्द केला. शाळेच्या गरजा लक्षात घेऊन माजी विद्यार्थ्यांनी केलेली ही मदत कौतुकास्पद असून, या पंख्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक सुखकर शैक्षणिक वातावरण उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. यावेळी शाळेच्या वतीने अरविंद गायकर यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. माजी विद्यार्थी तसेच समाजातील विविध घटकांनी शाळेच्या प्रगतीसाठी अशाच प्रकारे सहकार्य करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.



## महापालिकेत महापुरूषांना अभिवादन

**खांदेश्वर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच, महापालिका मुख्यालयासमोरील उद्यानातील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी उपायुक्त स्वरूप खारगे, सहायक आयुक्त बाळाराम रातांबे, सामान्य प्रशासन विभागाच्या प्रमुख कीर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, लिपिक विष्णू सांगळे, लिपिक संदीप पगडे, अग्निशमन दलाचे कर्मचारी तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या मूल्यांनुसार सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला.



## नाईक महाविद्यालयात स्वच्छता अभियान

**कोर्लई :** मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात ‘‘एक तास, एक साथ स्वच्छता’’ उपक्रम तसेच एड्स जनजागृती विषयावर निबंध स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने राबविण्यात आलेल्या या स्वच्छता मोहिमेंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून संपूर्ण महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि रेड रिबीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स जनजागृती या विषयावर निबंध स्पर्धा पार पडली. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. के. कांबळे यांनी आरोग्यविषयक आणि सामाजिक जनजागृतीचे महत्त्व विषद करून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.



## ‘एक समग्र अभ्यास’ पुस्तकाचे अनावरण

**माणगाव :** माणगाव येथील द.ग. तटकरे महाविद्यालयातील इतिहास विभागाचे सहाय्यक प्राध्यापक दिपेश केकाणे यांनी लिहिलेल्या ‘‘भारतीय ज्ञान प्रणाली, वैद्यकशास्त्र व महाराष्ट्रातील शिल्पकला यांचा एक समग्र अभ्यास’’ या पुस्तकाचे अनावरण उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमावर आधारित या पुस्तकामध्ये भारतीय ज्ञान प्रणाली, वैद्यकशास्त्र तसेच महाराष्ट्रातील समृद्ध शिल्पकला परंपरेचा अभ्यासपूर्ण व समग्र आढावा घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना अभ्याससत्रातील विषयाचे सुलभ आणि व्यापक आकलन व्हावे, तसेच भारतीय ज्ञानपरंपरा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाची ओळख व्हावी, हा या पुस्तक लेखनामागील प्रमुख उद्देश आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
४ सप्टेंबर
१) सीमा चंद्रराम मोकल
अलिबाग, ४-९-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**विश्वनाथ (विलास) निगळ्ये, ठाणे**



**कै. लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग**

**कै. अंजना दत्तात्रेय चौलकर, स्मरणार्थ, मुरुड जंजिरा**

# ऑनलाइन खरेदीच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

- **रोडपालीतील स्विगी इन्स्टा मार्टवर धाड**
- **मुदतबाह्य बिस्किटे आढळल्याचा दावा**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

काही मिनिटांत घरपोच वस्तू मिळत असल्याने ऑनलाइन खरेदीला नागरिकांची पसंती वाढत असतानाच, रोडपाली येथे घरपोच खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करणारा प्रकार समोर आला आहे. ग्राहकांच्या तक्रारीनंतर नगरसेवक रामदास शेवाळे यांनी कळंबोली-तळोजा जोडरस्त्यालगत असलेल्या स्विगी इन्स्टा मार्टमध्ये जाऊन पाहणी केली. यावेळी काही खाद्यपदार्थ मुदतबाह्य, खराब, बुरशी किंवा कीड लागलेल्या अवस्थेत आढळल्याचा दावा करण्यात आला.

या प्रकाराची माहिती मिळताच कळंबोली पोलिसांसह अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. संबंधित माल ताब्यात घेऊन पंचनामा करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

रोडपाली परिसरातील काही ग्राहकांनी ऑनलाइन मागविलेल्या



वस्तूंच्या गुणवत्तेबाबत तक्रारी केल्याचे रामदास शेवाळे यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी प्रेम डांगे, गणेश ओतारे, कुमार नलवडे यांच्यासह पदाधिकाऱ्यासोबत मार्टमध्ये जाऊन वस्तूंची पाहणी केली. यावेळी काही वस्तूंच्या गुणवत्तेबाबत व्यवस्थापनाकडे विचारणा करण्यात आली.

यानंतर कळंबोली पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह नाईक, अभयसिंह काळे यांच्यासह कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाला माहिती देण्यात आली.

कळंबोली येथील अन्न व औषध प्रशासनाच्या प्रभारी अधिकारी अंकिता गावडे यांच्यासह अधिकाऱ्यांनी मार्टमधील खाद्यपदार्थ, फळे, भाजीपाला आणि अन्य वस्तूंची पाहणी केली. या तपासणीदरम्यान मुदतबाह्य बिस्किटे, किडे लागलेला तांदूळ, बुरशी आलेली काजू कतली, खराब आईस्क्रीम, पनीर, पराठे, रोटी तसेच सीताफळे, टोमॅटो आणि अन्य भाजीपाला आढळल्याची माहिती देण्यात आली आहे.

अन्न व औषध प्रशासनाने संबंधित माल ताब्यात घेतला असून घटनास्थळी पंचनामा करण्यात आला आहे. संबंधित खाद्यपदार्थांची अधिकृत तपासणी केल्यानंतरच त्याबाबत अंतिम निष्कर्ष स्पष्ट होणार आहेत. त्यामुळे सध्या आढळलेल्या वस्तूंबाबत करण्यात आलेले दावे हे अधिकृत तपासणी अहवालाच्या अधीन आहेत.

ऑनलाइन खरेदीमध्ये ग्राहकांना वस्तूंची प्रत्यक्ष पाहणी करण्याची संधी मर्यादित असते. त्यामुळे खाद्यपदार्थांची मुदत, साठवणूक, तापमान नियंत्रण आणि विक्रीपूर्व गुणवत्ता तपासणी यांना विशेष महत्त्व आहे. विशेषतः दूधजन्य पदार्थ, तयार खाद्यपदार्थ, आईस्क्रीम, पनीर, फळे आणि भाजीपाला यांची योग्य पद्धतीने साठवणूक न झाल्यास त्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता असते.

रोडपालीतील तपासणीदरम्यान आढळलेल्या वस्तूंबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणी अहवालानंतरच पुढील कारवाई आणि वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या एका घटनेवरून संपूर्ण ऑनलाइन वितरण सेवेबाबत निष्कर्ष काढण्याऐवजी अधिकृत तपासणी अहवालाला महत्त्व राहणार आहे.



## खालापूर तहसील कार्यालयात दाखले वाटप

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रात सेवा संकल्प अभियान राबविले जात आहे. याच अनुषंगाने खालापूर तहसील कार्यालयाच्या वतीने सेवा संकल्प अभियान अत्यंत उत्साहात संपन्न झाले. या अभियानांतर्गत नागरिकांना विविध प्रकारच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. या कार्यक्रमात शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी सरकारच्या माध्यमातून ट्रॅक्टर आणि शेती नांगरणी यंत्रांचे (ट्रॅक्टर) वाटप करण्यात आले. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीकामात मोठी मदत होणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत कार्यक्रमात अपंग विद्यार्थ्यांना व्हीलचेअरचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, भाई शिंदे, गटविकास अधिकारी संदीप कराड, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खालापूर पोलीस निरीक्षक प्रदीप रायन्नावर, कल्याणी पाटील, मल्हारी शिंदे, धनराज बिक्कड, संजय ठाकूर, बालाजी वाघमोडे, अमित कुरुंगळे, संदेश पानसरे, भरत सावंत, माणिक सानप, सचिन वाघ, योगराज महाजन, जयश्री मोरे, सुवर्णा कोल्हे, वैशाली बावा, अमोल वाघ, सुग्रीव वाघ, अशोक सुसलादे आदी कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जगदीश मराजगे यांनी केले.

## विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रशिक्षण

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीसाठी केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून त्यांचे मनोबल, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता विकसित करणेही आवश्यक आहे. याच उद्देशाने लायन्स इंटरनॅशनल आणि लायन्स क्लब ऑफ खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी दोन दिवसीय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन वसंत देशमुख मेमोरियल स्कूलमध्ये करण्यात आले. या कार्यशाळेत चेंबूर, खारघर, पनवेल आणि खोपोली येथील सुमारे ४५ शिक्षकांनी सहभाग घेतला. परिपूर्ण समाज घडविण्यासाठी तरुण पिढीची योग्य जडणघडण होणे आवश्यक असून, त्याच दूरदृष्टीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे प्रवीण सरनाईक यांनी सांगितले. यावेळी लायन्सचे प्रवीण सरनाईक, संजीव सूर्यवंशी, विजय गणात्रा, अनिल जाधव, लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या अध्यक्षा शैली मेहता, वसंत देशमुख मेमोरियल स्कूलचे अध्यक्ष उल्हासराव देशमुख, नारायण कट्टी आदी उपस्थित होते. दोन दिवसीय कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प अधिकारी तेजस्वी देशमुख, अविनाश राऊत यांच्यासह संपूर्ण टीमने मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत साठे यांनी केले.

## संगणक भेट

**उरण :** आधुनिक युगात संगणक ज्ञान हे खूप महत्वाचे आहे यासाठी आधुनिक युगातील तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी, या उद्देशाने इन्नर व्हील क्लब ऑफ बॉम्बे डाऊनटाऊन यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा, सारडे येथे संगणक भेट देण्यात आला. या कार्यक्रमास हेतल खोना, भारती विक्रमसि, आशिता दावडा, मिनल शहा, संजीवनी श्रृंगारे, रोशन पाटील, समृद्धी वऱ्हाडी, अपूर्वा घरत, रश्मी पवार, वनिता पाटील, नागेंद्र म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, प्रकाश माळी, नितीन म्हात्रे, जयेश म्हात्रे, विनायक म्हात्रे, उज्वला पाटील, पूनम पाटील, कविता म्हात्रे, मंगेश पाटील, ज्योत्स्ना पाटील तसेच विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

## गणेश भोईटे यांचा ठाणे गौरव पुरस्काराने सन्मान

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न मांडणाऱ्या गणेश भोईटे यांच्या १८ वर्षांच्या रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यासह पत्रकारितेतील योगदानाचा ठाणे महानगरपालिकेने 'ठाणे गौरव' पुरस्काराने सन्मान केला. ठाणे महानगरपालिकेच्या वर्धापनदिनानिमित्त राम गणेश गडकरी रंगायतन येथे आयोजित कार्यक्रमात खा. नरेश म्हस्के यांच्या हस्ते भोईटे यांना मानचिन्ह प्रदान करण्यात आले. भोईटे यांनी ठाणे शहरातील पाणीपुरवठा, वाहतूक, नागरी सुविधा, पुनर्विकास, रोजगार आणि सामाजिक प्रश्नांना सातत्याने आपल्या लेखणीतून वाचा फोडली. मात्र, प्रश्न केवळ मांडायचे नाहीत,




तर त्यातून मार्गही शोधायचा, या भूमिकेतून त्यांनी सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगार, स्वयंरोजगार, स्पर्धा परीक्षा आणि कौशल्यविकासाबाबत मार्गदर्शन केले आहे.

आर्थिक अडचणींमुळे शिक्षण आणि रोजगाराच्या संधींपासून दूर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना विनामूल्य मार्गदर्शन व शैक्षणिक सहकार्य देत त्यांनी अनेक युवकांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याची प्रेरणा दिली.

सामाजिक बांधिलकीची जाण यांची सांगड घालत त्यांनी आपले कार्य सातत्याने सुरू ठेवले. या सोहळ्यास महापौर शर्मिला पिंपळोळकर, खा. नरेश म्हस्के, आ. रवींद्र फाटक, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, चंद्रकांत भोईटे, हणमंत जगदाळे, राम रेपाळे, पवन कदम, नम्रता कोळी, उषा वाघ, मीनल संखे, सुखदा मोरे, रमाकांत मढवी, मनोज शिंदे, देवराम भोईर आदी उपस्थित होते.

## कष्टकरी नगर येथे स्वच्छता अभियान

**रसायनी :** महात्मा गांधी जयंतीनिमित्त 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत रसायनी येथील कष्टकरी नगर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करून आरोग्याचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाज कल्याण आयुक्त अलिबाग-रायगड तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी परिसरातील सार्वजनिक ठिकाणे, रस्ते व परिसराची स्वच्छता करण्यात आली.

# साप्ताहिक राशिभविष्य दि.०४ ते १० ऑक्टोबर २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### अपूर्ण कामे पूर्ण होतील



**मेष :** राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपली अपूर्ण राहिलेली कामे आपण पूर्ण करू शकाल. प्रलंबित कामे पूर्ण झाल्याने आपणास नवीन आयोजनाचा मार्ग सापडेल. आपण मागील काही दिवसांपासून कमी बोलत आहात किंवा संपर्क सुद्धा पूर्वीच्या मानाने कमी करत आहात. सुरुवातीस हि स्थिती अशीच राहील. आठवड्याच्या मध्यापासून त्यात सुधारणा होऊ शकते. विशेषतः लोकांच्या भेटीगाठी किंवा इतरांशी चर्चा वाढतील. संपर्काची नवीन साधने व सामाजिक माध्यमात आपण अधिक सक्रिय राहाल. मात्र, आपल्या शब्दांचा चुकीचा अर्थ काढला जाणार नाही याची काळजी आपणास घ्यावी लागेल, अन्यथा आपल्या संबंधात कटुता निर्माण होऊ शकते. आपणास अनेकदा वैभवी जीवनशैलीचा व महागड्या वस्तू खरेदी करण्याचा मोह होईल. नकारात्मकतेकडून आपण सकारात्मकतेकडे मार्गक्रमण कराल. **महिलांना :** प्रत्येक कार्यात व जीवनाविषयी आपला आत्मविश्वास वाढेल. अति आत्मविश्वास बाळगू नका, अन्यथा अडचणीत सापडावे लागेल. या वर्षात आपण आपली हौसमौज सढळहस्ते पूर्ण कराल. **शुभ दिनांक :** ०५,०६.

### आर्थिक बाबतीत सावध राहा



**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता व्यावसायिक आघाडीवर आपण उत्तम प्रगती साधू शकाल. साप्ताहाच्या अखेरच्या दिवसात भागीदारी कार्यात काळजी घ्यावी. व्यक्तीगत व व्यावसायिक जीवनात प्रियव्यक्तीचा सहवास व सहकार्य मिळवू शकाल. बहुतेक वेळा प्रियव्यक्तीशी किंवा वैवाहिक जोडीदाराशी सलोखा राहील. त्या दरम्यान संबंधांचे उत्तम गृहसौख्य लाभेल. आर्थिक बाबतीत सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. साप्ताहाच्या अखेरीस स्थितीत थोडी सुधारणा झाली तरी खर्चावर नियंत्रण न ठेवल्यास इतरांकडून आर्थिक मदत घ्यावी लागेल. विशेषतः आपल्या प्राप्तीत अनिश्चितता राहिल्याने खर्चाचे पूर्व नियोजन करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांसाठी हे वर्ष उत्तम असले तरी भविष्यातील शिक्षणासाठी प्रवेश घेण्याच्या कार्याच्या किंवा वाटाघाटीच्या दरम्यान काळजी घ्यावी लागेल. नंतर आपल्या अभ्यासात अजाणतेपणाने काही अडचणी येण्याची शक्यता आहे. **महिलांना :** आरोग्यास विशेष त्रास होणार नसला तरी नाक-कान-घसा यांच्याशी संबंधित त्रास होण्याची शक्यता आहे. घरघूती संबंध उत्तम राहतील. **शुभ दिनांक :** ०७,०८.

### विचारपूर्वक निर्णय घ्या



**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता अति खर्च करताना आपल्या मर्यादित प्राप्तीचा विचार करूनच खर्च करावा. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा. हे दिवस आपल्यासाठी मिश्रफलदायी आहे. सतत चढ-उताराचे वातावरण राहिल्याने आपणास प्रत्येक क्षेत्रात समतोल साधून मार्गक्रमण करावे लागेल. कामात आपणास नीरसता किंवा थकवा जाणवेल. मागील अनेक दिवसांपासून आपले जीवनचक्र संथ गतीने चालत असल्याच्या आपल्या तक्रारीसह आपण मार्गक्रमण करत आलात. सुरुवातीस ही तक्रार राहिली तरी आठवडा संपताना त्यात सुधारणा होऊ लागेल. आपले विचार सकारात्मक होऊ लागतील. मात्र, मध्या नंतर प्राप्तीची गती संथ झाल्याने आपल्या स्थितीत बदल होईल. **महिलांना :** एकूणच मानसिक त्रास तर राहणार आहे. अशावेळी मनोबल दृढ ठेवून आपणास कोणत्याही परिस्थितीस सामोरे जाण्यास सज्ज राहावे लागेल. **शुभ दिनांक :** ०८,०९.

### अनावश्यक खर्च होण्याची शक्यता



**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्याला घरातील संबंधात एकमेकांवर विश्वास ठेवावा लागेल, इतकेच नव्हे तर कधीकधी नमते सुद्धा घ्यावे लागेल. सुरुवातीस अनावश्यक किंवा चैनीसाठी खर्च होण्याची शक्यता आहे. विशेषतः भिन्नलिंगी संबंधात आपल्या जोडीदारास अधिक वेळ द्यावा लागेल तसेच त्यांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न सुद्धा करावा लागेल. हळू हळू नंतर घरघूती संबंधात सलोखा राहील. व्यावसायिक आघाडीवर भागीदारी कार्ये संथ गतीने मार्गक्रमण करण्याची शक्यता आहे. करार करण्यात कदाचित विलंब होऊ शकतो. आठवड्याच्या शेवटी आपली प्राप्ती संथ गतीने होण्याची शक्यता असल्याने आपणास आवश्यक खर्चाची तरतूद अगोदरपासूनच करून ठेवावी लागेल. पैसे जेथून येणार असतील तेथून येण्यास विलंब होऊ शकतो. नोकरी करणाऱ्यांना कष्ट करण्याची तयारी ठेवावी लागेल. **महिलांना :** आपला कामातील उत्साह वाढू शकेल असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. व्यावसायिकांना इतरांवर अवलंबून राहून केलेल्या कार्यात पश्चातापाची वेळ येण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक :** ०५,०७.

### धार्मिक कार्यात सहभागी व्हा



**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सामाजिक व धार्मिक कार्यात सहभागी होऊ शकाल. हे वर्ष विद्यार्थ्यांसाठी सामान्य असल्याने त्यांना सुरवातीपासूनच नियोजनपूर्वक अभ्यास करावा लागेल. या दिवसात आरोग्य मध्यम राहील. येणारा कालावधी आपल्यासाठी एकंदरीत चांगले आहे. आपणास प्रगतीच्या अनेक संधी मिळतील. व्यावसायिक आघाडीवर आपण मोठे ध्येय गाठू शकाल. या वर्षी आपण प्रगतीसाठी नवीन ध्येय निर्धारित करून ते पूर्ण करण्याची व्यूहरचना आखण्याची शक्यता आहे. कामाप्रती अभिरुचीत व विचारसरणीत नाविन्याची अपेक्षा आपण बाळगू शकता. फेब्रुवारी नंतर कामाप्रती आपणास आळस वाटू लागला तरी आपला उत्साह जर कमी केला नाहीत तर त्यात विशेष फरक पडणार नाही. नोकरीत वरिष्ठांचे उत्तम सहकार्य मिळून नवीन संधी प्राप्त होऊ शकतील. आपण आत्मप्रेरित राहण्यास विसरू नका. **महिलांना :** नवीन काही करण्यास हरकत नसली तरी जर आपले कौशल्य व ज्ञान वृद्धीसाठी प्रयत्न केल्यास भविष्यात कारकिर्दीत खूप मोठा फायदा होऊ शकेल. व्यक्तीगत आयुष्यात अनेक चढ-उतार येतील परंतु समाधानी वृत्ती बाळगल्यास संबंधातील समतोल आपण साधू शकाल. **शुभ दिनांक :** ०४,१०.

### वडिलधाऱ्यांचे मार्गदर्शन घ्या



**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता सध्या आपले ज्यांच्याशी संबंध आहेत त्यांच्या बद्दल आपण अधिक भावनाशील होण्याची शक्यता आहे. या आठवड्यात आपल्या जीवनात प्रणयास अधिक महत्व असेल. या दरम्यान आपण नवीन संबंधाची सुरुवात करण्याचा किंवा असलेल्या संबंधास नवीन वळण देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्याची शक्यता आहे. या वर्षात आपल्या जीवनात असे काही प्रसंग उद्‌भवतील कि पैश्यापेक्षा संबंधास किती जास्त महत्व असते याची आपणास जाणीव होईल. कारकिर्दीच्या बाबतीत वडिलधाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन आपण त्यांचे मन जिंकू शकाल. त्यांच्या मनात आपल्या विषयी आदर निर्माण होऊन त्यांचे आशीर्वाद जीवनात प्रगती साधण्यासाठी मदतरूप ठरतील. व्यावसायिक आघाडीवर या महिन्या दरम्यान चांगली संधी मिळण्याची अपेक्षा आपण बाळगू शकता. **महिलांना :** प्रणयी जीवनासाठी वर्षाच्या सुरुवातीचे दिवस अनुकूल असून त्यात मध्यानंतर आपल्या प्रिय व्यक्तीस खुश ठेवण्यासाठी आपणास अधिक सक्रिय राहावे लागेल. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. **शुभ दिनांक :** ०५,०९.

### फसवणूक होण्याची शक्यता



**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात सुरुवातीला हा साप्ताह आव्हाने, संघर्ष, मेहनत व यशाचे मिश्रण देणारे आहे. प्रणयी जीवनात आपल्याला वर्षभर काळजी घ्यावी लागणार आहे. अखेरच्या दिवसात आधीच्या तुलनेत परिस्थितीत सुधारणा झाली तरी कौटुंबिक संबंधात काही कटुता येण्याची शक्यता आहे. प्रेमसंबंधाच्या बाबतीत सतत अनिश्चितता जाणवेल. या दिवसांत प्रणयी जीवनात व भावनेच्या भरात कोणताही निर्णय न घेता थोडा व्यावहारिक दृष्टिकोन बाळगावा. आता सुरु झालेल्या संबंधाच्या भविष्या विषयी काही सांगणे अशक्यप्राय वाटत असल्याने नवीन व्यक्तीशी संबंध जुळवताना किंवा वैवाहिक जोडीदाराच्या शोधात आपली फसवणूक होण्याची शक्यता आहे. **महिलांना :** चालू परिस्थितीत कोणतेही नवीन संबंध न जुळवणे हितावह ठरेल. जे आधीपासूनच संबंधात आहेत त्यांना सुद्धा सध्या आपल्या जोडीदारास खुश ठेवण्यासाठी किंवा परस्पर आत्मीयता टिकविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. संभाव्य त्रास टाळण्यासाठी व्यायामातील नियमितता व आहारावर विशेष लक्ष द्यावे लागेल. **शुभ दिनांक :** ०६,०८.

### कामाची प्रशंसा होईल



**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. विद्यार्थी वर्ग आधी पासूनच जर अभ्यासा बाबतीत अधिक जागरूक राहिलात तर फायदा होऊ शकेल. आरोग्याच्या दृष्टिकोनातून सुरुवात चांगली असली तरी ऋतुमानातील बदलाचा आरोग्याच्या बाबतीत हयगय न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. व्यावसायिक आघाडीवर काही आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागेल. या दिवसांत शक्यतो शेयरची कामे, वायदे बाजार इत्यादींपासून दूर राहावे, अन्यथा मोठे नुकसान होऊ शकते. सुरुवातीच्या दिवसात तांत्रिक कार्यात आपण उत्तम प्राप्ती करू शकाल. आठवड्याच्या मध्यानंतर आपल्या कामाच्या गतीस थोडी खीळ बसेल. सध्या आपणास मिळणाऱ्या लाभात थोडा विलंब झाला तरी उत्तरार्धात चांगले फळ मिळण्याची आशा आपण बाळगू शकता. **महिलांना :** या दिवसांत दीर्घ पल्ल्याच्या प्रवासाचे आयोजन करू शकाल. ज्यांना नोकरीत बदल करावयाचा आहे त्यांना योग्य संधी मिळू शकेल. या वर्षात व्यावसायिक आघाडीवर आपले जाळे विस्तारण्यावर आपले लक्ष केंद्रित करू शकाल. **शुभ दिनांक :** ०७,०९.

### इतरांवर विसंबून राहू नका



**धनु :** राशीसाठी या सप्ताहात आपण नवीन ओळखी वाढविण्यासाठी आपण अनेकदा व्यावसायिक स्नेहसंमेलन किंवा बैठका, किंवा कार्यशाळा आयोजित करण्याची किंवा त्यात सहभागी होण्याची शक्यता आहे. दीर्घकालीन गुंतवणुकीतून सुद्धा फायदा होऊ शकेल. हे दिवस आपल्यासाठी विविध आघाड्यांवर महत्वपूर्ण ठरेल. नोकरी-व्यवसायात प्रगती झाली तरी संपूर्ण कामात मूळभूत बदल करण्याचे विचार आपल्या मनात येतील. मात्र त्याची अंमल बजावणी करताना काळजी घ्यावी. या वर्षात नवीन महिन्यापर्यंत कोणतेही बदल किंवा नवीन सुरुवात करताना दीर्घकालीन विचार करा, तसेच इतरांवर विसंबून न राहता स्वतःच परिस्थितीचे आकलन करून पाऊल उचलावे. लोखंड, सिमेंट, अवजड मशिनरीसाठी लागणाऱ्या वस्तू किंवा त्यांच्याशी संबंधित सेवा, अवजड वाहनांशी संबंधित कार्यात ह्या दिवसात आपण उत्तम प्रगती साधू शकाल. **महिलांना :** आपले ध्येय साध्य करण्यासाठी आपण अपार कष्ट करू शकाल. कौटुंबिक संबंधात त्यातही विशेषतः मातेशी व्यवहार करताना सावध राहावे लागेल. **शुभ दिनांक :** ०५,०७.

### गैरसमज होण्याची शक्यता



**मकर :** हा साप्ताह मकरराशीसाठी आपले ग्रहमान पाहता आप्तांशी गैरसमज होण्याची शक्यता अधिक आहे. प्रणयी जीवनात विशेष त्रास जाणवत नसला तरी सुरवातीच्या दोन दिवसात आपले संबंध मंदावण्याची शक्यता आहे. जर विवाहा विषयी निर्णय घ्यावयाचा असेल तर तो पुढील आठवड्यात मध्यानंतर घ्यावा. आठवड्याच्या शेवटच्या दिवसांत आपल्या संबंधातील सलोखा वाढेल. सध्या आपण कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी खर्च कराल परंतु त्यात यशप्राप्तीची अपेक्षा बाळगू नका. अनेक दिवसांपासून कोणाशी मतभेद झाले असल्यास ह्या वर्षी त्याचे सुखद निराकरण होऊ शकेल. विद्यार्थ्यांसाठी चालू आठवड्याची सुरवात चांगली असली तरी मध्यानंतर त्यांना मेहनत वाढवावी लागेल. एखादा विषय समजून घेण्यासाठी आपणास अधिक मेहनत करावी लागण्याची शक्यता आहे. **महिलांना :** या सप्ताहपर्यंत आपल्या मित्र-मंडळात वाढ होईल. आरोग्याच्या बाबतीत या वर्षी अनेक चढ-उतार येतील असे दिसते. कुटुंबातील इतर महिलावर्गाशी सुद्धा क्षुल्लक कारणांवरून वाद होण्याची शक्यता दिसते. **शुभ दिनांक :** ०६, ०८.

### मित्रांचे चांगले सहकार्य मिळेल



**कुंभ :** राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या आठवड्यात करिअरमध्ये चढ-उतार येतील. ग्रहांच्या संक्रमणाच्या परिणामांचा स्वीकार करायला हवा. या दिवसांत बुधवार नंतर प्रत्येक कामात यश मिळेल. गुरुवार ते शनिवार या काळात पैशांची आवक होण्याची चिन्हे आहेत. या दिवसांत तुमचा आत्मविश्वास वाढेल. कामातील स्थितीत चांगली प्रगती होईल. व्यवसाय वाढविण्यासाठी अधिक चांगले प्रयत्न करण्यासाठी प्रयत्नशील राहा. धार्मिक कारर्यात सहभागी व्हाल. व्यवसायात चांगला लाभ होईल. शनि महाराज या वेळी आपले नुकसान न करता तुम्हाला चांगला लाभ देतील. नोकरीत निष्काळजीपणाने वागू नका. तसेच व्यावसायिकांसाठी शुभ संधी उपलब्ध होईल. अन्न दान करा. आर्थिक प्रगतीमुळे आनंद होईल. या आठवड्याचा शुभ रंग-निळा आहे. या दिवसांत विद्यार्थ्यांना चांगले यश प्राप्त होईल. **महिलांना :** मंगळवारपर्यंतचा कालावधी थोडा संघर्षाचा आहे. वाहन खरेदी करण्याचा विचार कराल. मित्रांचे चांगले सहकार्य मिळेल. अन्नदान करा. **शुभ दिनांक :** ०७, ०९.

### चुकीच्या कामांपासून दूर राहा



**मीन :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता हा आठवडा नोकरीत चांगले यश मिळवून देईल. आरोग्य चांगले राहील. रखडलेली कामे मार्गी लागतील. मित्रांच्या भेटीगाठी होतील. कामात वरिष्ठांचे चांगले सहकार्य मिळेल. या आठवड्याचा शुभ रंग-पांढरा आहे. सुरुवातीपासूनच तुम्हाला चांगले यश मिळेल. रखडलेली कामे पूर्ण होतील. गणेशाची पूजा करा. विद्यार्थ्यांसाठी हा आठवडा खूप चांगला आहे. रविवारपासून मंगळवारपर्यंतचा काळ थोडा संघर्षाचा आणि अडथळे निर्माण करणारा ठरु शकेल. मंगळवार नंतर व्यवसायात चांगले यश प्राप्त होईल. धार्मिक कार्य होतील. कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्याबद्दल जागरूक राहा. रखडलेली कामे मार्गी लागतील. उत्पन्नाचे, व्यापार वाढीचे नवे मार्ग उपलब्ध होतील. आरोग्य चांगले राहील. श्री गणेशाची पूजा करा. नोकरीत दिलेली जबाबदारी वेळेवर पूर्ण करा. नवीन कार्याची सुरुवात करु शकता. नोकरी, व्यवसायातही प्रगती होईल. **महिलांना :** हा आठवडा तुमच्यासाठी प्रगतीशील आहे. गुरुवारी अन्न दान करा. कोणत्याही प्रकारे चुकीच्या कामांपासून दूर राहिल्यास आपल्या हिताचे राहील. वडिलोपार्जित संपत्तीमुळे आपला तणाव वाढण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक :** ०४,०७.

# आदिवासी बांधवांना दाखले वाटप



| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाच्या सेवा संकल्प अभियान अंतर्गत (दि.२) ऑक्टोबर रोजीफणसवाडीयेथेविशेषकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात स्थानिक आदिवासी बांधवांना प्रातिनिधिक स्वरूपात गाव नमुना ७ ई (७/१२) चे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी (प्रांत) पनवेल पवन चांडक तसेच तहसीलदार पनवेल मिनल भामरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या प्रसंगी संजय घरत, गिरीश पाटील, तानाजी पाटील, अजित पाटील, प्रविण पाटील उपस्थित होते.

अभियानाच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यामध्ये पळस्पे महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी शशिकांत सानप, कसळखंडचे तलाठी विनय पाटील, पळस्पेच्या तलाठी प्रिया वैती, कोळखेचे तलाठी अमित ताथवडे आणि विचुंबेचे तलाठी सचिन पवार यांचा समावेश होता. कार्यक्रमा दरम्यान उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते फणसवाडी येथील आदिवासी बांधवांना गाव नमुना ७ ई चे वाटप करण्यात आले. शासनाच्या या उपक्रमामुळे स्थानिक आदिवासी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून उपस्थित नागरिकांनी महसूल प्रशासन व लोकप्रतिनिधींचे आभार मानले.

## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे बोपेले, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली बिनशेती जमिन मिळकत आमचे अशिल श्री. भगवान बाळू उबाळे यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक मे. देढिया इस्टेट एल एल पी तर्फे निवृत्त भागीदार लक्ष्मीचंद मेघजी देढिया व निना लक्ष्मीचंद देढिया यांचे नाव कमी करून नवीन भागीदार मे.देढिया इस्टेट एल एल पी तर्फे भागीदार मोनेश लक्ष्मीचंद देढिया व निशा महेंद्र कोठारी यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ६२/४ | ८.९७.०० | ८९.७० |

वरील वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०४/१०/२०२६.

सही / -
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी, नेरळ (पू) ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८०८७४३०४४७

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे चिंचपाडा पेण, ता.पेण जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल प्रकाश मधुकर पाटील व गणेश सुर्यकांत पाटील यांनी त्याचे यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.अनारसिंग भुरसिंग खरवड यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

मौजे चिंचपाडा, ता.पेण, जि.रायगड येथील सि.स.नं.११३/० प्लॉट नं. १,२,३,४ क्षेत्र १.१६३ पैकी ०.५४.०० हे.आर. या मिळकतीमध्ये जगदंबा आशिष गार्डन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील तळ मजल्यावरील निवासी सदनिका नं. सी-००२, त्याचे क्षेत्र ४८७ चौ.फुट कारपेट त्याचा मालमत्ता क्र. PENN०००१३६५६,W१४Z२०१३८६५ अशा वर्णनाची निवासी सदनिका

वरील निवासी सदनिका ही आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत दयावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि.४/१०/२०२६

सही
**ॲड हेमा ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशनजवळ तहसिल ऑफिस आवारात, कोटआळी पेण, ता.पेण जि.रायगड-४०२१०७
मो. नं.९८२२०३०३८९,

## डॉ.आमटे यांची कोतवाल वाडी ट्रस्टला भेट

**नेरळ** : ज्येष्ठ समाजसेवक डॉ प्रकाश आमटे यांनी शुक्रवारी (दि.२) नेरळ येथे स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या कोतवाल वाडी ट्रस्टला भेट दिली. ट्रस्टच्या कार्याची माहिती घेतल्यानंतर या ट्रस्टचे कौतुक डॉ प्रकाश आमटे यांनी केले. नेरळ येथील कोतवालवाडी ट्रस्ट स्वतंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यसैनिक हरिभाई भडसावळे यांनी स्थापन केली. गेली ८० वर्षे हा संस्थेचे कार्य सुरू असून या कार्याची माहिती घेण्यासाठी धावती भेट ज्येष्ठ समाजसेवक महाराष्ट्र भूषण डॉ. प्रकाश आमटे यांनी भेट दिले. त्यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी मंदाकिनी आमटे या उपस्थित होत्या. यावेळी कोतवाल वाडी ट्रस्टच्या अध्यक्षा संध्या देवस्थळे यांनी स्वागत केले. त्यावेळी संस्थेचे विश्वस्त शेखर भडसावळे, बाळकृष्ण पादीर, डॉ नेहरकर आदी उपस्थित होते.

# प्राथमिक आरोग्य केंद्राला वाजेकर महाविद्यालयाची भेट



| उरण | प्रतिनिधी |

शैक्षणिक शिक्षण आणि सामाजिक सेवा यामध्ये दुवा निर्माण करण्याच्या उद्देशाने फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या आरोग्य केंद्र समितीने कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. या भेटीत ग्रामीण आरोग्य केंद्राच्या कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेत विद्यार्थ्यांना आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाच्या बाबी समजावून सांगण्यात आल्या.

विद्यार्थ्यांनी आरोग्य केंद्रातील डॉक्टर आणि कर्मचारी वर्गाशी संवाद साधला. त्यांनी लसीकरण मोहिमा, मातृत्व व बाल संगोपन, आणि सर्वसामान्य आजारांवरील उपचार यांसारख्या सेवा कशा दिल्या जातात हे समजून घेतले.

या भेटीबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर म्हणाले की, अशा प्रकारच्या भेटी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात. ग्रामीण भागातील आरोग्यसेवेच्या महत्त्वाची जाणीव त्यांना होते. या भेटी साठी आयोजन डॉ. झेलम झेंडे यांनी केले, त्यात डॉ. सुजाता पाटील मॅडम, प्रा. देवेंद्र कांबळे आणि प्रा. विशाखा पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.

महाविद्यालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्र भविष्यात आरोग्य जागरूकता कार्यक्रम राबवण्यासाठी आणि सामूहिक आरोग्य शिबीरे आयोजित करण्यासाठी प्रयत्न करतील.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री.किशन अधिक नामदास रा.करंजडे रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगाव बुद्रुक, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ७४ | ६-७१-३० | १४-९५ |
| या एकूण क्षेत्रापैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ०-२०-०० हे.आर | | |

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक: ०४/१०/२०२६

सही / -
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाचा गाळा त्या गाळयाचे विद्यमान मालक मोहम्मद अमिन खान यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सिटी सर्वे नं. ८१८ के/१ व ८३१ या मिळकतीवरील ओम चिंतामणी चेंबर्स सह गृह संस्था मर्या बालाजी नाका अलिबाग या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील कमर्शियल गाळा क्र. १०२, क्षेत्र ६०० चौ.फुट बिल्टअप (५५.७६ चौ.मी.) अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र.ALB000004208, जुना मालमत्ता क्र.Z1MKT004257, मॅन्युअल मालमत्ता क्र.१२९५ अ/५ या गाळयाबाबत.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक :०३/१०/२०२६

**ॲड. विराज शरद अंबुकर**
रा. थेरोंडा, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९०२८८५१२८०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-अंत्राट तर्फे निड, ता.कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| जयश्री पदमाकर तावडे | ६७ | ३ | ५०६ चौ.मी. | ५०.६० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१, ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# आदिवासी पाड्यांवर खाऊ वाटप



| उरण | प्रतिनिधी |

रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय व रॉबिनहूड आर्मीचा आदिवासी पाड्यांवरील संयुग सेवा यज्ञशिक्षणाची गंगा बहुजन, कष्टकरी आणि उपेक्षित घटकांच्या दारापर्यंत नेणारे द्रष्टे शिक्षणमहर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीचे औचित्य साधून उरण तालुक्यातील विविध दुर्गम आदिवासी कातकरी पाड्यांवर शाळेत जाऊन खाऊ वाटपाचा उपक्रम राबविला. राष्ट्रीय सेवा योजना विभाग, हिंदी विभाग, अर्थशास्त्र विभाग, मराठी विभाग वाणिज्य विभाग, बी एम एस विभाग व ग्रामीण विकास विभाग यांनी समन्वयाने सहभाग नोंदवला.

कंठवली आदिवासी वाडी आणि विंधणे आदिवासी वाडी येथील १३५ गरजू कुटुंबांना अन्नदान करण्यात आले. तसेच चिरनेर आक्कादेवी आदिवासी शाळा व अंगणवाडी परिसरातील २५ कुटुंबांना अन्नधान्य वितरित करण्यात आले. सारडे जिप शाळा ३८ विद्यार्थ्यांना, महाविद्यालयातील सर्व सफाई कामगारांनाही धान्य वितरित करण्यात आले. याशिवाय पीरवाडी येथील कातकरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील २५ विद्यार्थ्यांनाही अन्नधान्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रा. श्रीकांत गोतपागर, डॉ. झेलम झेंडे, डॉ. सुजाता पाटील, प्रा. देवेंद्र कांबळे, प्रा. गजानन चव्हाण, प्रा प्रांजल भोईर, प्रा. भूषण ठाकूर, प्रा. तन्वी कोळी, प्रा. रेणू माळी व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनै सहभाग नोदंविला.

## वैशाली कुराडे यांचे निधन

| रसायनी | प्रतिनिधी |



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या वैशाली सुरेश कुराडे यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. सामाजिक क्षेत्रात विशेषता महिलांच्या सक्षमीकरण कार्यात त्यांचा मोठा सहभाग होता. त्यांच्या पश्चात पती, मुलगी, मुलगा सचिन, सुना, नातवंडे आणि पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अग्नी संस्कार वेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकविस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे नारळाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| (खाते क्र.३६२) ईरम माज शेख, अकरम मुख्तार वरेकर, फातिमा मुख्तार वरेकर, मुख्तार ईस्माईल वरेकर, मोहिउद्दीन मुख्तार वरेकर | २१ | ५/अ | ४-६७-०० पैकी ०-९०-०० | ३ | ६० |
| (खाते क्र.५८१) अकरम मुख्तार वरेकर, मुख्तार ईस्माईल वरेकर | २१ | ५/अ | ४-६७-०० पैकी ०-३०-०० | ३ | ६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.१, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०१०१

सही / -
**ॲड.नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :-०४/१०/२०२६
मो.नं.९३७२९६४६६५

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीच्या विद्यमान मालक सुनिल भालचंद्र जोमराज, जगदिश दिगंबर जोमराज, विनिता विजय जोमराज, पराग विजय जोमराज, स्वप्नाली रोहित वैद्य, मंगला मनोहर जोमराज, अर्चना अशोक कारेकर, मानसी महेश वेदक, सिद्धांत गणेश जोमराज, संजना गणेश जोमराज सर्व रा.मु.पो.रेवदंडा, सध्या रा.मुंबई यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड | ४२/१/३ | १.०१.०० | ----- |
| रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड | ४२/१/१२/४ जि.सि.स.नं.१३९६ | ३.६०.०० | ----- |

सदर वर वर्णन केलेली मिळकत व सदर मिळकतीमधील ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा सदरी नोंदविलेले घर नं. ५०१/ब ही मिळकत.

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणुन दयावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणाचीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक : ०३/१०/२०२६

स्वाक्षरीत/-
**ॲड. सविता शं.पिंगळे**
सृष्टी बिल्डींग, दुसरा मजला, वेधशाळेसमोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसने असे कळविण्यात येते कि आमचे अशील यांनी खालील नमूद केलेल्या शेतजमीन मिळकती सदर मिळकतींचे मालक श्री विजय करुणाशंकर पाठक, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असून, सदर मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे.

| मौजे | सर्वे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.प्र | आकार |
|---|---|---|---|---|
| वंजारवाडी, ता. कर्जत, जि.रायगड | ६६ | १/अ | ०.२६.०० | ३.२५ |
| | ६७ | ११ | ०.०८.०० | ०.०६ |
| भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड | ४८ | ८ | ०.५४.०० | ०.३९ |

तरी वरील मिळकतींवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकारार, बयाणापावती, गहाणखत, दान, बक्षीस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, मृत्युपात्रांकित, चार्ज, लिन, वगैरे, कोणत्याही प्रकारचा, हक्क असल्यास संबंधितांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणाार यांच्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत रेजीस्टर पोस्टाने पाठवण्यात यावी, याप्रमाणे मुदतीनंतर कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वरील मिळकतीं निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आम्ही सदर मिळकतींच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली.

ठिकाण - कर्जत
तारीख ०४.१०.२०२६

सही/-
**अधिवक्ता अविष्कार अरुण अभंगे**
मो नं ८०८७३४९०१८
पत्ता - नेमीनाथ हाईट, मुद्रे बुद्रुक कर्जत रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मौजे अवसरे ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| अवधुत दिगंबर पूजारी व इतर | ५९ | १६ | ३०१ चौ.मी. | ३०.१० |
| | ५९ | १९ | ४९० चौ.मी. | ४९.०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१, ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

शनि. दि. १० ऑक्टो. रात्रौ ९.३० वा.
पी.एन.पी. नाट्यगृह (अलिबाग) A/C
ति. वि.६ ऑक्टो.पासून पीएनपी नाट्यगृह येथे सुरु
"अथर्व" प्रकाशित मयसभा निर्मित
महाराष्ट्र शासनाच्या अनुदानास पात्र नाटक
लग्न पंचमी



ऑनलाईन तिकिट विक्री bookmyshow सुरु
लेखिका - मधुगंधा कुलकर्णी
दिग्दर्शक - निपुण धर्माधिकारी
विदुला चौगुले, सुनील अभ्यंकर, मधुगंधा कुलकर्णी आणि स्वप्नील जोशी
तिकिटांसाठी संपर्क - चंद्रकांत पानकर ९८८१४६२४६६

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा What-sApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- **झेरॉक्स दुकानात मराठी टायपिंगसाठी** मुलगी पाहिजे. संपर्क : ९९२१५५०१२९
- जन्नावार हॉस्पीटल चेंढरे अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८० ३४५०९
- **Vacancy for Store Manager in furniture Store** Experience in Sales - 5+ years, Salary - 50,000 Per Month, Location Zirad. Contact - 9823585321
- **Vacancy in Furniture Factory as a office boy/girl,** Education - Graduation, Experience 3-4 years,Salary 20,000 Per Month, Location : Bamansure, Chondhi. Contact - 9823585321.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक मानसिक ताण राहील. महत्त्वाचे निर्णय प्रलंबित राहतील. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **वृषभ** : अनुभवींचा सल्ला कामी येईल. घरगुती व्यवसायात अनुकूलता राहील. आर्थिक समस्या उद्‌भवतील.
- **मिथुन** : रखडलेली कामं मार्गी लागतील. इतरांचा उपदेश ध्यानी घ्यावा. सरकारी कामं विलंबानं होतील.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. जुनी येणी सहज वसूल होतील. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **सिंह** : मनाप्रमाणे सारं घडत जाईल. प्रियजनांच्या भेटीने समाधान लाभेल. वरिष्ठांची मर्जी राखायला हवी.
- **कन्या** : कार्याचा योग्य मोबदला मिळेल. उत्साहवर्धक घटना घडतील. कामानिमित्त प्रवास सफल होईल.
- **तूळ** : मनाविरूध्द घटना संभवतात. आर्थिक व्यवहारात लाभ होईल. शिक्षण क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृश्चिक** : दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. आध्यात्मिक प्रगती होईल. स्थावर प्रश्नात तडजोड सोयीची ठरेल.
- **धनु** : सरकारी कामांबाबत समाधान लाभेल. विचारांना कृतीची जोड मिळेल. नातलगांचं सहकार्य लाभेल.
- **मकर** : प्रक्रिया उद्योगात संधी लाभतील. आर्थिक बाबतीत विचारानं रहावं. वैवाहिक सुख-समाधान लाभेल.
- **कुंभ** : ताण-तणाव वेळीच दूर करावेत. अनुभवींचा सल्ला कामी येईल. गृहसजावटीत अनुकूलता राहील.
- **मीन** : महत्त्वाची बोलणी आज करावीत. व्यवसायात नव्या संधी लाभतील. मुलांची विशेष प्रगती होईल.

हेल्थ टॉक

## बैठं काम असलं तरी...

कार्यालयांमध्ये कॉम्प्युटर, लॅपटॉपसमोर बसून काम करावं लागतं. दिवसातले आठ ते दहा तास आपण कॉम्प्युटरसमोर असतो. बैठ्या जीवनशैलीमुळे विविध आजार जडतात. त्यातच तासनतास कॉम्प्युटरसमोर बसून राहिल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो, पाठही आखडते. मात्र बैठं काम असतानाही तुम्ही निरोगी राहू शकता. या साठी खालील टिप्स फॉलो करा.

* कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप तुमच्या नजरेसमोर असायला हवा. सतत खाली बघितल्याने तुमची मान आणि पाठ दुखू शकते. तसंच तुम्हाला मान जास्त वर करावी लागत असेल तर ड्राय आय म्हणजे डोळे कोरडे पडण्याची समस्या जाणवते. हे टाळण्यासाठी तुमच्या कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप योग्य स्थितीत असायला हवा. यासाठी लॅपटॉप स्टॅंडचा वापर करता येईल. टेबल खूपच खाली असेल तर पुस्तकं रचून त्यावर लॅपटॉप ठेवता येईल.

(क्रमश:)

## ४ ऑक्टोबर

दिन विशेष

- १९१३ : प्रख्यात गायिका सरस्वतीबाई राणे यांचा जन्म.
- १९२१ : प्रख्यात मराठी गायक केशवराव भोसले यांचे निधन.
- १९९७ : शार्लट, नॉर्थ कॅरोलिना या शहरात १,७३,००,००० अमेरिकन डॉलरचा दरोडा.
- २००६ : ज्युलियन असांज यांनी विकिलीक्स सुरू केलं.
- २०१३ : राज ठाकरे यांनी खास इव्हेंट घेऊन नाशिकमधील 'गोदापार्क' या प्रकल्पाचा आराखडा सादर केला.

करून तर पहा

## रंग बदलणारं पाणी

मुलांनो, तुम्ही काही प्रयोग करू शकता. मित्रमैत्रिणींसवे हसतखेळत विज्ञान शिकू शकता. असाच एक गमतीशीर प्रयोग करून बघू या.

**साहित्य** : काचेच्या दोन रिकाम्या बाटल्या, दोन स्ट्रॉ, चुना मिसळलेलं पाणी (या पाण्याला कॅल्शियम हायड्रॉक्साइड म्हणतात), साधं पाणी इत्यादी.

**कृती** : एका बाटलीत चुना मिसळलेलं तर दुसऱ्या बाटलीत साधं पाणी भरा. चुना मिसळलेलं पाणीही साध्या पाण्यासारखं रंगहीन असतं. आता दोन्ही बाटल्यांमध्ये स्ट्रॉ ठेवा. मित्र किंवा मैत्रिणीला साध्या पाण्याची बाटली द्या. चुना मिसळलेल्या पाण्याची बाटली तुमच्याकडे ठेवा. आता तुम्हा दोघांनीही या स्ट्रॉ मधून फुंकर मारायची आहे. फुंकर मारल्यामुळे साध्या पाण्यात काहीच बदल होणार नाही. पण चुना मिसळलेल्या पाण्याचा रंग मात्र दुधासारखा पांढराशुभ्र होईल. फुंकर मारल्यामुळे बाटलीत कार्बन डाय ऑक्साइड मिसळतो. कार्बनची कॅल्शियम हायड्रॉक्साइडसोबत रासायनिक प्रक्रिया होते आणि कॅल्शियम हायड्रॉक्साइडचं रुपांतर कॅल्शियम कार्बोनेटमध्ये होतं. याचा रंग पांढरा शुभ्र असतो. म्हणूनच सुरूवातीला रंगहीन असणारं चुन्याचं पाणी फुंकर मारल्यावर पांढऱ्या रंगाचं होतं.

## पंचांग

**रविवार, ४ ऑक्टोबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, भाद्रपद कृ. ९, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : पुनर्वसु, योग : परिघ, सूर्योदय ६.३२, सूर्यास्त ६.२३

## फॉरवर्ड्स

**बूझनें से ज़िस चराग़ ने इनक़ार क़र दिया...**

**चक्कर लगा रहीं हैं हवा उसीके आसपास...!**

आरोग्यमंत्र

## काय आहे फंगल इन्फेक्शन?

बऱ्याच जणांना फंगल इन्फेक्शनचा त्रास होतो. शरीराच्या कोणत्याही भागात होणारं हे फंगल इन्फेक्शन खूपच त्रासदायक असतं. उष्ण आणि दमट वातावरणामुळं तसंच ज्या लोकांना खूप घाम येतो त्यांना फंगल इन्फेक्शन होण्याची शक्यता जास्त असते. ओले कपडे घालणं, घट्ट शूज किंवा कपडे घालणं, वैयक्तिक स्वच्छतेची काळजी न घेणं. काही प्रतिजैविक औषधांचे दुष्परिणाम आणि कमी रोगप्रतिकार शक्ती ही अशा फंगल इन्फेक्शनचची मुख्य कारणं आहेत.



पुरळ किंवा लालसर चट्टे असं बहुतेकदा यांचं स्वरूप असतं. खाज सुटणं, आग होणं ही याची लक्षणं असतात. कॅंडीडा अल्बिकन्स हे एक फंगल इन्फेक्शन असून ते त्वचेवर, तोंडाजवळ किंवा गुप्तांगा जवळच्या ओलसर त्वचेवर होतं. तर रिंगवर्म या प्रकारचं फंगल इन्फेक्शन प्रामुख्याने त्वचेवर, डोक्याच्या त्वचेवर, पायांना, मांडीवर आणि गुप्तांगाजवळ होतं. यातून बाहेर पडण्यासाठी किंवा हा त्रास होऊ नये यासाठी वैयक्तिक स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे. स्नानगृह किंवा सार्वजनिक आंघोळ अथवा पोहण्याचे तलाव या ठिकाणी स्वच्छता बाळगली पाहिजे. दररोज मोजे बदलणं, खूप घट्ट शूज न घालणं, कोणाचीही वस्तू न वापरणं ही काळजी घ्यायला हवी. यावर उपाय म्हणून २.५ पीएचचे ॲसिडीक पाणी दिवसातुन ३-४ वेळा बाधित जागेवर स्प्रे करावे. मात्र लवकर बरे न झाल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक आहे.

## फिटनेस फंडा

दोस्तांनो, आपल्याला आपल्या शरीराचा तोल सांभाळता आला पाहिजे. तोल सांभाळण्याचा सराव तुम्ही करू शकता. शरीराचा तोल सांभाळण्याचे लाभ जाणून घेऊ.

* तोल सांभाळण्याच्या सरावामुळे तुमचे सांधे, स्नायू बळकट होतात. गुडघे, पायाच्या घोट्यालगतच्या स्नायूंना याचा लाभ होतो.

* शरीराचा तोल सांभाळण्याचं तंत्र गवसल्यामुळे दुखापतीची शक्यता कमी होते.

(क्रमश:)

रूचिरा

## बनवा चटपटीत लोचो

लोचो हा चटपटीत पदार्थ आहे. कमी तेलात बनत असल्यामुळे आहाराविषयी जागरूक असणारे तो बिनधास्त मटकावू शकतात. तर मग असा बनवा चटपटीत सुरती लोचो...

साहित्य - एक वाटी हरभरा डाळ, पाव वाटी उडीद डाळ, पाव वाटी पोहे, दोन ते तीन टे.स्पून तेल, दोन हिरव्या मिरच्या, एक इंच आलं (खिसून), चिमुटभर हिंग, पाव चमचा हळद, पाव चमचा काळी मिरी, अर्धा चमचा तिखट, चिमुटभर फ्रुट सॉल्ट, चवीनुसार मीठ इत्यादी.

सजावटीसाठी - हिरवी चटणी, बारीक चिरलेली कोथिंबीर, बारीक शेव, लिंबाचा रस.

कृती - हरभरा डाळ आणि उडीद डाळ वेगवेगळ्या पातेल्यात सहा ते सात तास भिजत ठेवा. नंतर दोन्ही दाळी मिक्सीमध्ये बारीक वाटून घ्या. पोहे वाटण्यापूर्वी दहा मिनिटं भिजवून ठेवा. हे सर्व वाटण भांड्यात एकत्रित करून त्यात खिसलेलं आलं, हिंग, हळद, तिखट, मीठ, मिरच्या मिसळा. दोन चमचे तेल घाला. घट्ट वाटत असल्यास थोडं पाणी घातलं तरी चालेल. त्यानंतर फ्रुट सॉल्ट मिसळा. हे मिश्रण ट्रेमध्ये वाफलवून घ्या. यास साधारणत: वीस मिनिटं लागतील. मिश्रणात सुरी टोचून पहा. लोचो शिजला तर चिकटत नाही. सर्व्ह करण्यासाठी प्लेटमध्ये थोडा भाग काढून घ्या. त्रिकोणी काप करता येतील. त्यावर अर्धा चमचा तेल, लिंबाचा रस, हिरवी चटणी घाला. शेव, कोथिंबिरीने सजवून खायला द्या. ढोकळ्याप्रमाणे लोचो सोबतही आंबटगोड चटणी छान लागते.

## खेचाखेची

### नापास

**डॉन** : तू नापास झालास?
**मुलगा** : हो बाबा, त्यांनी मला नापास केले.
**डॉन** : तू अभ्यास नव्हता केला का?
**मुलगा** : केला होता ना. त्यांनी मला तीन तास खूप प्रश्न विचारले; पण मी त्यांना काहीही सांगितले नाही.
**डॉन** : का?
**मुलगा** : तुम्हीच सांगितले होते ना, कुणी काहीही विचारले तर सांगायचे नाही.

## वेगळं काही

काही देशांमध्ये जनावरांसाठी ब्लड बॅंक आणि प्लाज्मा सेंटर्स आहेत. ब्लड बॅंक नसणाऱ्या देशांमध्ये ओळखीद्वारे प्राण्यांना रक्त उपलब्ध करून दिलं जातं. काही देशांमध्ये जनावरांसाठी रक्त आणि प्लाज्मा दान उपक्रमांचं आयोजनही केलं जातं. या उपक्रमांमध्ये लोक आपल्या पाळीव प्राण्यांना घेऊन येतात. पाळीव कुत्रा आणि मांजरं रक्तदान करतात. कुत्रा आणि मांजरांमध्येही माणसांप्रमाणेच रक्तगट असतात. कुत्र्यांच्या रक्तगटाचे बारा प्रकार असतात तर मांजरांच्या रक्तगटाचे तीन प्रकार असतात. अमेरिका आणि इंग्लंडमध्ये पशू ब्लड बॅंक आणि प्लाज्मा सेंटर्स आहेत. पशूंच्या रक्तदानाची प्रक्रिया अगदी सुलभ आहे. या दरम्यान प्राण्यांना भूलही द्यावी लागत नाही.

फिटनेस फंडा

## फिटनेससाठी जीममध्ये जाताय?

फिटनेससाठी जीममध्ये जाणं हा योग्य उपाय असला तरी याठिकाणी जाताना आपल्या कीटमध्ये काही महत्त्वपूर्ण बाबी असायलाच हव्या. त्याची माहिती घेऊ या.

* वर्कआउट करताना येणाऱ्या घामाची दुर्गंधी टाळण्यासाठी डिओचा वापर करा. जीम बॅगमध्ये सौम्य सुगंधाचा डिओ ठेवा. * जीममधील उपकरणांना अनेकांचे हात लागत असतात. सहाजिकच तिथे असंख्य किटाणू असतात. त्यांच्या संसर्गाने आजारपण येऊ नये यासाठी बॅगमध्ये हॅण्ड सॅनिटायझर ठेवा आणि त्याचा वापर करा. * वर्कआउटनंतर शरीरातील उर्जा मोठ्या प्रमाणावर खर्च झालेली असते. त्यामुळे काही वेळा अशक्त वाटू लागतं. अशा वेळी उपयोग पडेल असा एखादा एनर्जी बार बॅगमध्ये ठेवा. * एखादा नवीन व्यायाम प्रकार ट्राय करताना किंवा नव्याने जीमला जात असाल तर बॅगेमध्ये पेन रिलिव्हर क्रीम किंवा जेल हवंच. वर्कआउटदरम्यान मांसपेशींमध्ये लचक भरुन वेदना जाणवल्यास याची मदत होते. * बरेचदा जीममधून परस्पर एखाद्या कामासाठी धावावं लागतं. अशा वेळी बॅगमध्ये बाथ वाईप्स असतील तर मोठी सोय होते. या वाईप्सच्या वापराने फ्रेशनेस मिळतो.



## सुडोकू १५७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ४ | | | | ८ | | ३ | |
| | | १ | | | २ | | | |
| ६ | | | ५ | ३ | | | २ | १ |
| | | | ६ | ८ | | | | ४ |
| २ | ६ | | | ४ | | | ५ | ८ |
| ४ | | | | ७ | ९ | | | |
| ३ | ७ | | | १ | ६ | | | २ |
| | | | ९ | | | ४ | | |
| | २ | | ८ | | | | १ | ६ |

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १५६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | १ | ७ | ६ | ५ | ८ | ४ | ९ | ३ |
| ३ | ८ | ४ | ९ | ७ | १ | ५ | ६ | २ |
| ६ | ९ | ५ | ३ | ४ | २ | ८ | ७ | १ |
| ८ | ५ | १ | ४ | ३ | ७ | ६ | २ | ९ |
| ९ | ३ | ६ | २ | १ | ५ | ७ | ४ | ८ |
| ७ | ४ | २ | ९ | ६ | ९ | १ | ३ | ५ |
| १ | ६ | ९ | ७ | ८ | ३ | २ | ५ | ४ |
| ४ | २ | ८ | ५ | ९ | ६ | ३ | १ | ७ |
| ५ | ७ | ३ | १ | २ | ४ | ९ | ८ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक १५७



**आडवे शब्द :-**
१) मोठे भांडण
४) माल साठवून चढ्या भावाने विक्री करणारा
७) विश्वासघातकी
११) भूतकाळ
१३) जंगलातील वाट
१४) अवधान, चित्त
१५) ** तलवार
१६) बांबू
१७) यज्ञ, यज्ञात टाकण्याची आहुति
१८) मनाला टोचणारे दु:ख
१९) कोलाहल, मोठा कल्ला
२०) दर्पण
२१) उपकार
२२) घसा
२३) विश्रांती
२५) प्रतिदिनी
२७) घागरा
२९) विणकराचे उपजिविकेचे साधन
३१) कर्ज देणारा
३३) रात्री चमचमणारा किटक
३५) गर्दभ
३७) कृष्णसखी
३८) अमावस्या
४०) द्रव पदार्थ
४१) अंगातील जोम
४२) उगवत्या सूर्याचा देश
४३) पाठविलेला
४५) फक्त, केवळ
४६) शुभ, पवित्र
४८) वाकबगार
४९) स्तुती करणारा
५०) बारावी रास
५१) फळाचे साल
५३) अडकित्याने कातरले जाणारे फळ
५५) पाठीला आलेली वक्रता
५७) एक द्विदल धान्य
५८) कैवारी, रक्षणकर्ता
५९) भीती, जरब
६१) निकट
६४) कणीदार
६६) मीठ
६७) पातक
६८) छंद, मंजुळ आवाज
६९) पत्र
७१) सूर्य रवि
७२) लाकूड कापण्याचे साधन
७४) व्यापारातील फायदा
७५) कानोसा घेण्यासाठी कान ताठ करणे
७६) गोमाता

**उभे शब्द :-**
१) वाळा
२) अरण्य
३) गाणे
४) वर्ष, सन
५) मूर्ख
६) पिता
७) युद्धातील एक प्रेरणादायी घोषणा
८) राण्यांची राहण्याची जागा
९) खूप खाली
१०) रक्षण करणारे सशस्त्र सैनिक
१२) कचेरी
१५) निष्कारण उठाठेव करणारा, फाजील
१६) कलावंत
२०) करवत
२३) अजगर
२४) (स्फोटाचा) मोठा आवाज
२५) रो ह यो चे पूर्ण नाव
२६) कलेवर
२७) पंख
२८) टीमचा प्रमुख खेळाडू, कॅप्टन
३०) घड्याळाचा जागविणारा आवाज
३१) प्रामाणिक
३२) पूर्ण बदल
३४) दुर्गंधयुक्त
३६) मेघ, जलद
३८) राजपुत्र सलीमची प्रेयसी
३९) समाजाला प्रगतीवर नेणारा
४२) दुनिया
४४) वैताग, वायू
४७) लोकरीचा उबदार पट्टा
४९) किमती बहुमोल, अधिक जड
५२) गव्हाचे कणीदार पीठ
५४) गूळ, साखरेचा रस
५५) वसु, पितरांच्या नावाने सोडलेला खोंड
५६) अलमारी
५८) सुकविणे
६०) जपजाप्य
६२) चेहरा, मुख
६३) उंच सखल नसलेले
६५) दिवस
६७) एक चतुर्थांश
७०) सूक्ष्म अंश, अत्यल्प
७३) काढलेली सुट्टी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# विजयाचा गुलाल, पण चिंतेची धग

**राजस्थानमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा निकाल सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या पथ्यावर पडल्याचे दिसत असले, तरी आकड्यांच्या अंतरंगात डोकावल्यास सत्तेच्या गोटात निर्माण झालेली अस्वस्थता लपून राहत नाही. भाजपला मिळालेल्या जागांचे संख्याबळ समाधान देणारे असले, तरी काँग्रेस आणि भाजप यांच्यातील मतांच्या टक्क्यांमधील घटलेले सूक्ष्म अंतर सत्ताधाऱ्यांच्या भुवया उंचावणारे आहे.**

राही भिडे

लोकशाहीचा खरा ठोका विधानसभेच्या किंवा लोकसभेच्या भव्य सभागृहात नव्हे, तर गावातील चावडीवर, ग्रामपंचायतीत आणि नगरपालिकेच्या वॉर्डात ऐकू येतो. राजस्थानमध्ये नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनी या वास्तवाची पुन्हा एकदा जाणीव करून दिली. सत्ताधारी भाजपने जागांच्या गणितात आघाडी घेत विजयाला गवसणी घातली खरी; मात्र राजकीय विश्लेषणाचे तराजू केवळ जिंकलेल्या जागा मोजत नाहीत, तर त्या जागांमागे उभा राहिलेला मतांचा टक्का आणि त्यातून व्यक्त झालेला लोकमनस तपासतात. या कसोटीवर भाजपला मिळालेला विजय हा निर्भेळ किंवा निश्चिंत करणारा नाही. उलट, काँग्रेसने दिलेली कडवी झुंज आणि मतांच्या अंतरातील घट सत्ताधारी पक्षासाठी धोक्याची घंटा वाजवणारी ठरली. कोणत्याही राज्यात सत्ता स्थापन झाल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात होणाऱ्या स्थानिक निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षाला नैसर्गिक अनुकूलतेचा लाभ मिळतो. पोलिस यंत्रणा, स्थानिक प्रशासन, निधीचे वाटप आणि सत्तेचा प्रभाव या सगळ्या गोष्टी सरकार चालवणाऱ्या पक्षाच्या बाजूने उभ्या असतात. राजस्थानमध्येही भाजपकडून अशाच एकांगी यशाची अपेक्षा व्यक्त केली जात होती. जागांच्या आकडेवारीत भाजपने पहिला क्रमांक पटकावला असला, तरी मतांची एकूण टक्केवारी पाहिली, तर भाजप आणि काँग्रेसमधील अंतर अत्यंत नगण्य दिसते. अनेक प्रभागांमध्ये आणि पंचायतींमध्ये विजयाचा फैसला केवळ काही डझन किंवा शे-दोनशे मतांच्या फरकाने झाला आहे. सत्तेत असताना आणि विरोधी पक्ष अंतर्गत वादात अडकलेला असतानाही काँग्रेसने घेतलेली ही झेप भाजपच्या रणनीतीकारांना अस्वस्थ करणारी आहे.



राजस्थानमध्ये पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निकालामध्ये मतदारांनी भाजपला स्पष्ट 'ब्लँक चेक' दिलेला नाही, तर प्रत्येक पावलावर सरकारचे काम जोखले आहे, हे स्पष्ट झाले आहे.

शेतकरी प्रश्न, स्थानिक पातळीवरील बेरोजगारी, महागाई आणि ग्रामीण भागात कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करताना आलेली शिथिलता यामुळे तळागाळातील मतदार पूर्णपणे सत्ताधाऱ्यांच्या दावणीला बांधला गेलेला नाही, हाच या मतांच्या अंतराचा थेट अन्वयार्थ आहे. या निवडणुकीतील सर्वात नाट्यमय आणि राजकीयदृष्ट्या सर्वाधिक लक्षवेधी पैलू म्हणजे पक्षांतील ज्येष्ठ नेत्यांच्या बालेकिल्ल्यांचे निकाल. राजस्थानात भाजपचा विचार वसुंधराराजे शिंदे यांच्या नावाशिवाय अपूर्ण मानला जातो. झालावाड आणि धोलपूर हा परिसर राजे घराण्याचा राजकीय गड म्हणून दशकांनुदशके ओळखला गेला आहे; परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालांनी या अभेद्य गडालाही तडे गेल्याचे दाखवून दिले. झालावाड आणि लगतच्या पट्ट्यात भाजपला बसलेले धक्के पक्षांतर्गत समीकरणांचा परिणाम आहेत की मतदारांची नाराजी, यावर आता खल सुरू झाला आहे. जयपूर आणि दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडून वसुंधराराजेंचे पद्धतशीरपणे कमी केले गेलेले वजन कार्यकर्त्यांच्या मनोबलावर परिणाम करून गेले आहे. पक्षांतर्गत स्पर्धा आणि निष्ठावंतांची झालेली उपेक्षा यांचा फटका येथे बसल्याचे दिसते. मतदारांनी राजे यांच्या वर्चस्वाला मर्यादा आखून देताना पक्षाच्या स्थानिक पातळीवर नव्या फळीलाही पूर्णपणे स्वीकारल्याचे दिसले नाही.

भाजपसाठी वसुंधराराजेंचा गड चिंतेचा विषय ठरला असेल, तर काँग्रेससाठी माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या बालेकिल्ल्यातील निकाल आत्मपरीक्षणाची वेळ आणणारे आहेत. मारवाडचे राजकारण आणि विशेषतः जोधपूर परिसर हा अशोक गेहलोत यांचा पारंपरिक प्रभावक्षेत्र. 'मारवाडचा जादुगार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गेहलोत यांचा वरचष्मा असलेल्या भागात स्थानिक निवडणुकांमध्ये काँग्रेसला अपेक्षित यश मिळवता आलेले नाही. उलट, अनेक महत्त्वाच्या जागांवर भाजप आणि अपक्षांनी मुसंडी मारली. गेहलोत यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात 'चिरंजीवी योजना' आणि सामाजिक सुरक्षेच्या अनेक योजनांची घोषणा करून ग्रामीण मतदारांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला होता; मात्र स्थानिक पातळीवरील सत्ता गमावल्यानंतर त्यांच्या या बालेकिल्ल्यात कार्यकर्त्यांची झालेली वाताहात आणि संघटनात्मक विस्कळीतपणा चव्हाट्यावर आला आहे. नेत्याचे व्यक्तिगत वलय हे नेहमीच तळागाळातील पंचायत सदस्याला तारून नेऊ शकत नाही, ही चपराक मतदारांनी गेहलोत यांच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसला दिली आहे. सत्तेतून बाहेर पडताच स्थानिक पातळीवरील पकड कशी ढिली होते, याचे हे बोलके उदाहरण ठरले. राजस्थानातील राजकारणातील तिसरा महत्त्वाचा कोन म्हणजे सचिन पायलट. टोंक, दौसा आणि गुर्जरबहुल पट्ट्यात पायलट यांचे राजकीय वजन सर्वश्रुत आहे. त्यांच्या सभांना उसळणारी तरुणांची गर्दी आणि राज्यव्यापी प्रभाव यांच्या जोरावर काँग्रेसला मोठा दिलासा मिळणे अपेक्षित होते; परंतु त्यांच्या प्रभावाखालील काही महत्त्वाच्या स्थानिक संस्थांमध्ये काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला किंवा अपक्षांनी बाजी मारली.

सचिन पायलट यांच्या समर्थकांसाठी हा निकाल सावध करणारा आहे. लोकप्रिय प्रतिमा आणि समाजमाध्यमांवरील प्रभाव हा प्रत्यक्ष स्थानिक राजकारणात मतपेटीपर्यंत पोहोचेलच असे नाही. टोंक परिसरातील निकालांनी दाखवून दिले आहे, की स्थानिक पातळीवरील गटबाजी, उमेदवारांची चुकीची निवड आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी तुटलेला संपर्क यामुळे स्वतःच्या बालेकिल्ल्यातही सुरक्षित राहता येत नाही. काँग्रेसमधील मुख्यमंत्री विरुद्ध प्रदेशाध्यक्ष या जुन्या सुप्त संघर्षाची धग आजही खालच्या फळीत कायम आहे आणि त्याचा फटका पक्षाला पायलट यांच्या अंगणातही बसला आहे. विधानसभा किंवा लोकसभेच्या वेळी चालणारे भावनिक, राष्ट्रीय किंवा कल्याणकारी राजकारण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्याच तीव्रतेने चालत नाही, हा मतदारांचा स्पष्ट इशारा आहे. रस्ते, पिण्याचे पाणी, स्थानिक नागरी सुविधा, सिंचन आणि पंचायतींमधील भ्रष्टाचार हेच मुद्दे या निवडणुकीमध्ये मतदारांच्या केंद्रस्थानी राहिले. या निवडणुकीत अपक्ष आणि स्थानिक आघाड्यांनी मिळवलेले यश हे प्रस्थापित भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहे. जिथे जिथे दोन्ही पक्षांनी भ्रष्ट किंवा घराणेशाहीतील उमेदवारांना लादले, तेथे मतदारांनी तिसऱ्या पर्यायाला किंवा अपक्षांना पसंती दिली. मतदारांची ही प्रगल्भता नेत्यांच्या बालेकिल्ल्यांच्या भिंती पाडणारी ठरली आहे. या निकालांचे परिणाम केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभापती किंवा प्रमुखांच्या निवडीपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर दोन्ही पक्षांच्या अंतर्गत राजकारणावर खोलवर प्रभाव पाडतील.

स्थानिक निवडणुकांमध्ये मतांचे अंतर घटल्यामुळे सध्याच्या राज्य सरकारवर पक्षांतर्गत दबाव वाढेल. वसुंधराराजेंना बाजूला सारून राज्य चालवणे आणि निवडणुका जिंकणे तितकेसे सोपे नाही, हा संदेश भाजप श्रेष्ठींपर्यंत पोहोचला आहे. दुसरीकडे, स्थानिक पातळीवरील नाराजी वेळीच दूर न केल्यास भविष्यातील निवडणुका कठीण होतील, ही भीती भाजपला सतावू लागली आहे. गेहलोत आणि पायलट या दोघांच्याही गडांना लागलेला धक्का या दोघांपैकी एकालाही एकमेकांवर राजकीय कुरघोडी करण्याची नैतिक मुभा देत नाही. 'आम्ही एकत्र आहोत' हे केवळ मंचावरून दाखवून चालणार नाही, तर दोन्ही नेत्यांना आपापले प्रभावक्षेत्र सावरण्यासाठी जमिनीवर उतरावे लागेल. दोन्ही पक्षांमध्ये स्थानिक कार्यकर्त्यांची निष्ठा गृहीत धरण्याची प्रवृत्ती वाढली होती. बंडखोरांनी मिळवलेले यश हे पक्ष नेतृत्वाने कार्यकर्त्यांचा आवाज ऐकला पाहिजे, याचाच दाखला आहे. राजस्थानमधील या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीने कोणालाही पराकोटीचा आनंद किंवा टोकाचे दुःख करण्याची संधी दिलेली नाही. भाजपसाठी हा निकाल म्हणजे 'जिंकलो; पण दमछाक झाली' असा आहे. जागा मिळाल्या; पण मतांचे घटलेले अंतर सरकारच्या कार्यशैलीवर जनतेने व्यक्त केलेला अविश्वास दर्शवतो, तर काँग्रेससाठी हा निकाल म्हणजे 'हरलो; पण आशा संपलेली नाही' असा आहे. सत्तेबाहेर असतानाही मिळालेला मतांचा टक्का काँग्रेससाठी संजीवनी ठरू शकतो, अट इतकीच, की त्यांनी आपापसातील हेवेदावे सोडून या मतांचे रूपांतर राजकीय शक्तीत केले पाहिजे.

नेत्यांचे बालेकिल्ले ही मध्ययुगीन जहागिरी नाही, मतदारांची मर्जी सांभाळली तरच हे गड टिकतात, अन्यथा लोकशाहीच्या एकाच मतदानात मातब्बरांचे सिंहासन डळमळीत होऊ शकते, हाच राजस्थानमधील जनतेने दिलेला ठाम संदेश आहे. सत्तेचा मद उतरवणारा आणि विरोधकांना आळस झटकून कामाला लावणारा हा जनादेश राजस्थानाच्या राजकारणाला येत्या काळात नव्या वळणावर घेऊन जाऊ शकतो. ●

# शिक्षकच विद्यार्थ्यांचा नैसर्गिक इंटेलिजन्स

दत्तप्रसाद शिरोडकर

५ सप्टेंबर हा भारताचा शिक्षक दिन, तर ५ ऑक्टोबर हा जागतिक शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. दोन्ही दिवस शिक्षकांच्या योगदानाची जाणीव करून देणारे आहेत. मात्र, आजचे जग ज्या वेगाने बदलत आहे, त्या पार्श्वभूमीवर शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या नात्याकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. 'हे विश्वचि माझे घर' या भावनेप्रमाणे जग अधिकाधिक एकमेकांशी जोडले गेले आहे आणि या बदलत्या विश्वात आता कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) नेही प्रवेश केला आहे.त्यामुळे आत्ताच्या शिक्षकांचा विद्यार्थ्यांसोबतचा प्रवासही नव्या पिढीच्या कलेने आणि तंत्रज्ञानाच्या बदलत्या स्वरूपाशी जुळवून घ्यावा लागणार आहे. कारण भविष्यात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या मध्ये एआय सुद्धा एक सहप्रवासी असणार आहे.

आज विद्यार्थ्यांना एखाद्या प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास ते थेट एआयला विचारू शकतात. त्वरित माहिती, वैयक्तिक अभ्यास, भाषांतर, प्रश्नोत्तर, लेखन, उदाहरणे आणि सरावासाठी एआयची विविध साधने उपलब्ध होत आहेत. त्यामुळे शिक्षकांची भूमिका 'माहिती देणाऱ्या' व्यक्तीपासून हळूहळू मार्गदर्शकाच्या भूमिकेकडे वळत आहे.एक काळ असा होता की विद्यार्थ्यांना एखादी माहिती हवी असल्यास शिक्षक, पाठ्यपुस्तक किंवा ग्रंथालय हाच प्रमुख आधार होता. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. एका क्लिकवर किंवा काही शब्दांच्या प्रश्नावर एआय विद्यार्थ्यांना माहिती, स्पष्टीकरण, उदाहरणे, भाषांतर, प्रश्नसंच आणि अभ्यासाचे नियोजन देऊ शकते. त्यामुळे 'माहितीचा स्रोत' म्हणून शिक्षकांवरील विद्यार्थ्यांचे पारंपरिक अवलंबित्व कमी होत आहे. मात्र, याचा अर्थ शिक्षकांचे महत्त्व कमी झाले असा अजिबात नाही. उलट शिक्षकांची भूमिका अधिक व्यापक आणि जबाबदारीची झाली आहे. एआयच्या मदतीने प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेनुसार शिकण्याची संधी मिळू शकते. एखाद्या विद्यार्थ्याला गणितातील एखादी संकल्पना समजत नसेल तर ती वेगवेगळ्या पद्धतीने समजावून घेता येते. भाषेतील अडचणी असतील तर भाषांतराची मदत मिळू शकते. अभ्यासासाठी अतिरिक्त सराव आणि प्रश्न तयार करता येतात. शिक्षकांसाठीही धडे



तयार करणे, प्रश्नसंच तयार करणे आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण करणे अशा अनेक बाबतीत एआय उपयुक्त ठरू शकते. एआय विद्यार्थ्याला एखाद्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकते; त्या उत्तराची सत्यता तपासणे, त्यातील चुका ओळखणे, योग्य संदर्भ समजून घेणे आणि मिळालेल्या माहितीचा योग्य वापर करणे हे विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम शिक्षकच प्रभावीपणे करू शकतात. आजच्या शिक्षणात 'काय शिकायचे?' याबरोबरच 'का शिकायचे?', 'कशावर विश्वास ठेवायचा?' आणि 'मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग कसा करायचा?' हे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे झाले आहेत. या सुविधांबरोबर काही गंभीर प्रश्नही उभे राहतात. विद्यार्थ्यांनी गृहपाठ, प्रकल्प किंवा लेखन पूर्णपणे एआयकडून करून घेण्यास सुरुवात केली तर त्यांच्या स्वतःच्या विचारशक्तीवर आणि सर्जनशीलतेवर परिणाम होऊ शकतो. 'उत्तर मिळणे' आणि 'विषय समजणे' यात मोठा फरक आहे. एआयने तयार केलेले उत्तर बरोबर दिसत असले तरी त्यात तथ्यात्मक चुका किंवा अपूर्ण माहिती असण्याची शक्यता असते. त्यामुळे एआयचा वापर करताना चिकित्सक विचार करण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. याठिकाणी शिक्षकांची खरी भूमिका स्पष्ट होते. शिक्षक आणि वर्गातील विद्यार्थी यांच्यामध्ये एक भावनिक नाते निर्माण होत असते. विद्यार्थी आपल्या वर्गशिक्षकांना आयुष्यभर विसरत नाही. कारण शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नसतात, तर नकळत विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवत असतात. विद्यार्थ्यांच्या यशात आनंद मानणारा, अपयशात धीर देणारा, चूक झाल्यास समजावून सांगणारा आणि योग्य मार्ग दाखवणारा शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा साथीदार कींवा आधार असतो. म्हणूनच शिक्षक हेच विद्यार्थ्यांचे खरे 'नैसर्गिक इंटेलिजन्स' आहेत; आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे एआय हा केवळ एक सहप्रवासी आहे. एआयकडे माहिती आहे, वेग आहे आणि विश्लेषण करण्याची क्षमता आहे; परंतु शिक्षकांकडे माणूस समजून घेण्याची क्षमता, अनुभव, संवेदनशीलता आणि भावनिक जिव्हाळा आहे.

एआय विद्यार्थ्याला सांगू शकते की एखाद्या समस्येचे उत्तर काय आहे; पण शिक्षक त्याला समस्या समजून घेण्याची दृष्टी देऊ शकतात. एआय चुका दाखवू शकते; पण त्या चुकांमधून शिकण्याची प्रेरणा शिक्षक देऊ शकतात. एआय माहिती देऊ शकते; पण त्या माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे संस्कारात रूपांतर करण्याचे काम शिक्षकच करतात. त्यामुळे एआयला शिक्षणाचा शत्रू मानण्याची किंवा शिक्षकांचा पर्याय समजण्याची गरज नाही. उलट एआयचा योग्य आणि जबाबदार वापर करून शिक्षकांना स्वतःची भूमिका अधिक सक्षम करावी लागणार आहे. विद्यार्थ्यांनीही एआयचा वापर सहाय्यक म्हणून करावा, पर्याय म्हणून नव्हे. आजच्या जागतिक शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांना तंत्रज्ञान स्वीकारण्याचे आवाहन करताना त्यांना आवश्यक प्रशिक्षण, साधने आणि संस्थात्मक पाठबळ देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. बदलत्या जगात शिक्षकांनीही बदलले पाहिजे; पण बदलताना शिक्षकत्वातील मानवी स्पर्श, संस्कार आणि मूल्ये हरवता कामा नयेत.

कारण उद्याच्या जगात विद्यार्थ्याच्या हातात एआय असेल; परंतु त्याच्या मनाला दिशा देण्यासाठी शिक्षकाचीच गरज असेल. एआयहा विद्यार्थी आणि शिक्षकांचा सहप्रवासी असू शकतो; पण विद्यार्थ्याच्या जीवनप्रवासाचा खरा मार्गदर्शक शिक्षकच राहणार आहे. ●

# विद्यार्थी अभ्यासाची दिशा बदलली की, शिकण्याचा अनुभव बदलतो

सुनील गवळी

विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक असणे आणि तो खरोखर अभ्यास करत असणे, या दोन गोष्टी एकच आहेत असे मानणे ही आपल्या शिक्षणव्यवस्थेतील एक सूक्ष्म गैरसमजाची जागा आहे. पुस्तक उघडणे, धडा वाचणे, महत्त्वाचे प्रश्न पाठ करणे आणि परीक्षा देणे या प्रक्रियेत अभ्यास पूर्ण झाल्यासारखा वाटतो; परंतु वाचलेले मनात किती उतरले, त्याचा अर्थ किती स्पष्ट झाला, स्वतःच्या शब्दांत ते किती सांगता येते, त्याचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध जोडता येतो का आणि नवीन परिस्थितीत त्याचा उपयोग करता येतो का, हा खरा अभ्यासाचा कस आहे. म्हणूनच अभ्यासासाठी दिलेला वेळ महत्त्वाचा असला तरी त्या वेळेत विद्यार्थी नेमके काय करतो, हे त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.



आज विद्यार्थ्यांसमोर माहितीची कमतरता नाही. पुस्तकांपासून डिजिटल साधनांपर्यंत असंख्य माहिती सहज उपलब्ध आहे. परंतु माहिती उपलब्ध असणे म्हणजे ज्ञान निर्माण होणे नव्हे. ज्ञान तेव्हा निर्माण होते, जेव्हा विद्यार्थी माहितीला समजून घेतो, तिच्यावर विचार करतो, तिचे स्वतःच्या अनुभवाशी नाते जोडतो आणि आवश्यक वेळी तिचा वापर करू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्याला अधिकाधिक माहिती देण्यापेक्षा माहितीशी कसे काम करायचे, हे शिकवणे ही आजच्या शिक्षणाची महत्त्वाची गरज आहे.

अभ्यासाची दिशा बदलण्याचा पहिला टप्पा म्हणजे 'वाचणे' आणि 'शिकणे' यातील फरक समजणे. एखादा धडा दोन वेळा वाचूनही तो समजला नसेल, तर तिसऱ्यांदा त्याच पद्धतीने वाचण्यापेक्षा स्वतःला विचारावे ''मला नेमके काय समजले नाही?'' एखादी संकल्पना स्वतःच्या उदाहरणातून समजावून सांगावी, चित्र काढावे, मित्राला शिकवावी किंवा तिचा दैनंदिन जीवनाशी संबंध शोधावा. शिकण्याची प्रक्रिया जितकी सक्रिय होईल, तितके ज्ञान अधिक अर्थपूर्ण होईल.

अभ्यासाला कृतीची जोड मिळाली की विषय जिवंत होतो. विज्ञान केवळ पुस्तकातील प्रयोग म्हणून न राहता छोट्या निरीक्षणातून समजता येते. गणितातील संकल्पना दैनंदिन व्यवहारातील मोजमाप, खरेदी-विक्री किंवा आकड्यांच्या खेळातून अनुभवता येतात. भाषेतील शब्द केवळ पाठ न करता त्यांचा वापर करून छोटी गोष्ट, संवाद किंवा प्रसंग तयार करता येतो. इतिहासातील घटना केवळ तारखा म्हणून न शिकता त्या काळातील व्यक्तीच्या भूमिकेतून विचार करता येतो. भूगोल नकाशावर पाहण्याबरोबर आपल्या परिसराशी जोडता येतो. जेव्हा विषय पुस्तकातून बाहेर येऊन अनुभवात उतरतो, तेव्हा अभ्यासाची गोडी निर्माण होण्याची शक्यता वाढते.

प्रश्नमंजुषा, शैक्षणिक खेळ, कोडी, प्रयोग, निरीक्षण-कृती, लघु सादरीकरणे आणि सहाध्यायाला शिकवणे अशा पद्धतींचा उपयोग केल्यास विद्यार्थी केवळ उत्तर देणारा राहत नाही; तो विचार करणारा, अंदाज बांधणारा आणि उत्तर शोधणारा बनतो. येथे स्पर्धेपेक्षा कुतूहल महत्त्वाचे आहे. ''कोण पहिला?'' यापेक्षा ''आपण हे का घडते ते शोधू शकतो का?'' हा प्रश्न विद्यार्थ्याच्या शिकण्याला वेगळी दिशा देतो.

अभ्यासाची दिशा बदलताना मोठ्या उद्दिष्टांचे छोटे अध्ययन-अनुभवात रूपांतर करणेही महत्त्वाचे आहे. संपूर्ण धडा पूर्ण करण्याचा दबाव देण्यापेक्षा आज एक संकल्पना समजून घेणे, दोन उदाहरणे स्वतः सोडवणे, एक प्रश्न तयार करणे किंवा शिकलेली गोष्ट स्वतःच्या भाषेत सांगणे, अशी छोटी उद्दिष्टे विद्यार्थ्याला साध्य करता येतात. प्रत्येक छोट्या पूर्णत्वातून पुढील कृतीसाठी मानसिक तयारी निर्माण होते. मोठी प्रगती अनेकदा अशाच छोट्या पूर्ण झालेल्या कृतींच्या मालिकेतून घडते.

यासाठी 'अभ्यासाचा आरसा' ही एक साधी संकल्पना विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरू शकते. दिवसाच्या शेवटी विद्यार्थ्याने स्वतःला फक्त ''आज किती तास अभ्यास केला?'' असे विचारण्याऐवजी ''आज मला काय नवीन समजले?'', ''कुठे अडचण आली?'', ''मी ती अडचण कशी सोडवली?'', ''उद्या कोणती गोष्ट अधिक स्पष्ट करून घ्यायची आहे?'' असे चार प्रश्न विचारावेत. या प्रश्नांची उत्तरे लिहिणे बंधनकारक नसले तरी स्वतःशी असा छोटा संवाद विद्यार्थ्याला आपल्या अध्ययनाची जाणीव करून देतो.

अभ्यासाचा मागोवा हा नियंत्रणासाठी नव्हे, तर आत्मजाणीवेसाठी असावा. वर्गात किंवा घरी साधा 'माझा अध्ययनप्रवास' चार्ट ठेवता येतो. त्यामध्ये विद्यार्थ्याने स्वतः पूर्ण केलेल्या कृतींची नोंद करावी. एखाद्या दिवशी वाचन, दुसऱ्या दिवशी प्रश्न सोडवणे, तिसऱ्या दिवशी प्रयोग किंवा पुनरावृत्ती हीअशा प्रकारे स्वतःच्या प्रयत्नांची दृश्य नोंद तयार झाली की विद्यार्थ्याला त्याची प्रगती दिसू लागते. येथे दुसऱ्या मुलाशी तुलना करण्याऐवजी कालच्या स्वतःशी आजची तुलना महत्त्वाची ठरते.

गृहपाठाकडे पाहण्याची पद्धतही याच दिशेने बदलता येते. मोठ्या प्रमाणात प्रश्न देऊन वही भरून घेण्यापेक्षा असा गृहपाठ अधिक अर्थपूर्ण ठरू शकतो, ज्यामध्ये विद्यार्थ्याला करावे, शोधावे, पाहावे किंवा समजावून सांगावे लागते. उदाहरणार्थ, ''आज शिकलेल्या संकल्पनेचा घरातील कोणत्या वस्तूशी संबंध आहे?'', ''या विषयावर एक प्रश्न तयार करा'', ''ही गोष्ट तुमच्या मित्राला दोन मिनिटांत समजावून सांगा'' अशा कृती विद्यार्थ्याला पुस्तकाच्या चौकटीबाहेर विचार करायला प्रवृत्त करतात.

शिक्षकाची भूमिकाही येथे बदलते. शिक्षकाने प्रत्येक प्रश्नाचे तयार उत्तर देण्यापेक्षा काही वेळा विद्यार्थ्याला उत्तरापर्यंत पोहोचण्यासाठी योग्य दिशा द्यावी. ''तुला काय वाटते?'', ''यामागे दुसरे कारण असू शकते का?'', ''हे प्रत्यक्षात कुठे दिसते?'', ''तू हे दुसऱ्याला कसे समजावून सांगशील?'' अशा प्रश्नांमधून विद्यार्थ्याच्या विचारांना चालना मिळते. शिक्षक माहितीचा अंतिम स्रोत न राहता विचारप्रक्रियेचा मार्गदर्शक झाला, तर वर्गातील अध्ययन अधिक जिवंत होऊ शकते.

पालकांसाठीही येथे एक महत्त्वाचा बदल आवश्यक आहे. मुलाने पुस्तकासमोर किती वेळ बसले, यापेक्षा त्या वेळेत त्याने काय अनुभवले आणि काय समजून घेतले, याकडे लक्ष देणे अधिक उपयुक्त ठरते. ''किती अभ्यास झाला?'' या प्रश्नाऐवजी कधी कधी ''आज तुला कोणती गोष्ट सर्वात रंजक वाटली?'' किंवा ''आज तू स्वतः काय शोधलेस?'' असा संवाद झाला तर मुलाला अभ्यास हा केवळ जबाबदारी नसून स्वतःच्या शोधाचा भाग वाटू शकतो.

अभ्यास करताना अडचण येणे म्हणजे विद्यार्थी कमकुवत आहे, असा अर्थ काढण्याची गरज नाही. उलट अडचण ही शिकण्याच्या पुढच्या पायरीची खूण असू शकते. एखादा प्रश्न चुकला तर फक्त योग्य उत्तर लिहून पुढे जाण्याऐवजी ''चूक नेमकी कुठे झाली?'' हे शोधणे महत्त्वाचे आहे. चुकीचे उत्तर का आले, कोणती संकल्पना चुकीची समजली, कोणता टप्पा राहिला हे समजले तर ती चूक पुढील शिक्षणाचे साधन बनते.

यामुळे विद्यार्थ्याच्या मनात एक महत्त्वाचा बदल घडतो. ''मला हे येत नाही'' या निष्कर्षाऐवजी ''मला हे अजून समजून घ्यायचे आहे'' अशी भूमिका निर्माण होते. ही भूमिका विद्यार्थ्याला अपयशापासून घाबरवण्याऐवजी प्रयत्नांकडे वळवते. शिक्षणात प्रत्येक उत्तर बरोबर असणे आवश्यक नाही; प्रश्न समजून घेणे, प्रयत्न करणे, चूक ओळखणे आणि पुन्हा प्रयत्न करणे हीदेखील शिकण्याचीच प्रक्रिया आहे.

अभ्यासाची दिशा योग्य झाली की परीक्षेकडे पाहण्याची दृष्टीही बदलते. परीक्षा ही शिकलेल्या गोष्टींची अंतिम भीती न राहता आपल्याला काय समजले आणि अजून काय शिकायचे आहे याचा आरसा बनू शकते. त्यामुळे परीक्षेपूर्वी केवळ प्रश्नोत्तरे पाठ करण्यापेक्षा स्वतःला प्रश्न विचारणे, उत्तर न पाहता सांगण्याचा प्रयत्न करणे, उदाहरण बदलून समस्या सोडवणे आणि शिकलेली संकल्पना नवीन परिस्थितीत वापरून पाहणे अधिक अर्थपूर्ण ठरते.

अभ्यास म्हणजे सतत पुस्तकासमोर बसून राहणे नव्हे. कधी निरीक्षण करणे, कधी प्रश्न विचारणे, कधी प्रयोग करणे, कधी एखाद्याला शिकवणे, कधी चूक शोधणे आणि कधी शांतपणे विचार करणे की या सर्व गोष्टी अध्ययनाचाच भाग आहेत. त्यामुळे विद्यार्थ्याला 'अभ्यास कुठे करायचा?' यापेक्षा 'अभ्यास कसा जगायचा?' हे समजणे अधिक महत्त्वाचे आहे.

शेवटी शिक्षणाचा दर्जा केवळ किती धडे पूर्ण झाले, किती पाने वाचली किंवा किती तास अभ्यास केला यावर ठरत नाही. एखादी गोष्ट विद्यार्थ्याच्या मनात किती स्पष्ट झाली, त्यातून त्याला कोणते प्रश्न पडले, तो त्या ज्ञानाचा नवीन परिस्थितीत कसा उपयोग करतो आणि शिकण्याची प्रक्रिया स्वतःची जबाबदारी म्हणून किती स्वीकारतो, यावर त्याच्या अध्ययनाची खरी गुणवत्ता ठरते.

अभ्यासाची दिशा बदलली की अभ्यासाचा अर्थ बदलतो.अभ्यासाचा अर्थ बदलला की शिकण्याचा अनुभव बदलतो. आणि शिकण्याचा अनुभव बदलला की शिक्षण केवळ परीक्षेपुरते न राहता आयुष्यभर उपयोगी पडणारी क्षमता बनते.

विद्यार्थ्याने केवळ ''मला हे शिकायचे आहे'' एवढे न म्हणता, ''मला हे समजून घ्यायचे आहे, अनुभवायचे आहे, वापरायचे आहे आणि पुढे स्वतः काहीतरी नवीन शोधायचे आहे''

या दिशेने प्रवास सुरू केला, तर तेच खऱ्या अर्थाने विद्यार्थी अभ्यासाची दिशा बदलण्याचे पहिले पाऊल ठरेल. ●

# प्लास्टिकचा शेवट कुठे?



**विजयकुमार कट्टी**

आपण पाण्याची बाटली विकत घेतो, पाणी पितो आणि बाटली रिकामी होते. त्या क्षणी आपल्यासाठी तिचे काम संपते. पण बाटलीचे काम खरोखर तिथेच संपते का?

'महा आर-पेट'सारखा उपक्रम सुरू होतो, तेव्हा या प्रश्नाकडे पुन्हा एकदा पाहण्याची संधी मिळते. पेट बाटल्या वेगळ्या गोळा करणे, त्यांचे योग्य पद्धतीने पुनर्चक्रण करणे आणि त्यातून पुन्हा उपयोगी वस्तू तयार करणे ही नक्कीच आवश्यक प्रक्रिया आहे. विशेषतः बाटलीचा कचरा रस्त्यावर, नाल्यात किंवा जलस्रोतांमध्ये जाण्यापेक्षा तो व्यवस्थित गोळा होऊन पुनर्चक्रणाच्या प्रक्रियेत जाणे अधिक चांगले आहे.

पण इथेच माझ्या मनात एक साधा प्रश्न निर्माण होतो. एका बाटलीचे पुनर्चक्रण करून पुन्हा बाटली तयार झाली, तर त्या प्रवासाचा पुढचा टप्पा कोणता? आणि एखाद्या प्लास्टिकपासून बाटलीऐवजी कपडे, बेंच, इतर वस्तू किंवा दुसरे उत्पादन तयार केले, तर त्या वस्तूचे आयुष्य संपल्यानंतर काय होणार?

प्रत्येक पुनर्चक्रित वस्तू धोकादायक असते, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. योग्य तंत्रज्ञान, योग्य प्रक्रिया आणि योग्य नियंत्रण यामुळे पुनर्चक्रणातून अनेक उपयुक्त उत्पादने तयार होऊ शकतात. मात्र काही प्लास्टिक उत्पादनांच्या वापरादरम्यान घर्षण, धुलाई किंवा झीज यामुळे सूक्ष्म प्लास्टिकचे कण पर्यावरणात जाण्याबाबत जगभर संशोधन सुरू आहे. त्यामुळे मोठा प्लास्टिक कचरा आपण गोळा करतो, पण त्यातून निर्माण होणारा अदृश्य कचरा कुठे जातो, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा ठरतो.

म्हणूनच पुनर्चक्रण थांबवायचे आहे, असा माझा विचार अजिबात नाही. उलट, पुनर्चक्रण अधिक चांगले, अधिक सुरक्षित आणि अधिक परिणामकारक कसे करता येईल, याबरोबरच त्यापुढचे तंत्रज्ञान काय असू शकते, याचा शोध घ्यायला हवा, एवढीच अपेक्षा आहे.

आपल्या हातातील मोबाइल फोनचे उदाहरण घ्या. काही दशकांपूर्वीचा मोबाइल आजच्या स्मार्टफोनच्या तुलनेत मोठा, मर्यादित सुविधा असलेला आणि वेगळ्या तंत्रज्ञानावर आधारित होता. त्या वेळी तोच शेवटचा टप्पा आहे, असे मानले असते तर आजचा स्मार्टफोन कदाचित अस्तित्वात आला नसता. संशोधनाने जुन्या मर्यादांकडे अडथळा म्हणून नव्हे, तर पुढच्या संधी म्हणून पाहिले.

**प्लास्टिकच्या बाबतीतही अशीच विचार करण्याची वेळ आली आहे का?**

आज पेट बाटलीसाठी 'Bottle-to-Bottle' हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. उद्या अशा प्लास्टिकसाठी, ज्याचे सुरक्षित आणि व्यवहार्य पुनर्चक्रण शक्य नाही, त्याचे रासायनिक कच्च्या मालात रूपांतर करता येईल का? काही विशिष्ट प्रकारच्या प्लास्टिकसाठी नियंत्रित पद्धतीने ऊर्जा किंवा इंधन मिळवता येईल का? किंवा आज आपल्याला माहीत नसलेला आणखी एखादा चांगला मार्ग उद्याच्या संशोधनातून सापडेल का?

'Plastic-to-Fuel' ही माझ्या दृष्टीने आज घोषित करण्यासारखी अंतिम उपाययोजना नाही. तो एक संशोधनाचा प्रश्न आहे. त्यामध्ये ऊर्जा किती लागेल, उत्सर्जन किती होईल, कोणते अवशेष निर्माण होतील, त्याचा आर्थिक परिणाम काय असेल आणि संपूर्ण जीवनचक्रात तो पर्यावरणासाठी खरोखर किती फायदेशीर ठरेल, हे वैज्ञानिक पद्धतीने तपासावे लागेल. उत्तर योग्य असेल तर पुढे जावे; योग्य नसेल तर त्यापेक्षा चांगला मार्ग शोधावा.

भारताच्या भविष्यातील ऊर्जाव्यवस्थेकडे पाहिले तरी हा प्रश्न पूर्णपणे दुर्लक्षित करता येणार नाही. सौर आणि पवनऊर्जेसारख्या पर्यायी ऊर्जेचा विस्तार होत असला, तरी पेट्रोलियमवर आधारित अनेक गरजा काही काळ आपल्या अर्थव्यवस्थेत राहणार आहेत. त्यामुळे वापरानंतर उरलेल्या काही प्लास्टिकपासून नियंत्रित पद्धतीने उपयोगी संसाधन किंवा ऊर्जा मिळवता येते का, हा विषय संशोधनाच्या पातळीवर तपासण्यासारखा आहे.

मात्र यामध्ये एक गोष्ट स्पष्ट असायला हवी सर्व प्लास्टिकसाठी एकच उपाय असू शकत नाही. स्वच्छ आणि योग्य बाटली असेल तर तिचे उच्च दर्जाचे पुनर्चक्रण करणे योग्य ठरू शकते. दूषित किंवा पुनर्चक्रणास अयोग्य प्लास्टिकसाठी दुसरा मार्ग असू शकतो. आणि शेवटी कोणताही मार्ग निवडताना केवळ 'कचरा दिसत नाही' एवढे पुरेसे नाही; त्या प्रक्रियेनंतर पर्यावरणावर काय परिणाम होतो, हेही पाहावे लागेल.

म्हणून 'महा आर-पेट'सारख्या उपक्रमाचा पुढचा टप्पा मला आणखी उत्सुक करणारा वाटतो. आज आपण लोकांना बाटली गोळा करायला शिकवतो. उद्या त्यांना त्या बाटलीचा संपूर्ण प्रवास दाखवता येईल का? वापरापासून संकलनापर्यंत, पुनर्चक्रणापासून नव्या उत्पादनापर्यंत आणि त्यानंतरच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत 'यानंतर काय?' हा प्रश्नही सार्वजनिक चर्चेचा भाग होऊ शकतो.

यासाठी शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योग, संशोधक, तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या संस्था, शैक्षणिक क्षेत्र आणि नागरिक यांनी एकत्र विचार करणे आवश्यक आहे. कारण प्लास्टिकचा प्रश्न केवळ कचरा गोळा करण्याचा प्रश्न नाही. तो संसाधनांचा, तंत्रज्ञानाचा आणि भविष्यातील पिढ्यांचा प्रश्न आहे. 'महा आर-पेट'च्या निमित्ताने हा उपक्रम पुढे नेणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करताना माझी एक नम्र विनंती आहेआज जे शक्य आहे ते नक्की करूया; पण उद्या काय शक्य होऊ शकते, याचा शोध घेणेही थांबवू नका.

माझा प्रश्न पुनर्चक्रणाच्या विरोधात नाही. उलट, पुनर्चक्रणासोबत पुढच्या पिढीचे तंत्रज्ञान शोधण्याचा आहे. आजचा कचरा आपण एका नव्या उत्पादनात बदलला, एवढ्यावर समाधान मानायचे की त्या कचऱ्याचा प्रवास खरोखर कुठे संपतो, हेही शोधायचे?

कारण खरे शाश्वत समाधान म्हणजे कचरा एका रूपातून दुसऱ्या रूपात हलवणे नव्हे; तो पुन्हा समस्या बनू नये, याचा मार्ग शोधणे होय. ●

## अनुभवांची खुमारी..

# मी कोकणचो डॉक्टर

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

मी कोकणचो डॉक्टर, हे डॉ. मिलिंद कुलकर्णीलिखित पुस्तक पुण्याच्या समकालीन प्रकाशनने, देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. 'मनोगत'मध्ये डॉ.मिलिंद यांनी आपले विचार स्पष्टपणे मांडले आहेत. ते आपल्या, डॉक्टर पत्नीसह कोल्हापूर सोडून कोकणात आले आणि तेथेच दीर्घकाळ स्थायिक झाले. शेवटी ते लिहितात, ''मी काही देवमाणूस नाही. मी फार चांगला, सर्वोत्तम डॉक्टर नाही, याची मला पक्की खात्री आहे. फक्त मला एक कळतं, की हा कोकणी माणूस माझा आहे, त्याच्याविषयी मला खोल, आतून प्रेम आहे आणि या माणसाने आणि मातीने मला अधिक समृद्ध केलं आहे.'' या पुस्तकात एकूण २१ लेख आहेत. पुस्तकाचे समर्पक मुखपृष्ठ, आतील मांडणी स्वप्नदीप क्रिएटिव्हज् यांची आहे.आतील अप्रतिम चित्रे दीपक संकपाळ यांची आहेत. घाटावरचा डॉक्टर आणि त्याचे कोकणी पेशंट, या पहिल्या लेखात डॉ. मिलिंद यांनी कोणताही पेशंट का नाकारता येत नाही, हे स्पष्ट केले आहे. अनेक वेळा आपली बुद्धी वापरून, पुस्तकी ज्ञान विसरून रुग्ण तपासावे लागतात. उपचारही करावे लागतात. डोकेही शांत ठेवावे लागते. कारण सामान्यपणे ग्रामीण भागातील पेशंट मागची तपासणीची कागदपत्रे आणत नाहीत, त्याविषयीची माहितीही सांगत नाहीत. बोंबुल नावाचा कीटक कानात गेलेले, साप, विंचू चावल्यावर घाबरेघुबरे पेशंट तपासताना आलेले अनुभव नोंदविले आहेत. कोकणातील वैद्यकीय श्रद्धा-अंधश्रद्धा मजेशीर असतात. त्यांच्यावर कोकणी माणसाची अतूट श्रद्धा असते. उदा. डॉक्टरना कावीळ समजत नाही. कावीळ फक्त गावठी वैद्यच बरी करू शकतो. सलाईन थंड असते. जंत आवाज करतात, त्याचे औषध थंडीत घेता नये, या विविध पक्क्या गैरसमजुतींचा मिलिंद यांनी उल्लेख केला आहे आणि सामनाही! बाजारच्या दिवशी डॉक्टरना दुपारी जेवायलाही वेळ मिळत नाही. इतके पेशंट येतात. कारण त्यांना बाजारातली खरेदी करून, तपासणीनंतर औषध घेऊन संध्याकाळी आपले घर गाठायचे असते. परिणामी डॉक्टरना तपासणीची फी देखील काही रुग्ण देऊ शकत नाहीत. सुनंदाबाईंच्या संदर्भातील हृद्य किस्सा मिलिंद यांनी मोकळेपणाने, आपली चूक मान्य करत, मांडला आहे. सुरुवातीच्या काळात प्रॅक्टिस सुरू केली, तेव्हा औषधे इंजेक्शनसकट मिलिंद यांची फी बारा रुपये होती.गेल्या सोळा वर्षांत ती हळूहळू वाढत गेली, याची जाणीवही डॉक्टरना होती. मात्र पेशंटसाठी उधारीची वही ठेवावी लागत नाही. कारण कोकणी माणूस प्रामाणिकपणे राहिलेली रक्कम आणून देतो, हे मिलिंद सोदाहरण स्पष्ट करतात. मिलिंद यांनी आपल्या पहिल्या व्हिजिटचा अनुभव, जणु चित्रमय पद्धतीने मांडला आहे. कोकणात, डेथ डिक्लेरिंग व्हिजिटचे पैसे नसतात, याचे वाचकाला आश्चर्य वाटते. काही डॉक्टर मित्र एकत्र जमल्यावर परस्परांचे अनुभव सांगतात. मिलिंद यांनी डिस्पोजेबल इंजेक्शन नीडल्स वापरायला सुरुवात केली होती. तसेच पेशंटसाठी त्यांनी सूचनाफलक लावला होता. परंतु त्याकडे रुग्ण दुर्लक्ष करीत. मिलिंद यांच्या मते बाळाच्या प्रकृतीतले चढउतार फक्त त्याची आईच सांगू शकते, याचा विलक्षण अनुभव 'सूचनाफलक' या लेखामध्ये लेखकाने मांडला आहे. सिरीयस पेशंटला स्वतःच्या गाडीतून कणकवलीला कन्सल्टंटकडे, डॉक्टरांना वेळोवेळी न्यावे लागत असे. बहुसंख्य पेशंट अतिशय गरीब असल्यामुळे त्यांना मिलिंद यांचाच आधार वाटे. त्यामुळे निर्माण झालेले विविध हृदयद्रावक प्रसंग 'भाऊ तुम्ही चला..' या लेखात मांडले आहेत. रात्रीच्या वेळी येणाऱ्या पेशंटविषयीचे विविध अनुभव एका लेखात सविस्तरपणे मांडले आहेत. कोकणी दवाई सुंदरी, या लेखात, अल्पशिक्षित सिस्टरना प्रशिक्षण दिल्यावर, त्या तत्पर, उत्तम सेवा देण्यास तयार होत. याविषयी मिलिंद यांनी विविध अनुभव मांडले आहेत. कोकणी पेशंट 'सलाईन चढवा' म्हणतो. मिलिंद यांनी याविषयीचे विविध अनुभव सविस्तरपणे मांडले आहेत. कोकणातल्या रुग्णांचा मुंबईतील डॉक्टरांवर प्रचंड विश्वास असल्यामुळे, त्यांच्याविषयी काळजीपूर्वक बोलावे लागते, असेही मिलिंद नोंदवितात, त्याचे कारण 'कोकण-मुंबई : एक अतूट नातं' या लेखातून अप्रतिम रित्या व्यक्त होते. सिंधुदुर्ग जिल्ह्याजवळ असणाऱ्या कोल्हापूर, बेळगाव, गोवा या ठिकाणी उत्तम वैद्यकीय सेवा उपलब्ध असूनही, अजूनही शेकडो किलोमीटर अंतरावरच्या मुंबईतच कोकणी रुग्णाला नेले जाते आणि कधीकधी त्याचे दुष्परिणामही सोसावे लागतात. चाकरमानी सीझन, या लेखामध्ये कोकणातील मुंबईत असणारे, मे महिन्यात किंवा गणपतीच्या सणाला निश्चितपणे गावाला येऊन आपल्या सर्व आप्तांना भेटतात. याकाळात कोकणातील अर्थव्यवस्थेला विलक्षण गती मिळते. सर्वच खुश असतात. डॉक्टरकडे चाकरमानी येऊन

आई-वडिलांची वार्षिक तपासणी करून घेतात. सढळ हाताने घरातील सर्वांसाठी खर्च करतात. काही दिवसांच्या मुक्कामानंतर ते परत जातात, तेव्हा घरातील म्हातारा किंवा म्हातारी कासावीस होतात. लेखकाने हे सर्व नेमकेपणाने टिपले आहे. कोकणातील रिक्षावाला वाडीवरच्या रुग्णांना डॉक्टरकडे आणण्यासाठी, कोणती कामे करतो, तेही मिलिंद यांनी एका लेखामध्ये मांडले आहे. रिक्षावाला, डॉक्टरचा महत्त्वाचा साथीदारच ठरतो. 'ॲडमिट पेशंटचे किस्से', 'गजाली पेशंट बरोबर' या लेखांतून कोकणातील विविध वयोगटातील पेशंटच्या सुखदुःखाची कहाणी वाचकांसमोर नेमकेपणाने उलगडते. हॉस्पिटलमध्ये डिलिव्हरीसाठी पेशंट ॲडमिट झाली की त्याची संपूर्ण जबाबदारी मिलिंद यांच्या डॉक्टर पत्नीकडे असूनही ते अस्वस्थ का होतात, ते लेखामध्ये उत्तम प्रकारे मांडले आहे. या लेखातून डॉ. मिलिंद आणि त्यांची पत्नी, यांच्या स्वभावातील महत्त्वाचे पैलू स्पष्ट होतात. सुखरूप डिलिव्हरी झाल्यावर नातेवाईकांना, मुलगा की मुलगी याविषयी प्रचंड कुतूहल असते. ''मुलगा असेल तर जल्लोष आणि मुलगी असेल तर पोकळ, 'असू दे, असू दे' ऐकलं की वाईट वाटतं. तिकडे त्या जन्मदात्रीने काय सोसले याचं वर्णन करायला माझ्याकडे शब्द नसतात.'' हे डॉक्टर नेमकेपणाने मांडतात. पेशंटचे नवरे, आऊस, बहीण अन् वयनी, हे दोन्ही लेख अप्रतिम आहेत. त्यामधून कोकणातील विविध वयोगटातील व्यक्तींचे स्वभावदर्शन नेमकेपणाने होते. छोटे कोकणी दोस्त, या लेखामध्ये पेशंट बरोबर येणाऱ्या मुलांशी डॉक्टरांची कशी गट्टी जमते, त्यांना खुश करण्यासाठी डॉक्टर आपल्याकडील छोट्या-मोठ्या विविध वस्तू देऊन, त्यांचे मन ते कसे जपतात ते स्पष्ट होते. डॉक्टरकडे एम.आर.येणे ही नित्याची गोष्ट. ग्रामीण भागातील, स्वस्तातील औषधे लिहून देणाऱ्या डॉक्टरविषयी त्यांना फारशी प्रीती का नसते, हे मिलिंद यांनी स्पष्ट केले आहे. डॉ.मिलिंद प्रिस्क्रिप्शनच्या उजव्या कोपऱ्यात विविध सूचना कशा लिहितात, ते त्यांनी सविस्तरपणे मांडले आहे. गरीब पेशंटला, औषधे उधार देण्याची डॉक्टर सूचना करतात आणि उरलेली रक्कम पेशंटनी न दिल्यास स्वतः देण्याची हमीही देतात, हे विशेष! 'मी कोकणचो डॉक्टर' या डॉ. मिलिंद कुलकर्णी यांच्या पुस्तकातून कोकणातील वातावरण, तेथील रुग्णांची स्वभाववैशिष्ट्ये, तेथील बोलीभाषा, डॉक्टर पती-पत्नी यांची प्रेमळ पण काहीशी भिन्न स्वभाव वैशिष्ट्ये, या सर्व गोष्टी मिलिंद यांच्या लेखनातून उत्तम प्रकारे व्यक्त होत आहेत. पुस्तकातील निवडक लेख अभिवाचनासाठी निश्चितच उपयुक्त ठरतील. डॉ.मिलिंद यांनी यापुढेही लिहित रहावे, यासाठी शुभेच्छा! ●




**पुस्तकाचे नाव : मी कोकणचो डॉक्टर**
**लेखिका : डॉ. मिलिंद कुलकर्णी**
**९४२२१५४७८५**
**प्रकाशक : समकालीन प्रकाशन, पुणे**
**९३७०९७९२८७**
**पहिली आवृत्ती: नोव्हेंबर २०२५**
**दुसरी आवृत्ती : मार्च २०२६**
**पृष्ठे : ११९ मूल्य : रु. २००/-**

# भन्नाट प्रश्न, वैज्ञानिक उत्तरे

## कापुराचं झाड खरंच हवा शुद्ध करतं?

**विद्यालंकार घारपूरे**




त्या दिवशी सचिन आणि मनिषा 'ज्ञानदीप'मध्ये शिरले, तेव्हा सचिनच्या हातात मोबाईल होता आणि चेहऱ्यावर नेहमीपेक्षाही जास्त उत्साह.

''उत्तराकाकी, आज तुमच्यासाठी खास प्रश्न आहे!''

''म्हणजे बाकीचे प्रश्न आमच्यासाठी नसतात वाटतं?'' समाधानकाकांनी हसत विचारलं.

''तसं नाही हो काका! पण आजचा प्रश्न झाडाचा आहे. म्हणजे उत्तराकाकींच्या जीवशास्त्रातला!''

उत्तराकाकींनी हसून विचारलं, ''बरं बाबा, कोणतं झाड?''

''कापुराचं! व्हॉट्सॲपवर त्याबद्दल एक पोस्ट फिरतेय. त्यात म्हणे कापुराचं एक झाड आजूबाजूच्या अर्धा किलोमीटर परिसरातील हवा शुद्ध करतं. हवेतील जंतू मारतं. पूर्वी भारतात अशी खूप झाडं होती; पण ब्रिटिशांनी चहा आणि रबराच्या मळ्यांसाठी ती तोडून टाकली. आता आपण पुन्हा मोठ्या प्रमाणावर कापुराची झाडं लावली पाहिजेत.''

''अरे वा!'' समाधानकाका म्हणाले, ''एकाच पोस्टने प्रदूषण, जंतू, ब्रिटिशांचा इतिहास आणि वृक्षलागवड, चार प्रश्न सोडवले!''

मनिषाने विचारलं, ''मला मात्र वेगळाच प्रश्न पडलाय. हे खरं कशावरून?''

''शाब्बास!'' उत्तराकाकी म्हणाल्या, ''हा झाला आपल्या चर्चेचा प्रश्न.'' सचिनने मोबाईल पुढे केला. ''पण या व्हायरल पोस्टचं खंडन करणारी दुसरी पोस्टही मला मिळाली.

''छान,'' उत्तराकाकी म्हणाल्या, ''मग आपलं काम बरंच सोपं झालं म्हणायचं. पण तीही पोस्ट नीट पाहून घ्यायची.''

सचिनने थोडं गोंधळून विचारलं. ''खंडनसुद्धा?''

''अर्थात!'' समाधानकाका म्हणाले, ''विज्ञानात आपल्या आवडीचा दावा असो किंवा नावडीचा, प्रश्न एकच : पुरावा काय?'' ''चला, पहिला दावा घेऊ,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''कापुराचं झाड अर्धा किलोमीटर परिसरातील हवा शुद्ध करतं. सचिन, तुला यात पहिला संशय कुठे येतो?''

सचिन काही क्षण विचारात पडला व म्हणाला, ''सर्वच झाडे कमीजास्त प्रमाणात हवा शुद्ध करतात. झाडांच्या पानात असलेले हरितद्रव्य, पानांनी शोषून घेतलेला कार्बनडाय ऑक्साईड आणि सूर्यप्रकाश यांच्या साहाय्याने झाडे प्रकाशसंश्लेषण क्रिया करतात आणि स्वतःचे अन्न तयार करतात. या प्रक्रियेत निर्माण होणारा ऑक्सिजन वातावरणात मुक्त होतो. याचाच अर्थ असा की जेवढे झाड मोठे तेवढी त्याच्या पानांची संख्या अधिक, तेवढे त्याचे प्रकाशसंश्लेषण अधिक आणि तेवढी त्याची कार्बनडाय ऑक्साईड शोषण्याची व ऑक्सिजन सोडण्याची क्षमता अधिक. कापुराचे झाड आकाराने खूप मोठे होत असल्याने ते मोठ्या प्रमाणात ही वायूंची देवाणघेवाण करणार हे साहजिक आहे. पण तेच काम त्याच्यासारख्याच मोठ्या आकाराचे भारतीय वृक्ष सुद्धा करतात. कापुराच्या झाडाचा हा काही विशेष गुणधर्म नाही.''

मनिषा म्हणाली, ''आणि अर्धा किलोमीटर हे एवढं नेमकं अंतर कुठून आलं?'' ''बरोबर!'' उत्तराकाकी म्हणाल्या, ''एखादं झाड हवा किती अंतरापर्यंत 'शुद्ध' करणार, हे झाडाच्या जातीवरच ठरणार का? वाऱ्याचा वेग, दिशा, झाडाचा आकार, पानांची संख्या, परिसरातील प्रदूषणकाहीच महत्त्वाचं नाही?''

''म्हणजे अर्धा किलोमीटर ही संख्या संशयास्पद आहे,'' सचिन म्हणाला.

''हो. झाडं वातावरणाशी वायूंची देवाणघेवाण करतात. प्रकाशसंश्लेषणात कार्बन डायऑक्साइड घेतात आणि ऑक्सिजन सोडतात. पानांवर काही हवेतील कणही अडकू शकतात. पण त्यामुळे एखाद्या कापुराच्या झाडाभोवती अर्धा किलोमीटरचा अदृश्य 'शुद्ध हवेचा घुमट' तयार होत नाही.''

समाधानकाका मध्येच म्हणाले, ''आणि प्रकाशसंश्लेषण म्हणजे घरातला एअर प्युरिफायर नाही बरं का! झाडं परिसंस्थेचा भाग म्हणून वातावरणावर परिणाम करतात. 'एक झाड = एवढ्या त्रिज्येची शुद्ध हवा' असं सरळ गणित करता येत नाही.''

पण झाडात कापूर असतो ना?

सचिनने लगेच पुढचा प्रश्न टाकला.

''काकी, झाडात कापूर असतो हे तरी खरं ना? मग त्याचा वास हवेत येत असेल. त्यामुळे जंतू मरत नसतील का?''

''कापुराच्या झाडाच्या विविध भागांत सुगंधी अस्थिर रसायने असतात,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''पण इथून थेट 'झाड आसपासच्या हवेतले जीवाणू-विषाणू नष्ट करतं' असा निष्कर्ष काढता येत नाही.''

''म्हणजे प्रयोगशाळेत एखाद्या रसायनाचा सूक्ष्मजीवांवर परिणाम दिसला आणि प्रत्यक्ष मोकळ्या वातावरणात झाडाने जंतुनाशकाचं काम केलंया दोन वेगळ्या गोष्टी आहेत?'' मनिषाने विचारलं.

''अगदी! समजा एखाद्या पदार्थाचा संहत म्हणजे अतीतीव्र अर्क पेट्री डिशमधल्या बुरशीची वाढ रोखतो. त्यावरून त्या पदार्थाचं झाड अंगणात लावलं की पन्नास-साठ मीटरवरची बुरशी गायब होईल, असं म्हणता येईल का?'' समाधान काकांनी विचारलं.

''नाही!'' दोघेही एकदम म्हणाले.

''मग पाचशे मीटर तर फारच दूरची गोष्ट झाली!'' काका हसले. ''कापूर झाडातून कसा मिळतो? आपण पूजेत वापरतो तो कापूर झाडाच्या खोडातूनच काढतात ना?'' सचिनने विचारलं.

उत्तराकाकी समाधानकाकांकडे वळल्या. ''आता तुमचा पदार्थविज्ञान-रसायनशास्त्राचा विभाग!''

''माझ्या खात्यात प्रश्न आला म्हणजे फी लागेल!'' काका गंमत करण्याच्या मूडमध्ये येत म्हणाले.

''तुमची फी आम्ही नक्की देऊ!'' सचिनने आश्वासन दिलं.

''नैसर्गिक कापूर मिळवण्यासाठी कापुराच्या झाडाच्या लाकूड-पानांसारख्या भागांमधील अस्थिर घटक बाहेर काढून पुढे कापूर वेगळा व शुद्ध केला जातो. पारंपरिक प्रक्रियांमध्ये वाफेच्या साहाय्याने ऊर्ध्वपातनाचा उपयोग केला जातो. म्हणजे झाड अंगणात उभं आहे म्हणून त्यातून मोठ्या प्रमाणावर कापूर हवेत फवारला जातोय, असं नाही.'' काकांनी सचिनने विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर दिलं.

''आणि कापूर जाळला की हवा शुद्ध होते?'' मनिषा.

समाधानकाका म्हणाले, ''इथे एक साधा नियम लक्षात ठेव. एखादी वस्तू जाळली की दहनातून वायू आणि सूक्ष्म कण निर्माण होऊ शकतात. त्यामुळे 'धूर निर्माण करून हवा शुद्ध करणे' हा दावा पुराव्याशिवाय स्वीकारायचा नाही.''

मग 'खरा' आणि 'खोटा' कापूर?

सचिनने मोबाईलवरून वाचलं, ''इथे आणखी एक दावा आहे, भीमसेनी कापूर हा खरा आणि बाजारातला दुसरा कापूर खोटा.'' ''नैसर्गिक' आणि 'कृत्रिमरीत्या तयार केलेला' हे शब्द अधिक योग्य,'' समाधानकाका म्हणाले, ''कापूर हे एक विशिष्ट रासायनिक संयुग आहे. औद्योगिकरीत्या तो टरपेंटाइनमधून मिळणाऱ्या पायनीनसारख्या पदार्थांपासूनही तयार करता येतो.''

मनिषा म्हणाली, ''म्हणजे कृत्रिम म्हणजे बनावट असं नाही?'' ''ही फार महत्त्वाची गोष्ट आहे!'' काका म्हणाले. ''प्रयोगशाळेत किंवा कारखान्यात तयार केलेला पदार्थ 'खोटा' असतोच असं नाही. पदार्थाचे गुणधर्म त्याच्या रासायनिक रचनेवर अवलंबून असतात.'' ''म्हणजे 'नैसर्गिक म्हणजे नेहमी चांगलं आणि कृत्रिम म्हणजे नेहमी वाईट' हे समीकरणच चुकीचं?''

''अगदी बरोबर.'' ''आता इतिहास!'' सचिन म्हणाला, ''ब्रिटिशांनी कापुराची झाडं तोडून चहा आणि रबर लावलं, हा दावा?'' उत्तराकाकी म्हणाल्या, ''इथे सर्वप्रथम वनस्पतीचं मूळ भौगोलिक क्षेत्र पाहावं लागतं. आपण ज्या सिनॅमोमम कँफोरा या कापूरवृक्षाबद्दल बोलतो आहोत, त्याचं नैसर्गिक उगमक्षेत्र जपान, कोरिया व तैवान या देशांत आहे. भारतात कापूर फार प्राचीन काळापासून माहीत होता. तो धार्मिक कारणासाठी वापरला जात होताआणि औषधी उपयोगासाठीही. पण एखादा पदार्थ भारतात प्राचीन काळापासून वापरला जातो म्हणजे तो निर्माण करणारी वनस्पतीही भारताची स्थानिकच असली पाहिजे, असं नाही.''

''मिरचीसारखं?'' मनिषा म्हणाली.

उत्तराकाकी हसल्या. ''अगदी बरोबर! आज मिरचीशिवाय भारतीय स्वयंपाकाची कल्पना कठीण वाटते; पण मिरचीचा उगम अमेरिकेत आहे.''

''म्हणजे भारतीय संस्कृतीचा भाग आणि भारतीय मूळया दोन वेगळ्या गोष्टी,'' सचिन म्हणाला.

''नेमकं तेच. त्यामुळे भारतभर प्रचंड कापुराची जंगलं होती आणि ब्रिटिशांनी ती नष्ट करून तिथे चहा-रबर लावलं, अशा दाव्यासाठी मजबूत ऐतिहासिक पुरावा हवा. केवळ भावनिक कथा पुरेशी नाही.'' परदेशी झाड म्हणजे वाईट झाड?

मनिषाने लगेच विचारलं, ''पण काकी, कापुराचं झाड भारतीय नाही म्हटल्यावर आपण ते लावूच नये का?''

उत्तराकाकी काही क्षण थांबल्या.

''हा आजचा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे. 'परदेशी' आणि 'आक्रमक' हे समानार्थी शब्द नाहीत.''

सचिन म्हणाला, ''एखादी वनस्पती बाहेरून आली म्हणून ती आपोआप वाईट होत नाही.''

''बरोबर. एखादी बाहेरून आणलेली प्रजाती मानवी मदतीशिवाय वेगाने पसरू लागली, स्थानिक वनस्पतींना विस्थापित करू लागली किंवा परिसंस्थेवर लक्षणीय परिणाम करू लागली, तर तिच्या आक्रमकतेचा प्रश्न निर्माण होतो.''

''कापुराचं झाड तसं करतं?'' ''काही देशांत सिनॅमोमम कँफोराचा प्रसार गंभीर पर्यावरणीय समस्या ठरला आहे. त्याला बेरीसारखी फळं येतात. पक्षी ती खातात आणि बिया दूरवर नेतात. अनुकूल परिस्थितीत नवीन रोपं सहज उगवू शकतात. त्यामुळे ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतील काही भागांत ही आक्रमक वनस्पती म्हणून नोंदवले गेली आहे.''

''पक्षी फळं खातात म्हणजे स्थानिक जीव त्याचा उपयोग करतातच की!'' सचिन म्हणाला.

''हो! आणि हा छान मुद्दा आहे,'' उत्तराकाकी म्हणाल्या, ''परदेशी वनस्पती आणि स्थानिक प्राणी यांच्यात संबंध निर्माण होऊ शकतात. पण पक्ष्यांना फळं मिळतात म्हणून त्या वनस्पतीचा एकूण पर्यावरणीय परिणाम चांगलाच आहे, असंही म्हणता येत नाही. तेच पक्षी तिच्या बिया पसरवून तिचा प्रसार वाढवू शकतात.'' झाडं रासायनिक युद्धही करतात?

''या लेखात 'ॲलिलोपॅथी' असा शब्द आहे,'' सचिन म्हणाला. ''त्याचा अर्थ काय?'' उत्तराकाकींनी टेबलावर दोन कुंड्या ठेवल्या. ''काही वनस्पती स्वतः तयार केलेली रसायनं पानं, मुळं किंवा कुजणाऱ्या अवशेषांमधून परिसरात सोडतात. त्या रसायनांचा दुसऱ्या वनस्पतींच्या बियांच्या अंकुरणावर किंवा वाढीवर परिणाम होऊ शकतो. या प्रकारच्या रासायनिक परस्परक्रियेला ॲलिलोपॅथी म्हणतात.'' ''म्हणजे झाडं शेजाऱ्यांना विष घालतात?'' सचिनने विचारलं. ''असं नाट्यमय वर्णन टाळ,'' उत्तराकाकी हसल्या, ''प्रयोगशाळेत एखाद्या वनस्पतीच्या अर्कामुळे दुसऱ्या वनस्पतीच्या बियांचं अंकुरण कमी झालं, तरी प्रत्यक्ष जंगलात तसाच आणि तेवढाच परिणाम होतो हे स्वतंत्रपणे सिद्ध करावं लागतं.'' मनिषा लगेच म्हणाली, ''म्हणजे इथेही तोच नियम! पेट्री डिशमधला परिणाम म्हणजे जंगलातला परिणाम नव्हे.''

''आज तू माझं काम सोपं करते आहेस!'' उत्तराकाकी म्हणाल्या, ''कापूरवृक्षाच्या पानांतील आणि इतर भागांतील काही रसायनांच्या ॲलिलोपॅथीक परिणामांबद्दल संशोधन झालं आहे. पण किती प्रजातींवर किती परिणाम, प्रत्यक्ष जमिनीत त्याचं प्रमाण किती, स्थानिक परिसंस्थेत त्याचा परिणाम किती मोठायाबाबत संशोधनातील निष्कर्ष ज्या मर्यादेत आहेत त्याच मर्यादेत बोललं पाहिजे.'' सचिनचा आता नेहमीचा निर्णायक प्रश्न आला,''मग, भारतात कापुराची झाडं लावायची की नाही?''

''विज्ञानाला हो किंवा नाही अशी दोनच बटणं नसतात,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''बागेत एखादं कापूरवृक्ष लावणं आणि हजारो रोपं घेऊन जंगलात, माळरानावर किंवा नैसर्गिक परिसंस्थेत मोठ्या प्रमाणावर लावणं या दोन अगदी वेगळ्या गोष्टी आहेत.''

''म्हणजे मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करताना स्थानिक प्रजातींना प्राधान्य?''

''हो. विशेषतः नैसर्गिक परिसंस्थेच्या पुनर्स्थापनेसाठी. कोणतीही विदेशी प्रजाती मोठ्या प्रमाणावर लावण्यापूर्वी त्या प्रदेशातील तिच्या प्रसारक्षमतेचा आणि संभाव्य पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास आवश्यक आहे.'' समाधानकाका म्हणाले, ''आणि 'हे झाड लावापाचशे मीटर हवा शुद्ध!' अशी जाहिरात दिसली तर?'' सचिन म्हणाला, ''पुरावा मागायचा!''

मनिषा म्हणाली, ''आणि 'ब्रिटिशांनी आपली सगळी झाडं नष्ट केली' असं लिहिलं असेल तर ऐतिहासिक पुरावा मागायचा.'' ''नैसर्गिक कापूर सर्व रोगजंतू मारतो' म्हटलं तर?'' काकांनी विचारलं. ''वैज्ञानिक संशोधन मागायचं!''

''आणि त्याच पोस्टच्या शेवटी रोपांची किंमत, फोन नंबर आणि ऑर्डरची माहिती आली तर?'' सचिन हसला व म्हणाला, ''मग पोस्ट विज्ञानाची आहे की जाहिरातीची, हा प्रश्न आधी विचारायचा!'' उत्तराकाकींनी सूचना केली, '' व्हायरल पोस्टवर आंधळा विश्वास ठेवायचा नाही; तिच्यातला प्रत्येक शब्द तपासल्याशिवाय अंतिम सत्य मानायचा नाही.'' मनिषाच्या चेहऱ्यावर समाधान दिसलं. उत्तराकाकी म्हणाल्या, ''वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे कोणावर अविश्वास ठेवणे नव्हे. तो म्हणजे दाव्यापेक्षा पुराव्याला महत्त्व देणे.'' सचिन उठला आणि म्हणाला, ''चला मनिषा. आज व्हॉट्सॲपवर आलेल्या आणखी चार पोस्ट तपासायच्या आहेत.'' आणि काकांकडे बघून म्हणाला, '' काका, तुमच्या पसंतीचं विज्ञान विषयावरचं कोणतंही एक पुस्तक, आपल्या विज्ञानकेंद्रासाठी मागवा. मी व मनिषाने साठवलेल्या खाऊच्या पैशातून पुस्तकाचे पैसे देऊ. ती तुमची फी !'' मनिषाने होकारार्थी मान हलवली.

दोघे घरी जायला निघाले. काका, काकू त्यांच्या पाठमोऱ्या आकृतींकडे समाधानाने पाहत राहिले. ●

# भारतीय क्रिकेट संघाची 'सुवर्ण' मोहर

## पाकिस्तानाला केले चारी मुंड्या चित; दुसऱ्यांदा सुवर्णपदकावर कोरले नाव

| मुंबई | वृत्तसंस्था |

भारतीय क्रिकेट संघाने सलग दुसऱ्यांदा आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे. शनिवारी श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारती संघाने सुवर्णपदकाच्या लढतीत पाकिस्तानला धावांनी पराभवाचा धक्का दिला. भारताने यापूर्वी २०२३ मध्ये ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वात सुवर्णपदक जिंकले होते. त्यामुळे भारताने सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकण्याचा कारनामा केला आहे. त्यामुळे यंदा क्रिकेट प्रकारात महिला आणि पुरुष दोन्ही गटातील सुवर्णपदक भारताला मिळाले आहे.



शनिवारी झालेल्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानसमोर विजयासाठी २१२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानला २० षटकात ६ बाद १९२ धावाच करता आल्या आणि त्यामुळे पाकिस्तानला पराभवासह रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. यंदा श्रीलंका संघाला कांस्य पदक मिळाले. अंतिम सामन्यात भारताने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी पाकिस्तानकडून कर्णधार साहिबझादा फरहान आणि माझ सदाकत उतरले होते. पण चौथ्याच षटकात फरहानला वॉशिंग्टन सुंदरने १० धावांवरच अक्षर पटेलच्या हातून झेलबाद केले. पुढच्याच षटकात अक्षर पटेलने शिवम दुबेच्या हातून उस्मान खानला ३ धावांवर झेलबाद केले. ७ व्या षटकात माझ सदाकतला अक्षर पटेलनेच २३ धावांवर बाद केले.पण नंतर हसन नवाझने चांगला खेळ केला. त्याला सईम आयुबने साथ दिली. या दोघांनी ८७ धावांची भागीदारी करत पाकिस्तानची आशा उंचावली होती. पण त्यांची भागीदारी १५ व्या षटकात अखेर शिवम दुबेने तोडली. त्याने आयुबला २९ धावांवर वॉशिंग्टन सुंदरच्या हातून झेलबाद केले. नवाझने अर्धशतक केले होते. तो शतकाच्या दिशेने वाटचाल करत होता. त्याने शेवटी आक्रमक खेळत विजयापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला. मात्र, १८ व्या षटकात सामदला वॉशिंग्टन सुंदरने ९ धावांवर माघारी धाडले. साद मसूदने २ षटकार मारत आशा उंचावल्या. पण अखेरच्या षटकापर्यंत समीकरण पाकिस्तानच्या हातातून बाहेर गेले. शेवटच्या चेंडूवर हसन नवाझलाच शिवम दुबेने यष्टीरक्षक संजू सॅमसनच्या हातून झेलबाद केले. नवाझने ५१ चेंडूत ५ चौकार आणि ७ षटकारांसह ९६ धावांची एकाकी झुंज दिली. भारताकडून गोलंदाजी करताना अक्षर पटेल, शिवम दुबे आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

### ऐतिहासिक विजय

भारताकडून अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी दोन विकेट नावावर केल्या. या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर भारताने सामन्यामध्ये अभिषेक शर्मा ६१ धावा, तिलक वर्मा नाबाद ५१ धावाच्या जोरावर भारताने पाकिस्तानवर ऐतिहासिक विजय मिळविला.

तत्पुर्वी, भारताने वैभव सूर्यवंशी (१५) आणि संजू सॅमसन (२) यांच्या विकेट्स लवकर गमावल्या. पण अभिषेक शर्माने २८ चेंडूत ६१ धावांची दमदार खेळी केली. तसेच कर्णधार श्रेयस अय्यरने २१ धावांची आणि ईशान किशनने २० धावांची संयमी खेळी केली. शेटी तिलक वर्माने आक्रमक खेळ करताना २२ चेंडूत ५१ धावांची नाबाद खेळी केली. शिवम दुबेनेबी १५ चेंडूत २७ धावांचे योगदान दिले. त्यामुळे भारताने २० षटकात ६ बाद २११ धावा केल्या.पाकिस्तानकडून अहमन दनिाल आणि अरफत मिन्हास यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. सईम आयुब आणि अब्रार अहमद यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

## निवडक

### प्रणवी उर्सला गोल्फमध्ये सुवर्णपदक

**नागोया :** भारताच्या प्रणवी उर्सने शानदार कामगिरी करत आशियाई खेळांमधील महिलांच्या गोल्फचे पहिले सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. प्रणवीने ज्युनियर आणि हौशी स्तरावर अनेक यश मिळवले. तिने २०१८ मध्ये थायलंडमधील सिंगा वर्ल्ड ज्युनियर चॅम्पियनशिप आणि ऑल इंडिया ज्युनियर गर्ल्स चॅम्पियनशिपसह अनेक स्पर्धा जिंकल्या. २०२० मध्ये व्यावसायिक झाल्यानंतर, तिने देशांतर्गत महिला व्यावसायिक गोल्फ सर्किटमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले. प्रणवीने २०२३ मध्ये हांगझू येथे झालेल्या २०२२ च्या आशियाई खेळांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. याव्यतिरिक्त, तिने २०२५ हीरो विमेन्स इंडियन ओपनमध्ये चौथे स्थान, २०२५ लाकोस्ट लेडीज ओपन डी फ्रान्समध्ये संयुक्तपणे पाचवे स्थान आणि २०२६ डच लेडीज ओपनमध्ये संयुक्तपणे पाचवे स्थान मिळवले. २०२४ मध्ये तिच्या पहिल्या संपूर्ण लेडीज युरोपियन टूर हंगामात, तिने हंगामाच्या क्रमवारीत १७ वे स्थान मिळवले. प्रणवीची ही कामगिरी भारतीय महिला गोल्फसाठी एक ऐतिहासिक यश आहे आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत महिला गोल्फमधील भारताचे हे पहिले सुवर्णपदक आहे.



### रोनाल्डो पोर्तुगालच्या शिबिरातून बाहेर

**कोपनहेगन :** ख्रिस्टियानो रोनाल्डोने डेन्मार्कविरुद्धच्या यूईएफए नेशन्स लीग सामन्यापूर्वी त्याने पोर्तुगालच्या राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षण शिबिर सोडले आहे. विशेष म्हणजे, नॉर्वेविरुद्ध पोर्तुगालच्या २-१ अशा विजयाच्या वेळी रोनाल्डो अनुपस्थित होता. तो संपूर्ण सामना राखीव फुटबॉलपटूंच्या बाकावर बसून होता आणि त्यानंतर त्याने संघातील इतर फुटबॉलपटूंसोबत सराव केलेला नाही. ही परिस्थिती सोडवण्यासाठी रोनाल्डो, पोर्तुगालचे मुख्य प्रशिक्षक जॉर्ज जीझस आणि पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशनचे अध्यक्ष पेड्रो प्रोएन्सा यांच्यात बैठक आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रीय संघाच्या पत्रकार परिषदेनंतर आणि पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशनच्या अध्यक्षांशी चर्चा केल्यानंतर, मी राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षण शिबीर सोडण्याचा निर्णय घेतला आहे. पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशननेही दुजोरा दिला आहे की रोनाल्डोने कोपनहेगनमधील राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षण शिबीर सोडले आहे.



### एशियन गेम्समध्ये चरणीची कमाल

**नवी दिल्ली:** नुकतेच भारताने आठव्या महिला आशिया चषक जिंकल्यानंतर एशियन गेम्स २०२६ मध्ये सुवर्ण पदकाची कामगिरी केली. या संपूर्ण प्रवासात चरणी एक विश्वासू गोलंदाजाच्या रुपात समोर आली. आशिया चषकात तिने एकूण १२ विकेट मिळवले, तर श्रीलंकेविरुद्धच्या फायनलमध्ये तिने २० धावांत ४ गडी टिपले होते. जपानमधील एशियन गेम्समध्ये चरणीने यजमान जपानविरुद्धच्या सामन्यात अवघ्या १० धावांत ४ गडी मिळवले होते. ही तिच्या करिअरमधील सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरली. तिने सेमिफायनलमध्ये हे यश मिळवले होते. तर श्रीलंकेविरुद्धच्या फायनलमध्ये तिने २ विकेट आपल्या झोळीत टाकले. याच सततच्या शानदार कामगिरीमुळे ऑल टाइम हाय रँकिंग तिने आपल्या नावे केला. भारतीय महिला संघातील स्टार फिरकीपटू श्री चरणीने इतिहासांच्या पानांवर आपले नाव कोरले आहे. नव्याने जाहीर झालेल्या टी-२० रँकिंगमध्ये श्री चरणी सर्वात जास्त प्वॉइंट्स प्राप्त करणारी गोलंदाज बनली आहे. या भारतीय फिरकीपटूने आतापर्यंतचे सर्व विक्रम मोडीत काढत ऑल टाइम हाय रँकिंग आपल्या नावे केले आहे.




### ख्रिस गेलचा विक्रम उद्ध्वस्त

नवी दिल्ली : दक्षिण आफ्रिकेचा युवा फलंदाज लुआन-ड्रे प्रेटोरियसने टी-२० क्रिकेटमध्ये नवा इतिहास रचला आहे. सीएसए टी-२० चॅलेंजमध्ये टायटन्सकडून खेळताना नाइट्सविरुद्ध त्याने नाबाद १८८ धावांची वादळी खेळी केली. या खेळीसह त्याने वेस्ट इंडिजचा दिग्गज फलंदाज ख्रिस गेलचा तब्बल १३ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला. ब्लोमफॉन्टेनमध्ये झालेल्या या सामन्यात प्रेटोरियसने अवघ्या ७९ चेंडूंमध्ये १८८ धावा फटकावल्या. त्याच्या खेळीत १५ चौकार आणि १३ षटकारांचा समावेश होता. त्याचा स्ट्राइक रेट तब्बल २३७.९७ इतका राहिला. विशेष म्हणजे, त्याने २४ चेंडूंमध्ये अर्धशतक, तर केवळ ४० चेंडूंमध्ये शतक पूर्ण केलं. त्यानंतर ५८ चेंडूंमध्ये १५० धावांचा टप्पाही गाठला.याआधी टी-२० क्रिकेटमधील सर्वाधिक वैयक्तिक धावांचा विक्रम क्रिस गेलच्या नावावर होता. गेलने २०१३ मध्ये आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळताना पुणे वॉरियर्सविरुद्ध नाबाद १७५ धावांची खेळी केली होती. आता प्रेटोरियसने १८८ धावा करत हा विक्रम मोडला आहे.



### नशामुक्त युवा मॅरेथॉनचे आयोजन

**पणजी :** विकसित भारतासाठी नशामुक्त युवा-१०० रविवार या मोहिमेअंतर्गत, माय भारत गोवा आणि गोवा ऑलिम्पिक संघटना यांच्यातर्फे ४ ऑक्टोबर २०२६ रोजी पणजीत मिरामार येथे नशामुक्त युवा मॅरेथॉन होणार आहे. या उपक्रमाचा उद्देश तरुणांमध्ये अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करणे, तसेच शारीरिक तंदुरुस्ती, निरोगी जीवनशैली आणि जनसहभागाला चालना देणे हा आहे. मॅरेथॉन सकाळी ७:०० वाजता मिरामार सर्कल येथून सुरू होईल आणि सहभागी होणाऱ्यांनी सकाळी ६:३० वाजेपर्यंत तिथे पोहोचायचे आहे कारांझालेम पार्कच्या दिशेने जाऊन पुन्हा मिरामार सर्कल इतक्या अंतराचे हे मॅरेथॉन आहे. मॅरेथॉन नंतर पदक वितरण समारंभ होईल.

## चहल प्रथम-श्रेणी क्रिकेटमधून निवृत्त

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

युझवेंद्र चहलने प्रथम-श्रेणी क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. चहलने सोशल मीडियावर आपल्या निवृत्तीची घोषणा केली आणि तो टीम इंडियासाठी आयपीएल आणि मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये खेळणार की नाही, हे देखील उघड केले. आपल्या निवृत्तीची घोषणा करताना, चहलने सांगितले की तो प्रथम-श्रेणी क्रिकेटमधून निवृत्त झाला आहे, परंतु मर्यादित षटकांचे क्रिकेट खेळणे सुरू ठेवेल.



चहलने सोशल मीडियावरील एका लांबलचक पोस्टद्वारे प्रथम-श्रेणी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. कसोटी पदार्पणाची कॅप घालण्याचे स्वप्न होते, पण ते कधीच पूर्ण झाले नाही. तथापि, मी माझ्या क्रिकेट प्रवासाने पूर्णपणे समाधानी आहे. माझ्या देशासाठी खेळण्याची माझी तीव्र इच्छा आहे आणि मी एकदिवसीय आणि टी-२० संघात पुनरागमन करण्याचा प्रयत्न करेन असे त्यांनी सांगितले. चहलने भारतासाठी आपला शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामनाही २०२३ मध्येच खेळला. यानंतर, चहलची २०२४ च्या टी-२० विश्वचषकासाठी निवड झाली, पण त्याला खेळण्याची एकही संधी मिळाली नाही. विश्वचषकातील एक सामना चुकवल्यानंतर चहलला भारतीय टी-२० संघातून वगळण्यात आले होते.

## कुस्तीमध्ये दुर्वा ठाकूरची सुवर्ण कामगिरी

### ■ अलिबागच्या शिरपेचात मानाचा तुरा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

जिल्हास्तरिय शालेय कुस्ती स्पर्धा नुकतीच कर्जतमध्ये घेण्यात आली. १४ वर्षाखालील ५८ किलो वजनी गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेत दुर्वा ठाकूर हीने उत्तम कामगिरी बजावली. बुध्दी कौशल्यासह ताकदीने समोरच्या स्पर्धकाला पराभूत करून सुवर्णपदक मिळविले. तिच्या या कामगिरीने अलिबागच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. जिल्ह्यातून विभागात दुर्वाची निवड झाली आहे. त्यामुळे तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



दुर्वा ही अलिबाग तालुक्यातील दिवीपारंगी येथील रहिवासी आहे. भिलजी बोरघर येथील कोएसो बामीबाई नाना पुणकर विद्यालयामध्ये ती सध्या शिक्षण घेत आहे. गेल्या वर्षभरापासून कुस्ती स्पर्धेमध्ये तिचा सहभाग आहे. शालेयस्तरापासून तालुका व जिल्हास्तरावर आतापर्यंत चार पदके मिळविली आहेत. त्यात तीन सुवर्ण व एक रौप्यपदकाचा समावेश आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत, जिल्हा क्रीडा अधिकारी तथ जिल्हा क्रीडा परिषद रायगड द्वारा भगवान दामू धुळे हुतात्मा हिराजी पाटील ज्युनिअर कॉलेज कडाव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरिय शालेय कुस्ती स्पर्धा बुधवारी (दि.३०)आयोजित करण्यात आली. १४, १७ आणि १९ वर्षाखालील मुले व मुलींची स्पर्धा कर्जतमधील रॉयल गार्डन, मंगल कार्यालयामध्ये घेण्यात आली होती. दुर्वा ठाकूर हीने १४ वर्षाखालील ५८ किलो वजनी गटातून कुस्ती स्पर्धेत सहभाग घेतला. रायगड जिल्हास्तरिय शालेय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून तिची विभाग स्तरावर निवड करण्यात आली आहे.



●श्री. गणेश मित्रमंडळ मुनवली, ता. अलिबाग येथील साखरचौथ गणरायाची सुबक मूर्ती, (छायाचित्र - अब्दुल सोगावकर )



●शिवसाई गणेश मित्रमंडळ व महिला मंडळ, मुशेत, ता. अलिबाग येथील साखरचौथ गणरायाचे दर्शन घेताना भाविक. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)

### सेहरावतला फ्रीस्टाईल कुस्तीत सुवर्णपदक

| नागोया | वृत्तसंस्था |

भारतीय कुस्तीपटू अमन सेहरावतने आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या ५७ किलो फ्रीस्टाईल गटात सुवर्णपदक पटकावले. अंतिम सामन्यात त्याने उत्तर कोरियाच्या चोंग सोंग हानचा पराभव करत उत्कृष्ट कामगिरी केली. दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला आणखी एका शानदार टेकडाऊनसह अमनने आपली आघाडी ६-१ अशी वाढवली. उत्तर कोरियाच्या खेळाडूने टेकडाऊन आणि रोलच्या मदतीने अल्पावधीत सहा गुण मिळवले आणि अमनची ६-१ ची आघाडी ७-६ अशा पिछाडीत बदलली.सामना हातातून निसटत असताना, अमनने चार गुणांची महत्त्वपूर्ण खेळी केली आणि दोन गुण मिळवून १०-७ अशी आघाडी पुन्हा मिळवली. त्यानंतर हानने घेतलेले आव्हान अयशस्वी ठरल्यामुळे अमनला एक गुण मिळाला; त्यानंतर त्याने आपली आघाडी कायम राखत विजय मिळवला आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक आपल्या नावे केले. दुसऱ्या सत्रात काही काळ सहा गुण गमावूनही, त्याने निर्णायक खेळी करत सामन्यावर पुन्हा नियंत्रण मिळवले आणि एक अविस्मरणीय विजय साकारला.

## भारताचे वेस्टइंडिजला ३५२ धावांचे लक्ष्य

### ■ आधी हिटमॅनची वादळी खेळी

### ■ मग राहुलचे झंझावाती शतक

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय संघाने पुन्हा एकदा वेस्ट इंडिजविरुद्ध ३०० धावांचा टप्पा पार केला आहे. भारत विरुद्ध वेस्ट इंडिज संघात मालिकेतील तिसरा आणि अखेरचा वनडे सामना शनिवारी न्यू चंदिगढमध्ये सुरू आहे. या सामन्यात भारताकडून केएल राहुलने खणखणीत शतक केले. तसेच रोहित शर्मा आणि ऋतुराज गायकवाड यांनी अर्धशतके केली. त्यामुळे भारताने साडेतीनशे धावांचा टप्पा ओलांडत वेस्ट इंडिजसमोर ३५२ धावांचे लक्ष्य ठेवले आहे.

भारताचा कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारताकडून रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी सलामीला उतरत डावाची सुरुवात केली. शुभमन गिलला १ धावेवरच यष्टीरक्षक कर्णधार शाय होपच्या हातून झेलबाद केले. याच षटकात विराट कोहलीलाही शून्यावरच सिल्सने त्रिफळाचीत करत भारताला मोठा धक्का दिला.

नंतर रोहितने ऋतुराज गायकवाडला साथीला घेतले. दोघांनीही सुरुवातीला संयम दाखवत खेळ केला. रोहितने ५८ चेंडूत अर्धशतकही पूर्ण केले. अर्धशतकानंतर तो आक्रमक खेळत होता. तो पुन्हा या मालिकेत शतक करेल असेच दिसत होते. त्याने ऋतुराजसोबत शतकी भागीदारीही केली होती. रोहित शतकाच्या अगदी जवळ असताना मात्र किमो पॉलच्या गोलंदाजीवर जेवेल अँड्रूने त्याचा चांगला झेल घेतला. त्यामुळे रोहितचे शतक ८ धावांनी थोडक्यात हुकले. रोहित ८५ चेंडूत १० चौकार आणि ३ षटकारांसह ९२ धावांची खेळी केली.

रोहित बाद झाल्याने त्याची ऋतुराजसोबतची १३७ धावांची भागीदारीही तुटली. ऋतुराजने ६९ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ५७ धावांची खेळी केली. केएल राहुलले ४९ व्या षटकात सिल्सच्या गोलंदाजीवर षटकार ठोकत ८० चेंडूत शतक पूर्ण केले. त्याचे हे वनडेतील ९ वे शतक ठरले, तर न्यू चंदिगढमधील दुसरे शतक ठरले. तो शतकानंतरही आक्रमक खेळला. त्यामुळे भारताने ५० षटकात ७ बाद ३५१ धावा केल्या.

### एकाच दिवशी जिंकली सहा सुवर्णपदके | हॉकी संघाने ४४ वर्षाने जिंकले पदक

## भारताचा आशियाई क्रीडा स्पर्धेत 'सुवर्ण'षटकार

| नागोया | वृत्तसंस्था |

जपानमधील नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने शुक्रवारी एकाच दिवशी सहा सुवर्णपदके जिंकून 'सुवर्ण'षटकार ठोकला. या सुवर्ण कामगिरीत अर्धा वाटा भारतीय मुष्टियोद्ध्यांनी उचलला. अंकुश पांघल, परवीन हुडा आणि लव्हलिना बोरगोहेन या तीन बॉक्सर्सनी सुवर्णपदके जिंकली. त्याआधी महिला तिरंदाजांनी सोन्यावर नेम धरून देशासाठी दिवसातील पहिले सुवर्णपदक निश्चित केले. कुस्तीच्या आखाड्यातून सुजित कालकलने भारतासाठी पाचवे सुवर्ण आणले. संपूर्ण देश या सुवर्ण कामगिरीच्या जल्लोषात असतानाच दिवस संपतासंपता भारतीय महिला हॉकी संघाने हा आनंद द्विगुणीत करताना ४४ वर्षांनंतर आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. अंतिम सामन्यात त्यांनी चीनला १-० ने पराभूत केले. यापूर्वी, भारताने १९८२ मध्ये दक्षिण कोरियाला हरवून सुवर्णपदक जिंकले होते. या विजयामुळे भारतीय हॉकी संघ २०२८ च्या ऑलिम्पिकसाठीही पात्र ठरला. महिलांच्या हॉकीतील सुवर्णपदकामुळे भारताच्या एकूण सुवर्णपदकांची संख्या १६ झाली असून पदकतालिकेत भारत पाचव्या स्थानावर आहे. अंकुश पांघलने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाच्या किम मिन-सेओंगचा ४-० ने पराभव करून सुवर्णपदक जिंकले. २०१८ नंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय पुरुष खेळाडू ठरला. एकाच आशियाई क्रीडा स्पर्धेत तीन भारतीय बॉक्सर्सनी सुवर्णपदक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. तिरंदाजीत मुलींचा अंतिम फेरीत दक्षिण कोरियाचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले.



### २०२८ऑलिम्पिकसाठी महिला हॉकी संघ पात्र

भारतीय महिला हॉकी संघाने सुवर्णपदक जिंकले. अंतिम सामन्यात भारताने चीनला १-० ने पराभूत केले. आशियाई क्रीडा स्पर्धेत ४४ वर्षांनंतर भारताने मिळवलेले हे पहिले पदक आहे. यापूर्वी भारताने १९८२ मध्ये सुवर्णपदक जिंकले होते.या विजयामुळे भारत लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठी थेट पात्र ठरला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)